# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. २३/०६/२०२१

बुधवार दि. २३/०६/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १५/०६/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ११) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १२) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १३) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १५) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १६) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १७) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २०) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २२) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २५) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २६) | जैन गीता भरत | सदस्या |
| २७) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २८) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २९) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ३०) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३१) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३२) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३३) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३४) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३५) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३६) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३७) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३८) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३९) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ४०) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ४१) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४३) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४६) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४७) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४९) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ५०) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५१) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५२) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५३) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५४) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५७) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५८) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५९) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ६०) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६१) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ६२) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६४) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६५) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६६) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६७) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६८) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६९) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ७०) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ७१) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७३) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७४) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७५) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७६) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७७) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७८) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७९) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ८०) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ८१) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ८६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८७) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८८) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ८९) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ९०) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| २) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

रजेचा अर्ज - निरंक

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांचे आजच्या महासभेसाठी स्वागत आहे सर्वांनी राष्ट्रीय गीत वंदेमात्रमसाठी जागेवर उभे राहायचे आहे. मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. २३/०६/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

मा. महापौरांच्या परवानगीने, आजच्या सभेमध्ये दोन सत्कार करण्याचे मा. महापौरांनी परवानगी देण्यात आलेली आहे. प्रथमत: मी चंद्रशेखर सावंत यांना बोलवतो, चंद्रशेखर सावंत यांनी दि. 03/07/2018 रोजी हे मोटरमॅन असून हे पश्चिम रेल्वेच्या बोरीवली स्टेशन ते चर्चगेट स्टेशन पर्यंत प्रवाशाने भरलेली ट्रेन घेऊन जात असतांना सकाळी 07.00 वाजेच्या आजपास अंधेरी रेल्वे स्टेशन सोडल्यानंतर गोखले ब्रीजजवळ त्यांना रेल्वे रुळावर काही तरी वेगळेपणा दिसल्याने त्यांनी तात्काळ अर्जेंट ब्रेक मारून ट्रेन थांबवली व ते ट्रेनमधून खाली उतरले, खाली उतरल्यानंतर त्यांनी पाहिले की अतिवृष्टीमुळे रेल्वे रुळाच्या बाजूचा मातीचा मलवा रेल्वे रूळावर आलेला होता यामुळे संपूर्ण रुळ

मातीच्या मलव्याने झाकलेला होता. श्री. चंद्रशेखर सावंत यांनी प्रसंगावधान राखून ट्रेन थांबवली नसती तर फार मोठा अपघातातून बऱ्याच प्रमाणात जीवीत हानी झाली असती तसेच रेल्वेचे पण फार मोठे नुकसान झाले असते त्यांनी केलेले कार्य हे कौतुकास्पद व अभिमनास्पद असल्यांने मा. केंद्रीय रेल्वे मंत्री श्री. पियुष गोयल यांनी श्री. चंद्रशेखर सावंत यांचा गौरव करून त्यांना रु. 5 लक्ष इतके बक्षिस जाहिर केले तसेच त्यांना पश्चिम रेल्वे तर्फे गुणवंत कामगार ह्या पुरस्कारांने देखील गौरविण्यात आलेले आहे तसेच दैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे विभाग यांनी देखील श्री. चंद्रशेखर सावंत यांना प्रशिस्ती पत्र देवून त्यांचा गौरव केलेला आहे. श्री. चंद्रशेखर सावंत यांचा मिरा भाईंदर महानगरपालिकेस सार्थ अभिमान आहे श्री. चंद्रशेखर सावंत यांना मिरा भाईंदर महानगरपालिके तर्फे मा. महापौरांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देवून त्यांचा गौरव करण्यात येत आहे तसेच त्यांना सन्मान चिन्ह देखील देण्यात येत आहे.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम नमस्कार, आपल्याकडे विद्यार्थी पण आहे ह्या शहराचा नागरिक आहे, आपल्या शहरामध्ये तो मनपाच्या शाळेत शिकत होता 07 वी पर्यंत नवघर मराठी शाळा आणि आज तो स्पोर्ट्स मॅनेजमेंट करतोय कांदिवलीला ह्या मुलांने 19 वर्षाच्या वयामध्ये 52 सर्टीफिकीटं आणि 52 पदकं मिळवून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले आणि ही गोष्ट आपल्यासाठी निश्चितच अभिमानाची आहे सन्मानाची आहे ह्या मुलांच्या पुढील वाटचालीसाठी आपण शुभेच्छा देवूया आणि शहराचा नाव त्यांनी संपुर्ण भारतात उज्ज्वल केलेला आहे, मोठे केलेले आहे आणि म्हणून आपण त्याचा सत्कार करुया असे मला वाटते. ह्या प्रसंगी मला एक गोष्ट अवर्जुन सांगाविसी वाटते ती म्हणजे 2014 साली आपल्या शहरामध्ये तत्कालीन आयुक्त मा. सुरेश काकानी साहेबांची आज आठवण करणेसारखी गोष्ट आहे कारण ह्या मुलांचे प्रशिक्षक विनोद कदम जे पेशाने रिक्षा चालक आहेत पण कराटेपटू आहेत आणि शहरातील मुलांना / नागरिकांना कराटे शिकविण्याचा त्यांचा मानस होता त्यामुळे ह्या विद्यार्थ्यासाठी आणि शहरातील इतर विद्यार्थ्यांसाठी, पालिकेतल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांसाठी फीज न घेता पालिका शाळेतील मुलांना कराटे शिकवण्याचा त्यांचा उद्देश होता आणि त्यासाठी त्यांना नवघरच्या शाळेचा पटांगण आवश्यक होतं मी त्यांना घेवून मा. सुरेश काकानी साहेबांची भेट घेतली मा. काकानी साहेबांनी शिक्षण विभागाला आदेश देवून नवघरच्या शाळेचा मैदान त्यांना शनिवार आणि रविवारसाठी दिलं आणि आज त्या शाळेने महापालिका शाळेतील दोन विद्यार्थ्याने 2014 साली नॅशनल जिंकली एक सुवर्ण पदक एक कास्य पदक मिळवलं त्यानंतर ह्याच मुलांने त्या काळामध्ये दोन वर्षानी सुवर्ण पदकाचा तो नॅशनलचा मानकारी ठरला आणि आज तो मुलगा इंडिय रिकॉर्ड ऑफ बुकमध्ये आपल्या शहराचं नाव उज्ज्वल करतोय काकानी साहेबांनी जर ती परमीशन दिली नसती तर कदाचीत हे मोहरे आपल्या नजरेस आज आले नसते म्हणून मला असे वाटते ह्या मुलाचा सत्कार होणे गरजेचे आहे आणि आपण त्याचा सत्कार करतात याचा मला खूप आनंद देखील आहे तरी ह्या मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण त्याला शुभेच्छा दुवूया धन्यवाद.

**प्रविण पाटील :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडमने जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्याशी मी सहमत आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, ज्यांनी हे प्रस्ताव दिले महापौर मॅडम आताच आपण मोटरमॅन माजी सैनिक चंद्रकांत भिकाजी सावंत यांचा सत्कार केला पण ज्यांनी याचा प्रस्ताव आपणाकडे दिले त्या सन्मा. सदस्यांना तरी त्यांच्या विषयाच्या भावना कळू द्या, पहिले त्यांना ही बोलू द्या.

**हेतल परमार :-**

नमस्कार मॅडम, दि. 03/07/2018 रोजी जी दुर्घटना घडली होती त्यावेळेला माझे प्रभाग 20 सेक्टर 07 मध्ये राहणारे श्री. चंद्रशेखर भिकाजी सावंत यांनी वेळेवर ट्रेल स्टॉप करून सगळ्यांचा जीव

वाचवला ती खूप मोठी आणि गर्वास्पद कामगिरी त्यांनी केलेली आहे. 2018 नंतर आपण महासभेमध्ये काही दु:खाचे असतांना आपण ते प्रस्ताव घेवू शकलो नाही आणि त्यानंतर कोविड प्रादुर्भावामध्ये दोन वर्षे गेले त्यामुळे त्यांचा सत्कार करायला खूप उशीर झाला पण आपण हे सत्कार केलं त्यासाठी मी आपण सर्वांचा खूप अभिनंदन करत आहे आणि तसेच श्री. चंद्रशेखर भिकाजी सावंत यांचा ही अभिनंदन आपल्या संपूर्ण मिरा भाईंदरच्या नागरिकान तर्फे करित आहे. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

पुढील सत्कार आहे कुमार करण पवार मिरा भाईंदर शाळा क्र. 13 नवघर मराठी शाळेचे विद्यार्थी करण पवार यांनी भारतीय क्रिडा विश्वातील सुवर्ण पदक विजयता ठरल्याबद्दल त्यांचा ह्याठिकाणी शाल पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात येत आहे. करण पवार यांचे आई-वडिल तसेच प्रशिक्षक हे देखील ह्याठिकाणी मा. महापौरांच्या मान्यतेने त्यांना ही डायसवर बोलवून त्यांचा ही करण पवार यांच्या बरोबर सन्मान करण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने आजचे दोघही पुरस्कार प्राप्त पहिल्यांदा श्री. चंद्रकांत भिकाजी सावंत हे मोटर मॅन असून मिरा भाईंदर शहरामध्ये मिरा रोड विभाग राहत आहेत 03 जुलैच्या अंधेरीपुल दुर्घटने वेळी श्री. चंद्रकांत भिकाजी सावंत यांनी मोटरमॅन ह्या नात्यांने प्रसंगावधान राखून अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचविण्यात मोलाची भूमिका निभावली होती. श्री. सावंत यांनी एका मिनीटाचा देखील विलंब केला असता तर निष्पाप नागरिकांचा जीव गमवावा लागला असता त्यांनी केलेल्या ह्या साहसीक कार्याची दखल घेत मा. रेल्वे मंत्री श्री. पियुषजी गोयल यांनी रक्कम 05 लाख इतका धनादेश त्यांना सुपुर्द केला आहे. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रातील श्री. करण पवार या तरुणांने वयाच्या केवळ 19 व्या वर्षी इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपलं नाव कोरून आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव गौवरवीत केले आहे त्यांनी त्यांच्या ह्या प्रवासात एकूण 52 पदके व 52 प्रमाणपत्रके कमवली असून श्री. करण पवार यांची गिनीस वर्ल्ड ऑफ रेकॉर्ड बूक मध्ये नाव कोरून सुवर्ण पदक मिळविण्याची इच्छा आहे तरी सभागृहात उपस्थित सन्मा. नगरसेवक / नगरसेविका / अधिकारी / कर्मचारी बंधु यांच्या तर्फे त्यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा व त्यांना अभिनंदन करत आहे. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेच्या कामकाजाला आपण मा. महापौरांच्या परवानगीने सुरूवात करतो. प्रश्नोउत्तराच्या तासासाठी सन्मा. सदस्य अलिन सावंत यांचे प्रश्न आपणाला प्राप्त झालेले आहेत हे प्रश्न महासभेची सुचना ज्यावेळी तयार केली गेली त्याच वेळीस आली आहेत. प्रशासनाच्या वतीने अशी माहिती मिळाली आहे की, ह्या सदर प्रश्नाच्या संदर्भामध्ये अन्य विभागाकडून माहिती घेणे अपेक्षित असल्याने अद्याप पर्यंत आपल्याला प्रश्नाची उत्तरं देण्यात आलेली नाहीत त्यांचे सगळे प्रश्न 1 ते 5 हे पुढच्या महासभेमध्ये घेण्यात येतील.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम नमस्कार, प्रश्न उत्तराचा तास सुरू होण्यापूर्वी मा. सभागृहनेत्यांनी आपल्याला एक विनंती केली होती की, ज्यांनी पत्र दिलेले आहेत, चंद्रकांत सावंत यांचा सत्कारासाठी त्यांचे काही आपले मत मांडू द्या पण त्याच्याबद्दल दुर्लक्ष केला गेला मा. डिम्पल मेहता मॅडम महापौर असते वेळी मी पत्र दिला होता. चंद्रकांत सावंत यानी केलेली जे कार्य आहे ते अतुलनीय आहे त्यांचा बऱ्याच ठिकाणी सत्कार झाला परंतु मिरा भाईंदर महानगरपालिके तर्फे सत्कार झालेला नही तरी लवकरात लवकर सत्कार करावे ठीक आहे आपण दोन-अडीच वर्षा नंतर करतो आहोत आपण एक चांगला

व्यक्तीचा सत्कार ह्याठिकाणी आपल्या हस्ते होतोय आता हे वर्च्युव्हल मिटींग असल्यामुळे इतर ज्याप्रमाणात सत्कार होतात, ज्याप्रमाणात सभागृहाचे कामकाज असते ते कुठे होत नाही आणि त्यामुळे असे जे काही सत्कार असतील ते लवकरात लवकर मी विनंती करतो आपल्याला ज्यावेळी वर्च्युव्हल मिटींगचा पायंडा संपेल त्यावेळी सर्व पेन्डींग सत्कार तुम्ही सभागृहामध्ये ज्यावेळेस डायरेक्ट मिटींग होईल त्यावेळी घ्यावेत. चंद्रकांत सावंत हे माझे कौटुंबिक मित्र आहेत त्यांनी केलेला कार्य अतुलनीय आहे त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सावंत साहेब, मिरा भाईंदर शहरामध्ये जितके पण सत्कार आहेत त्या सर्वांना आपण सभागृहामध्ये बोलवून नक्की सत्कार करुया.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, सचिव साहेब, विषय असा आहे की, आता अनिल सावंत यांनी जे प्रश्न विचारले होते त्याची माहिती अद्याप ही प्राप्त झालेली नाही असे सचिवांचे म्हणणं आहे त्यामुळे ते पुढील मिटींगमध्ये ठेवण्यात येत आहेत परंतु मला एक सांगायचे आहे महापौर मॅडम हे विषय जे अनिल सावंत यांनी घेतलेले आहेत ते खूप गंभीर विषय आहेत आणि त्याची माहिती ह्या सभागृहाला होणे क्रमप्राप्त आहे आणि महापौर यांना मी आपणांस विनंती करेल की, पुढची महासभा लागेल त्यावेळेला हे प्रश्न येतीलच परंतु तत्पुर्वी आपल्या माध्यमातून आपण तेथील स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी, गटनेते यांची एक बैठक आपल्या दालनात बोलवावी जेणेकरून ह्या प्रश्नाची जान आपणाला ही होईल त्याचा स्पष्टीकरण आपणाला करता येईल जेणेकरून पुढच्या महासभेमध्ये याचा खुलासा आपण प्रशासनाच्या वतीने देण्यात येईल आपल्याला अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर** :-

नक्की, सभागृहनेत्यांनी जी विनंती केलेली आहे ती मान्य करते माझ्या दालनामध्ये श्री, अनिल सावंत तसेच इतर सन्मा. नगरसेवक आहेत त्यांनी ह्या प्रश्नावरती पत्रव्यवहार केलेले आहेत त्या सर्वांना बोलवून तसेच संबंधित अधिकाऱ्यांना बरोबर चर्चा करून हा विषय सोडवण्याचा प्रयत्न करूया.

**प्रशांत दळवी :-**

धन्यवाद महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

सचिव साहेबा, विषयाला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 16, भाईंदर (पूर्व) येथील स्व. इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन, देखभाल दुरुस्तीचे कामाबाबत.

**राकेश शाह :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव येथील आरक्षण क्र.121 वाचनालयाकरीता आरक्षित होते. सदर आरक्षण महापालिकेमार्फत विकसीत करुन वाचनालयाची इमारत बांधण्यात आलेली आहे.

सदर ग्रंथालयाचे व्यवस्थापन, पुस्तकांची देखरेख व देखभाल करणे, ग्रंथपाल व आवश्यक कर्मचारी वर्ग, आवश्यक पुस्तके उपलब्ध करणे, फर्निचर व्यवस्था करणे, डिजीटल लायब्ररी, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अभ्यासिका, ग्रंथालय चालविणेकरीता प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमणे, इमारतीची देखभाल व साफसफाई व सुरक्षेची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता विविध उपक्रम पालिकेमार्फत राबविल्यास महापालिकेचा खर्च होईल.

महापालिकेचा खर्च वाचविणेकरीता उपरोक्त सर्व सुविधा व कामांचा आराखडा पालिकेने तयार करुन वरील आवश्यक सर्व कामे मे. अभियान या संस्थेने स्वखर्चाने करण्यास मे. अभियान या संस्थेस सदर ग्रंथालय रु.100/- प्रती महिना या नाममात्र भाडयाने 9 वर्ष देणेकरीता करारनामा करणेस व पाणी बिल, लाईट बिल व सुरक्षा रक्षक महापालिकेतर्फे विनामुल्य देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**गणेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आवाज स्पष्ट नव्हता. ते किती वर्षासाठी आहे?

**मा. महापौर :-**

नऊ वर्षासाठी आहे.

**अनिल सावंत :-**

मगाशी सचिव साहेबांनी ज्यावेळी प्रश्नोउत्तराचा तास चालू केला होता त्यावेळी मला वास्तविक बोलायचे होते, बोलायला द्यायला पाहिजे होते, प्रश्नोत्तराचा तास होता प्रश्न विचारले होते, आपले आयुक्त कार्यक्षम आहेत आणि जर ते डिपार्टमेंट उत्तरं देत नसेल तर ह्याला काय अर्थ आहे. चर्चा होऊ शकते ना. ज्यावेळी प्रश्नाची उत्तरं दिले ते सर्व सदस्यांना अपेक्षित असते म्हणजे उत्तरं मिळतील पण प्रशासन नाहक सभेमध्ये आपली भूमिका मांडू शकते ना, ते प्रश्नाचे उत्तर देवू शकते, परत प्रशनोत्तराला आणखी एक महिना घेणार.

**मा. महापौर** :-

शिरवळकर साहेबांनी याचा खुलासा आधीच केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

त्या खुलाशाला काही अर्थच नाही, सचिव काय खुलासा करतील, प्रश्नोउत्तर प्रशासनाने महासभेमध्ये द्यायला पाहिजे उत्तर राईटींगमध्ये नाही दिली तर माहिती त्यांच्याकडे नसते, प्रशासनाने का माहिती दिली नाही?

**मा. महापौर :-**

प्रशासनाने खुलासा करा की का उत्तरं दिली नाही.

**नगरसचिव :-**

सावंत साहेब, मी ह्यापुर्वीच सांगितले होते की, प्रशासनाकडून असे समजले आहे की, त्यांना तुम्ही जे विचारलेले प्रश्न आहेत त्या संदर्भामध्ये अन्य विभागाकडून माहिती घेवून तुम्हाला उत्तर देणे अपेक्षित आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, एका विभागाचा प्रश्न होता टाऊन प्लॅनिंगचा सर्व रेडीमेट इनफॉर्मेशन आहे मी काय फार मोठी इनफॉर्मेशन मांगितलेली नव्हती, का देवू शकत नाही?

**मा. महापौर** :-

सावंत साहेब आता जर त्यांच्याकडे उत्तर उपलब्ध नसेल तर माझी तुम्हाला विनंती आहे की, पुढच्या महासभेमध्ये प्रशासनाच्या वतीने तुम्हाला नक्कीच उत्तर मिळेल आणि पुन्हा प्रशासनाने अशा पध्दतीने असे करू नये, ज्या ज्या सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारले असतील त्यांना त्या त्या महासभेमध्ये लगेच उत्तरं देण्यात यावी. सचिव साहेब पुढच्या विषयाला सुरूवात करा. प्रकरण क्र. 16 हया विषयावर अजून कुठल्या सदस्याला बोलायचं आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, माझा प्रश्न प्रशासनाला असणार आहे जे तुम्ही खाजगी संस्था चालवायला देणार आहेत, मला वाटते हा महापालिकेचा प्रथम प्रयोग आहे तर हया संस्थेच्या वतीने जेव्हा हे कामकाज सुरू होईल तेव्हा विद्‌यार्थ्यांकडून काही शुल्क आकारला जाईल का? त्याचे निष्कर्ष काय ठरवले आहेत याची कुठ माहिती याच्यामध्ये दिलेली नाही. आयुक्त महोदय हा प्रयोग प्रथमत: आलेला आहे. ते खर्च करतील हे मान्य आहे, पुस्तकांवर करतील, डिजीटल, लायब्ररीवर करतील हे सगळे काही मान्य आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, जुबेर इनामदारजी तुमचा प्रश्न नीट समजला नाही.

**जुबेर इनामदार :-**

लाभार्थ्यांकडून ग्रंथालयामध्ये चालवायला देणारा मला वाटते हा महापालिकेचा पहिलाच प्रयोग आहे म्हणजे खाजगी संस्थेचा.

**दिपक खांबित :-**

त्यांच्याकडून कुठलेच पैसे घेणार नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

मग कोणाकडून घेणार?

**दिपक खांबित :-**

आपण वास्तु म्हणून फ्री देतो.

**जुबेर इनामदार :-**

आपण त्यांना वास्तु फ्री देतो का ते लाभार्थ्यांकडून घेतील का?

**दिपक खांबित :-**

नाही सर,

**जुबेर इनामदार :-**

असा काही उल्लेख गोषवाऱ्यामध्ये नाहीच आहे.

**दिपक खांबित :-**

आपण त्यांना लाईट, पाणी, सिक्युरिटी आणि जागा ही नाममात्र भाड्यांने देतो, तिकडे स्वखर्चाने सगळे फॅसिलिटी तयार करणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

लाभार्थ्यांकडून काही शुल्क आकारणार आहेत का?

**दिपक खांबित :-**

लाभार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारे ते पैसे घेणार नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या गोषवाऱ्यामध्ये तसा काही उल्लेख नव्हता. दुसरे ही जागा आपली शंभर टक्के ताब्यात आहे का?

**दिपक खांबित :-**

शंभर टक्के जागा आपल्या ताब्यात आहे, आपले नावावर सात बारे आहेत पाचशे चौ. क्वेअर मीटरचा तेवढी मान्य आहे प्रत्यक्षात जागा 650 चौ.मी. ताब्यात आहे आपल्या नावावर झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

एकूण जागा किती आहे?

**दिपक खांबित :-**

आरक्षणाचा क्षेत्र आहे, डी.पी. मधलं पाच शे प्रत्यक्षात 650 जागेवरती आणि तेवढी आपल्या ताब्यात आहे आणि आपण रितसर नकाशे वगैरे मंजुर केले आणि बांधकाम जवळ जवळ पूर्ण झालेला आहे. आणि ह्या संस्थाकडून सगळे प्लॅन सुध्दा आपल्याकडे आलेले आहेत तिथे काय करणार आहेत आणि चांगले प्लॅन आहेत म्हणून आपण शिफारस केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

चांगली गोष्ट आहे, प्रशासनाचा अभिनंदन धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. 16 :-**

भाईंदर (पूर्व) येथील स्व. इंद्रबहाद्दुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन, देखभाल दुरुस्तीचे कामाबाबत.

**ठराव क्र. 17 :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव येथील आरक्षण क्र.121 वाचनालयाकरीता आरक्षित होते. सदर आरक्षण महापालिकेमार्फत विकसीत करुन वाचनालयाची इमारत बांधण्यात आलेली आहे.

सदर ग्रंथालयाचे व्यवस्थापन, पुस्तकांची देखरेख व देखभाल करणे, ग्रंथपाल व आवश्यक कर्मचारी वर्ग, आवश्यक पुस्तके उपलब्ध करणे, फर्निचर व्यवस्था करणे, डिजीटल लायब्ररी, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अभ्यासिका, ग्रंथालय चालविणेकरीता प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमणे, इमारतीची देखभाल व साफसफाई व सुरक्षेची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता विविध उपक्रम पालिकेमार्फत राबविल्यास महापालिकेचा खर्च होईल.

महापालिकेचा खर्च वाचविणेकरीता उपरोक्त सर्व सुविधा व कामांचा आराखडा पालिकेने तयार करुन वरील आवश्यक सर्व कामे मे. अभियान या संस्थेने स्वखर्चाने करण्यास मे. अभियान या संस्थेस सदर ग्रंथालय रु.100/- प्रती महिना या नाममात्र भाडयाने 9 वर्ष देणेकरीता करारनामा करणेस व पाणी बिल, लाईट बिल व सुरक्षा रक्षक महापालिकेतर्फे विनामुल्य देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. गणेश भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 17, भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथील स्मशानभूमी दैनंदिन संचलन, देखभाल व दुरस्तीसाठी खाजगी संस्थेस देणेबाबत निर्णय घेणे.

**शानु गाहिल :-**

परहित सेवा संघातर्फे भाईंदर (पु.) बंदरवाडी येथील स्मशानभूमीचे दैनंदिन संचलन व देखभाल सुमारे 20 वर्षापासून योग्य रितीने करीत असल्याने शहरातील इतर स्मशान भूमीपेक्षा या स्मशान भूमीची स्वच्छता व देखभाल चांगली आहे. म्हणून भाईंदर (पु.) बंदरवाडी येथील स्मशानभूमीची दैनंदिन संचलन करण्याकरीता परिहित सेवा संघाला 9 वर्ष देणेस व सदर संस्थेस या स्मशान भूमीत अंत्यविधी नंतरची पुजा करणे, अन्नदान करणे, स्मशान भूमी गरजेप्रमाणे विकसीत करणे, स्मशान

भूमीमध्ये लाईट, पाणी, सुरक्षा रक्षक महापालिकेतर्फे विनामुल्य देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**श्रीप्रकाश सिंग :-**

माझा अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम आता जो ठराव मंजुर झाला आयुक्तांनी त्याच्यावर गोषवारा दिलेला आहे, त्यांच्या गोषवाऱ्यामध्ये ज्या काही कंडीशन टाकलेल्या आहे त्या कंडीशनवर आयुक्तांचे मत काय आहे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की, अमुक अमुक रोजी करता येणार नाही नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. परत पुन्हा वाद सुरू नाही झाला पाहिजे. आता जे वर्षे दोन वर्ष चाललं होतं त्याच्यावर आयुक्तांच आपल्या सभागृहाचं काय मत ठरलेला आहे. कारण तिथे राहणाऱ्या लोकांच्या काही तक्रारी होत्या आयुक्तांच्या गोषवाऱ्यामध्ये स्पष्ट लिहिलेलं आहे की, ह्या ह्या तक्रारीवर अशा प्रकारे करणे योग्य नाही. आपलं नक्की याच्यावर काय मत आहे, सभागृहाने आपण ठराव दिला नंतर मग वादविवाद सुरू झाले ह्याच्याबद्दल काय मत आहे नक्की ते आयुक्तांनी स्पष्टीकरण द्यावं आणि महापौरांना आपण ही स्पष्टीकरण द्यावं.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सर याच्याबाबत स्थानिक लोकांचे वाद होते, तक्रारी होत्या आणि तिकडे जे अन्न दान होत त्याबाबत तक्रारी होत्या म्हणून ते आम्ही आमच्या गोषवाऱ्यात म्हटले होते की, अन्नदान आणि पुजापाट हे जरा बंद केले तर बरं होईल म्हणजे तक्रारी होणार नाही.

**राहिदास पाटील :-**

घेणाऱ्या संस्थेने ते मान्य केले आहे का? नाही तर मग ते अग्रह करणार हे विरोध करणार मग हे प्रकरण पुन्हा आयुक्तांच्या बैठकीमध्ये होणार.

**शानु गाहिल :-**

महापौर मॅडम मला बोलायचे आहे, महापौर मॅडम प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे त्या गोषवाऱ्यामध्ये असे नमूद केलेले आहे तिकडे त्या परि सेवा संघ संस्था द्वारा अन्नदान आता अन्नदान समशानभूमि मध्ये कोण करणार ज्यांच्या घरी मृत्यु व्यक्ती असेल त्याच्या नावाने ते घरी करू शकत नाही म्हणून त्या समशानभूमि मध्ये काही भंडारा किंवा असे काही घडत नाही आणि फक्त तिकडे मृत्यु पावलेल्यांचे घरचे त्यांना पैसे देतात आणि त्यांना सांगतात की तुम्ही आमच्या तर्फे म्हणजे जो मृत्यु पावलेला माणूस आहे त्यांच्या नावाने तुम्ही त्यांना जेवण द्या आणि तिकडे काही भंडारा असे काही होत नाही, ह्याबाबतीत प्रशासनाला काही गैरसमज झालेला आहे त्यांना काही चुकीची माहिती दिलेली आहे आणि मला असेच बोलयचे होते की मारवाळी, गुजराती, मराठी असे किती जातीचे लोकं आहेत आणि त्यांचे वेगवेगळे रितीरिवाज असतात. आपण आता बघायला गेलो तर चौपाटीला आपण दशक्रिया विधी केलेली आहे सेम दशक्रिया मध्ये विधी करायला पंडितला तिकडे घेऊन जातो तिकडे ते विधी करतात तसेच परिसेवा संघ हा गेल्या वीन वर्षापासून ह्या संस्थे द्वारा तिकडे अन्नदान आणि मंदिर आणि पंडित हे सगळे ते जे मृत्यु पावलेल्यांच्या ज्यांचे घरातले लोक आहेत ते तिकडे येवून त्यांना पैसे देवून त्यांना सांगतात की तुम्ही हे सगळे विधी करा कारण हे घरच्यांना पॉसिबल नाही ते करू शकत नाही म्हणून ते संस्थे द्वारा सांगतात की तुम्ही हे करा आणि मला असे वाटते.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, मी सुरूवातीलच मी आपल्याला लेखी पत्र दिलं होतं मला काही विषयावर मत मांडायची आहेत कृपया जरा संधी देण्यात यावी. मॅडम मगाशी 16 नंबरचा विषय होता ग्रंथालय महापालिकेने करोडो रुपये खर्च करून इमारत बांधली सात बारा आपल्या नावावर आहेत का त्या

विषयी मला काही मिळाले नाही आणि आज महापालिका ग्रंथालय चांगल्या प्रकारे चालवतेय, पॉपर्टी आपल्या पैशांने करायची आणि दुसऱ्याला देवून टाकायची पॉपर्टी आणि ह्या पूर्वी ज्या आस्थापना महापालिकेने भाड्यांने दिलेले आहेत त्यांची जर परिस्थिती बघा मॅडम ह्या बाबतीत पूर्ण महापालिका क्षेत्रामध्ये 17 स्मशानभूमि आहेत.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. 17 चा ठराव आलेला आहे, ह्या विषयी चर्चा झालेली आहे. ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. 17 :-**

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथील स्मशानभूमी दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी खाजगी संस्थेस देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. 18 :-**

परहित सेवा संघातर्फे भाईंदर (पु.) बंदरवाडी येथील स्मशानभूमीचे दैनंदिन संचलन व देखभाल सुमारे 20 वर्षापासून योग्य रितीने करीत असल्याने शहरातील इतर स्मशान भूमीपेक्षा या स्मशान भूमीची स्वच्छता व देखभाल चांगली आहे. म्हणून भाईंदर (पु.) बंदरवाडी येथील स्मशानभूमीची दैनंदिन संचलन करण्याकरीता परिहित सेवा संघाला 9 वर्ष देणेस व सदर संस्थेस या स्मशान भूमीत अंत्यविधी नंतरची पुजा करणे, अन्नदान करणे, स्मशान भूमी गरजेप्रमाणे विकसीत करणे, स्मशान भूमीमध्ये लाईट, पाणी, सुरक्षा रक्षक महापालिकेतर्फे विनामुल्य देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 18, महापालिकेच्या DCH/DCHC/CCC रुग्णालय येथे विना हत्यारी पुरुष व महिला सुरक्षा रक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे, ह्या गोषवाऱ्यामध्ये त्यांनी सांगितले आहे अनुक्रमांक 151 मध्ये असे नमूद आहे की स्टेट गव्हर्नमेंट ऑफिसेस ऑर्गानायझेशन ॲन्ड पब्लीक सेंटर ऑफ द स्टेट गव्हर्नमेंट कॉल बी मॅनडीटेड व्हीथ टेक सिक्युरिटी फॉर द कॉर्पोरेशन ह्या वरून महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांच्याकडून महापालिकेने सुरक्षा रक्षक नेमणूक करणे बंधनकारक आहे. मॅडम याचा अर्थ असा होत नाही की महानगरपालिकेला ह्या स्टेट सिक्युरिटी बोर्डाची सुरक्षा रक्षक घेणे हे क्रमप्राप्त आहे किंवा बंधनकारक आहे असे कुठेही बोध होत नाही त्याप्रमाणे हे जे दिलेले आहे त्याच्यामध्ये असे स्पष्ट नमुद आहे की फक्त स्टेट गव्हर्नमेंटच्या ऑफिसेस मध्ये आणि पब्लीक सेंटर अंडरटेकींगमध्येच ते मॅनडीटेड आहेत महापालिकेला मॅनडीटेड नाहीत जर हे मॅनडीटेड नसतांना आपल्याला घेयायची गरज काय? प्लस ह्या सिक्युरिटी बोर्डाकडून जर आपण सिक्युरिटी घेतली तर आपल्या प्रती माणूस दोन हजार रुपये जास्त द्यावे लागतात त्याच्यानंतर आणखी तीन महिन्याची त्यांची सॅलरी आपल्याला ॲडव्हान्स द्यावी लागते सर्व्हिस डिपोझीट म्हणून त्याच्यानंतर प्रत्येक महिन्याला आपल्याला त्याचा पगार हा ॲडव्हान्स दिला जातो आणि ही लोक आपल्याला कोणताही सिक्युरिटी डिपोझीट किंवा अनामत रक्कम किंवा बँक गॅरंटी हे देणार नाहीत म्हणजे महापालिकेचा हा

असा प्रथमच कॉन्ट्रक्ट झालेला आहे नाही तर प्रत्येक कॉन्टॅक्टमध्ये प्रत्येक याच्यामध्ये महापालिका त्यांच्याकडनं काही ना काही सिक्युरिटी घेते, काही ना काही लिहून घेते, बँक गॅरंटी घेते परंतु ह्या केसमध्ये महापालिकेने त्यांना सिक्युरिटी डिपोझीट दिलेली आहे, हे म्हणजे सगळं उलटं चाचलेलं आहे आणि जो काही गोषवारा आपल्याला दिलेला आहे महापौर मॅडम, हे टोटल चुकीचा आहे महापौर दालनामध्ये मिटींग झाली होती ह्या विषयाबाबत असे सांगितले होते की, फक्त महापालिकेच्या ऑफिसेस आणि जर पोलिसांना पाहिजे असेल तर ते तासीक ऑर्डरसाठी पोलीसांनी डिमांड केली होती तर आपण असे म्हटले होते की पोलिसांना पाहिजे असेल तर ते ट्रॉफीक वॉर्डन कमी करून स्टेट सिक्युरिटी बोर्डाची घ्यावी. काही प्रतीनिधीने मॅडम आपल्याकडे प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आणि सांगितलं की सिक्युरिटीची गरज नाही माणसं सेट सिक्युरिटी बोर्डाची सिक्युरिटी घ्या आणि आता परत तेच लोकप्रतिनिधी म्हणता का म्हणतात, की महापालिकेच्या मी असे सांगितले की ह्या गोषवारामध्ये जे प्रशासनाने म्हटले आहे ते चुकीचे म्हटलेले आहे त्याच्यामध्ये महापालिकेला हे सिक्युरिटी घेणे बंधनकारक नाही आणि तसेच महापालिकेला याच्यामध्ये आर्थिक नुकसान ही होतोय त्याच्यामध्ये आपल्याला तीन महिन्याचा पगार सिक्युरिटीना द्यावा लागतो, एक महिन्याचा ॲडव्हान्स पगार द्यावा लागतो हे टोटल चुकीचा आहे महापालिकेने यांच्याकडून काही बँक गॅरंटी घेतलेली नाही उलट महानगरपालिकेने त्यांना सिक्युरिटी दिलेली आहे हे प्रथम इतिहासामध्ये असे होत आहे. त्याच प्रमाणे मॅडम मी तुम्हाला सांगतो की ह्या सिक्युरिटी पोस्टने ज्या महापालिकेवरती ॲग्रीमेंट करत आहेत हे ॲग्रीमेंट 12 महिन्याचा करता आहेत आणि 11 महिन्याचा अँग्रीमेंट प्रशासनाने ह्यांना करून दिलेला आहे मॅडम वास्तविक आयुक्त साहेबांनी त्यांचा अधिकार वापरलेला आहे 673 म्हणजे आणीबाणीच्या काळामध्ये हा वापर केला जातो पण आपल्याला पाहिजे असेल तर 3 महिन्सासाठी आपण करू शकतो, 04 महिन्यासाठी आपण करू शकतो तर आपल्याला 11 महिन्यासाठी किंवा 01 वर्षासाठी करणे गरजेचं नाही त्याच बरोबर ज्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये असे म्हटलेले आहे की, जर अ क्लाईन्ट प्रिमायसेस विथ इनक्लूड टेबल प्लस चेअर स्टोअर रुम फॉर इपीक सिक्सुरिटी गॅजेट फॅसिलिटी फॉर रेस्ट चेंजींग रूम फॉर ऑदर परसन म्हणजे आपण महानगरपालिके मार्फत त्या लोकांना जागा, टेबल फर्नीचर वगैरे सर्व उपलब्ध करून देणार आहोत. मॅडम हे आणखीन एक्ट्रा खर्च करण्याची गरज काय? अजून पर्यंत आपण कोणत्याही सिकयुरिटी एजन्सीला अशा प्रकारे कोणताही खर्च करून दिलेला नाही आणि त्याचप्रमाणे जर समजा प्रशासनाला पाहिजे होतं तर त्यांनी फक्त आणि फक्त आणीबाणीच्या काळासाठी त्यांनी घेतला पाहिजे होतं हे 11 महिन्यासाठी घेयायची काही गरज नाही आणि तोच मॅडम आज ह्या सिक्युरिटी बोर्डाना आपण सिक्युरिटीचा कॉन्ट्रक्ट दिल्यामुळे आपल्या इकडचे स्थानिक लोक भूमिपुत्र हे वंचीत राहिलेले आहेत आणि आज अनेक लोकांचे उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण झालेला आहे तर माझी आपणांस विनंती आहे की, आपण असे आदेश द्यावा की जर आयुक्त साहेबांना पाहिजे असेल तर फक्त महापालिकेसाठी घ्यावा किंवा हॉस्पीटलसाठी घ्यावा किंवा जर त्यांना पाहिजे असेल तर ट्रॉफीक पोलिसांकरिता जे ट्रॉफीक त्यांना सुरळीत करायची असेल त्याचा पोलिस डिपार्टमेंटला त्यांनी द्यावा बाकीच्या ठिकाणी त्यांना द्यायची गरज नाही आपला महापालिकेचा वाढवू शकतो आणि आपल्याला ॲडव्हान्स वगैरे द्यायची काही गरज नाही आणि द्यायचे असेल तर त्यांच्याकडून त्यांची बँक गॅरंटी घेतली पाहिजे. उद्या उठून कॉर्पोरेशन कडनं म्हणजे सिक्युरिटी कॉर्पोरेशन कडनं म्हणजे हे पैसे आपल्याला रिटर्न भेटणार नाही तर आपला पैसा वेस्ट होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आदरनीय महापौर मॅडम, आदरणीय आयुक्त साहेब आणि सर्व मान्यवरांना ह्या विषयात माझा एक निवेदन असा आहे की आयुक्त साहेबांनी साथीचा रोग अधिनियम साथ रोग प्रतिबंधक अधिनियम 1897 खंड 2,3,4 आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या तरतुदी प्रमाणे स्वत:चा

अधिकारात निर्णय घेतलेला आहे पंरतु आयुक्त साहेब आणि सर्व सभागृहाला मी विनंती करतोय की हा कायदा तेव्हाच वापरता येतो जेव्हा लोकप्रतीनिधीच्या सभा होत नाहीत आता आपली महासभा होते भले ऑनलाईन सभा असेल ऑनलाईन सभेत प्रत्येकाला आपली उत्तरं देता येत नाहीत आपली मतं व्यक्त करता येत नाही पंरतु हा कायदा वापरतांना आयुक्त साहेब हा आधीच्या वर्षात असता तर आम्ही एक वेळ मानला असता कारण तेव्हा सभा होत नव्हत्या आता सभा होत असतांना आपण जो कायदा वापरलेला आहे ह्या 67 च्या तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 च्या तरतुदी वापरल्यात पण साहेब तुम्ही ह्या तरतुदी वापरतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या 68 च्या 1 आणि 2 च्या तरतुदींचा तुम्हाला विसर पडलेला आहे. हा महापालिकेचा अधिकार आहे, हा सभागृहाचा अधिकार आहे, हा स्थायी समितीचा अधिकारी आहे ह्यांचा समोर हा विषय यायला पाहिजे होता. ह्याचा अर्थ असा नाही की पहिले जी सिक्युरिटी होती नानाची सिक्युरिटी त्याचा मी समर्थन करत नाही नानाची सिक्युरिटी म्हणजे साहेब तुम्हाला सांगतो सर्व सभागृहाला सांगतो की एखाद्या लाडक्या जावायाचं लाड करायचे, लाड पुरवायचे तसे नानाच्या सर्व कॉन्ट्रक्टाचे लाड पुरवले गेले, ह्याचा कॉन्ट्रक्ट संपल्यानंतर त्याला मुदतवाढ द्या त्याची इतर जी कामं आहेत त्यात देखील त्याला मुदतवाढ देतोय नानाचा काम चांगलं होतं असं नाही परंतु आयुक्त साहेब आपण महापौर मॅडम आपण याच्यामध्ये त्याच्या कामात कमतरता काय आहे, अनियमीतता काय आहे त्याच्यात त्याला सुधारणा करायला सांगायला पाहिजे. आपण आता ही सिक्युरिटी आणली पण ही सिक्युरिटी स्टेट गव्हर्नमेंट कडून जेव्हा आपण सिक्युरिटी आणतो तेव्हा त्यांना 23 हजार रुपये प्रत्येकी पगार जाणार आहे आणि एक सिक्युरिटी हा फक्त 8 तास सेवा देणार आहे आणि जेवढी सिक्युरिटी आपण मांगितली आहे खरं तर एवढया सिक्युरिटीची गरज नाही आता पेशट आपले 129 आहेत आणि सिक्युरिटी गार्ड जास्त आहेत म्हणजे मला असे म्हणायचे आहे की कोविड सेंटरसाठी आपण ही सुविधा आणली होती परंतु आता कोविडचा प्रादुर्भाव देखील कमी झालेला आहे त्याबद्दल आयुक्त साहेब तुमच आणि आपल्या आरोग्य कर्मचारी सगळ्यांचा मनपूर्वक स्वागत करतो परंतु आता सिक्युरिटी देणे हे मला योग्य वाटत नाही वास्तवत: तुम्ही ताबडतोब याचा ऐ आलेख तयार केला पाहिजे आणि त्या आलेखामध्ये कुठे किती गरज आहे म्हणजे मी परवा प्रमोद महाजन हॉस्पीटला गेलो त्याच्यामध्ये त्याच्यामध्ये पेशंट किती आहेत ते महत्त्वाचे नाही परंतु सिक्युरिटी सात आणि 7 त्रीक 21 म्हणजे एका दिवसाला 24 तासात 21 सिक्युरिटी तिथे लागत असतील. साहेब हे एका माणसाचे 23 हजार रुपये पगार आहे साधारणत: 8 करोड रुपये वर्षाला आपल्याला कम्पलसरी द्यावे लागतील, हजारो लोकांचा टॅक्सचा पैसा आहे आणि त्यातून शहराच्या हिताचा विकासाचे निर्णय घ्यायचे आहेत की, सिक्युरिटीसाठी दर वर्षी आपण 8 करोड रुपये खर्च करायचे आहेत तर माझा असा म्हणणं आहे की सिक्युरिटी गार्डची किती मोठी आवश्यकता आहे, किती गार्ड तिथे पाहिजे याची माहिती घेतली पाहिजे आणि कुठच्या जागेवरती हे गार्ड आवश्यक आहेत त्याच जागांवर यांना ठेवा आणि ज्यांना पण आपण ठेकेदार म्हणून नेमणार असतो बघा आता हा ठेका आपण मान्य केला तर तुम्ही तर त्याला नियमाची अधिकाऱ्यांची पायमल्ली केलेली आहे आमच्या लोकप्रतिनिधीच्या हाक्काचा हानन झालेला आहे, इथले भूमिपुत्र आहेत वास्तवत: त्यांना 15-15 लोकांना ट्रेनींग द्यायला पाहिजे होती भूमिपत्र याचा अर्थ असा की सगळ्यांचे मी कौतुक करणार नाही परंतु इकडचे लोक होती ज्यांना आपण 15-15 लोकांना तीन-तीन महिन्याची ट्रेनींग दिली असती आणि त्या लोकांना तिथे उभ केले असते साहेब त्यांना ह्या मातीशी नातं टिकवायचे आहे आज कुठचे ही कोणी ही आले हे सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करतील जेवढी नोकरी आहेत तेवढीच करतील पण जबाबदारीचं काम करतील असे मला वाटत नाही, माझा असा ठाम मत आहे की आता ह्या कायदाचा वापर सक्षम प्राधिकारी ह्या कायद्याचा वापर आयुक्त साहेब तुम्ही करू शकत नाही, सभा होतात ह्या सभांमध्ये सभा होत असतांना सभागृह आहे अस्तित्वात मग सभागृहाची मान्यता का घेतली नाही? हा महासभेचा अधिकार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम 68 तरतुदीमध्ये कलम 1 आणि 2 मध्ये स्पसीपीक्ली म्हटले आहे की हा महासभेचा अधिकार आहे, स्थायी समितीचा अधिकार आहे मग त्या लोकांना विश्वासात घ्यायला पाहिजे होतं तुम्ही हा विषय आणला आहे आजचा मी तर म्हणेल की हा विषय पुन्हा महासभेसमोर आणावा याच्यामध्ये किती सिक्युरिटीची कपात आपण करू शकतो जेवढी आवश्यक आहेत तेवढी ठेवा आणि खरं तर एवढी सिक्युरिटीची गरज नव्हती नानाची लाड करण्यासाठी तो कोणा कोणा पोशींदा होता कोण ऑफिसर त्याच्या बरोबर होता, कोण नेतृत्व करत होता ह्या गोष्टचा पण माघावा घेतला पाहिजे आणि चुकीचा निर्णय घेऊ नका ह्या शहर वासीयांच्या रकमेवरती टॅक्सच्या पैशांवरती हा ढला आहे आणि आपण कोणाला तरी पोसायला घेतोय आज एवढीच संख्या उद्या ही संख्या वाढणार आहे आणि आपण आपल्या याच्यामध्ये डेल्टा गार्डनचा उल्लेख केला, डेल्टा गार्डनमध्ये आपले 626 बेड होते परंतु ह्या सेकंड व्हेवमध्ये आपण डेल्टा गार्डनचा एक ही बेड वापरला नाही आणि त्याठिकाणी बाहेरचे लोक असे हल्ला करायला जात नाही त्यात दुसरी केस अपवादात्मक होती स्वत:ची चुक कशी चुक नाही आणि बरोबर आहे दुसऱ्यावर आरोप करण्यासाठी प्रमोद महाजन हॉस्पीटलवरती हल्ला बिला झाला होता तो एकाच ठिकाणी झालेला पण त्याच्यासाठी का सगळ्यांना आतोषपीतोस लावला आपण हे चुकीचा आहे ह्या विषयाचा पुनर्विचार व्हायला पाहिजे ह्या मताचा मी आहे. धन्यवाद महापौर मॅडम.

**तारा घरत :-**

महापौर मॅडम एंशी टक्के स्थानिक लोकांना घ्यावे आणि त्यांना मराठी बोलता यावे अशी जास्तीत जास्त घ्यावी.

**मा. महापौर :-**

ठीक आहे तुमची सुचना घेण्यात येईल सन्मा. सदस्य सभागृहातले ज्यांनी ज्यांनी ह्या ठिकाणी सुचना मांडल्यात अजून भरपूर जणांना ह्या बाबत सुचना मांडायच्या आहेत परंतु हा विषय ह्याठिकाणी प्रशासना मार्फत प्रतिवृत्तसाठी आलेला आहे तर मला असे वाटते की, मा. आयुक्त महोदय सभागृहाच्या भावना जर आपण पाहिल्यात तर ह्या विषयावर एक दिड तास आपले सन्मा सदस्य बोलतील ऐवढ्या सगळ्या सदस्यांना ह्याठिकाणी बोलायचे आहे. महासभेचा जो अधिकार आहे तो महासभेला आपण दिला पाहिजे कारण तो सर्व लोकप्रतिनिधीचा अधिकार आहे तसेच स्थायी समितीचा जो अधिकार आहे तो त्यांना दिला पाहिजे तो त्यांचा अधिकार आहे. साहेब ह्याकडे आपण लक्ष ठेवा कारण आता परत हा विषय महासभेपुढे आणावा अशी सभागृहाची इच्छा आहे तेव्हा पुढच्या महासभेमध्ये हा विषय रितसर विषय पटलावर येवू द्या आणि ज्या ज्या सन्मा. सदस्यांना बोलायचे आहे त्या विषयावरती पुढच्या महासभेमध्ये आपण हा विषय घेतोय

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, हा विषय थांबवावं खरी गोष्ट पण त्याला मंजुरी दिलेले आहे, विषय विषयपटलावरच आहे ना.

**मा. महापौर :-**

अवलोकनासाठी आलेला आहे, प्रतीवृत्तसाठी आलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम स्थायी समितीमध्ये हा विषय मंजुरीसाठी घेतलेले आहे.

**उपमहापौर :-**

स्थायी समितीमध्ये पण प्रतीवृत्तच होतं.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम सध्याची परिस्थिती आहे म्हणजे तिथे चाललेला आहे ते तसाच ठेवायचं, विषय तुम्ही घेता आहेत. मॅडम दि 27/04/2021 रोजी तुमच्या दालनामध्ये गटनेत्याची बैठक बोलवली होती.

**मा. महापौर :-**

इनामदारजी म्हणून मी अशी रुलींग दिली की रितसर पुढच्या महासभेला हा विषय विषयपटलावरती येवू दया जेणेकरून आपल्या सर्व सदस्यांना त्याठिकाणी चर्चा करून एक निश्चित धोरण ह्या संदर्भामध्ये ठरवता येईल.

**जुबेर इनामदार :-**

दि 27/04/2021 रोजी तुमच्या दालनामध्ये गटनेत्याची बैठक बोलवली होती त्याच्यामध्ये उपायुक्त, पोलीस अधिकारी होते, महापौरांच्या अध्यक्षतेखाली, उपमहापौर होते, सभागृह नेते होते, विरोधी पक्ष नेते होते, स्थायी समिती सभापती होते आणि त्या सभेमध्ये आयुक्तांनी आपले निवेदन स्पष्ट केलं होतं की त्यांना महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे कर्मचारी हा हवे आहेत आजही माझी तुम्हाला विनंती आहे की आयुक्त महोदयांना त्यांना त्यांचा निवेदन करू द्या आम्हाला कोणाला एकाला बोलायची गरज नाही, नाना बरेच जुणे ठेकेदार ह्या महापालिकेचे असतील परंतु प्रशासनला त्यांच्या कामामध्ये कमीपणा वाटला असेल, योग्य कार्य करत नसतील म्हणून ही भूमिका घेतली आहे का प्रशासनाने आयुक्तांना त्यांया निवेदन करू द्या ना आपण का अशा प्रकारे कोणाला पाठीशी घालतोय. ह्या शहरातले भूमिपत्र आहेत त्यांना ही काम मिळाले पाहिजे ही आमची आपेक्षा आहे, ही आमची भावना आहे ह्या विषयावरती सुध्दा आयुक्त साहेबांची आज चर्चा होऊ शकते की, त्यांना कशा प्रकारे तुम्ही समावेश करून घेता आहेत तुम्हाला आज हा विषय इथे सोडून दिला तर पुढची सभा लागेपर्यंत आणि आयुक्तांच्या अधिकारात त्याचा गोषवारा पुढचे नाही दिला.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम माझी एक अशी विनंती आहे, महापौर मॅडम प्रशासनावरती आरोप करण्यापेक्षा प्रशासनाचं काम चांगला चाललेला आहे प्रामुख्यांनी मी आयुक्त साहेबांचा पण अभिनंदन करेल की त्यांनी ह्या कोविड काळात चांगली कामगिरी हाताळलेली आहे राहिला विषय महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाचा हाती का दिलं तर मला एक सांगायचे आहे आजपर्यंत सैनिक सिक्युरिटी मी काही सैनिक सिक्युरिटीचा हिस्सा नाही किंवा पार्टनर ही नाही किंवा त्याची बाजू ही घेत नाही परंतु जे आता आरोप करता आहेत, चर्चा करता आहेत ज्यांनी काल प्रेस कॉम्प्रन्स घेतली महाविकास आघाडीचे काही घटकांनी मग त्यांना काय म्हणायचं होतं मग त्यांच्याच एका लोकप्रतिनिधीने सैनिक सिक्युरिटी नको म्हणून या मिरा भाईंदरचे जे स्थानिक रहिवासी होते त्यांचा रोजगार हाडपून घेतला ना, त्यांना घरी पाठवल ना, त्यांच्यामुळेच झालं ना आज लोकसत्ता पेपरमध्ये, वर्तमान पत्रांमध्ये तशा बातम्या छापून आल्या, लोकप्रतिनिधीची नावं आली की हे सैनिक सिक्युरिटीला वगळा म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

दि 27/04/2021 रोजीची सभेमध्ये प्रशांत दळवी साहेब तुम्ही उपस्थित होता.

**प्रशांत दळवी :-**

दि 27/04/2021 रोजीच्या बैठकीमध्ये तुम्ही पण होता.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही आरोप करताहेत.

**प्रशांत दळवी :-**

माझा तेच म्हणणं आहे, की त्यावेळेला पोलीस प्रशासनचे डी.सी.पी. अमीत काळे ही होते, आपण ही होता, विरोधी पक्षनेते ही होते सभागृहात सगळे सन्मा. पदाधिकारी होते, महापौर होते, आयुक्त होते त्यावेळेला हे सगळे डिस्कशन झालं आणि आपल्याला अधिक मॅन पावर पाहिजे, पोलीसांना त्यामधले ह्या कोविड काळामध्ये दिडशे लोकांना तिकडे द्यायचं होतं त्यामुळे आपण निर्णय घेतला होता मग त्या वेळेला आपल्याला याची जान झाली नाही का, की हे आपले गावकरी आहेत ह्या मिरा भाईंदरचे भूमिपत्र आहेत त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न होता त्यावेळेला विचार नाही झाला का, मग

लोकप्रतिनिधीनी प्रशासनाला पत्र दिले आहे की ती सैनिक सिक्युरिटींना बंद करा म्हणून आणि ही सिक्युरिटी घ्या. आयुक्त महोदय हे खरं आहे आणि म्हणून माझी विनंती आहे महापौर मॅडम आपणाला मला काही याच्यावरती जास्त भाष्य करायचं नाही आपण म्हणालात की पुढच्या मिटींगमध्ये बोलू किंवा चर्चा करू परंतु ते सैनिक सिक्युरिटीमध्ये काही ट्रॉफीक वॉर्डन असतील, काही वयस्कर लोक असतील याच्यामध्ये शॉर्ट-आऊट करून जे मेंन महापालिकेमध्ये आपले जे सैनिक होते जे मिरा भाईंदरचे रहिवासी आहेत त्यांना ही आयुक्त महोदय ह्यामध्ये सामावून घ्यावं आपण पुरा मिरा भाईंदरचं जर चांगलं पाहत असाल तर ह्या लोकांना ही बेरोजगार करू नका अशी माझी विनंती आहे आपणाला महापौर मॅडम धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

दि 27/04/2021 रोजी तुमच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये पदाधिकारी व्यतिरिक्त ही काही लोक उपस्थित होती त्याची मला नावं घ्यायला करू नये

**मा. महापौर :-**

मला असे वाटते की आपण बैठकीमध्ये होतो म्हणून आता आपण बोलू नये, आयुक्त साहेब खुलासा देतील ना.

**जुबेर इनामदार :-**

म्हणून मी बोलतो त्यांची सुचना होती की हे कर्मचारी 175 - 170 कर्मचारी वाढवले तर सैनिक सिक्युरिटींच्या लोकांना कमी करा, तुमच्या दालनात मिटींग झाले तेव्हा तुमचे सदस्य होते ते पदाधिकारी नसतांना सुध्दा त्यांना चर्चा करण्याची संधी देण्यात आली होती, म्हणून आरोप कोणी कोणावर करू नये.

**मा. महापौर :-**

मला वाटते आता आयुक्तांचा खुलासा आपण घ्यावा, एकमेंकावर आरोप करण्यापेक्षा मा. आयुक्त खुलासा करतील.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय स्पष्ट करायचा, आयुक्त महोदयांनी त्या सभेमध्ये असलेल्या प्रत्येक विषयावर चर्चा करावी, सर्वांच्या समोर हा विषय ठेवला होता त्या चर्चेनंतर आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सैनिक सिक्युरिटी आजच्या अनुषंगाने महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्स ह्या दोन बाबी विषयी बोलतोय महारष्ट्र सिक्युरिटी फोर्ससाठी जे आपण ह्या गोषवाऱ्यामध्ये काय म्हटलेले आहे, काय बंधनकारक आहे, वेगवेगळ्या सदस्यानी जो उल्लेख केलेला आहे तर ह्या विषयी मी विन्रमपणे नमूद करू इच्छितो कि दि. 27/04/2021 रोजी आपण सर्व पक्षीय गटनेत्यांची महापौर मॅडमच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलवली होती त्या सदर बैठकीस मा. महापौर मॅडम उपस्थित होत्या, मा उपमहापौर साहेब होते, स्टँडिंगचे चेअरमन होते, दळवी साहेब होते, प्रविण पाटील साहेब होते, इनामदार साहेब होते आणि निमल ढवण मॅडम होत्या म्हणजे सांगण्याचा अर्थ की सर्व पक्षांचे सन्मा. गटनेते, विरोधी पक्ष नेते आणि प्रमुख नेते उपस्थित होते तर सैनिक सिक्युरिटी असणं का आवश्यक आहे त्या विषयी महत्त्व नमूद केलं होतं सैनिक सिक्युरिटी विषयी आलेल्या तक्रारी तुम्हाला सांगितल्या होत्या आणि महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्ड कायद्या काय तरतूद आहे, विधान मंडळात कायदा काय पास झालेला आहे आणि त्याच्यात काय अटी आहे आणि महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे लोकं कुठं कुठं कार्यरत आहेत, मुंबई महानगरपालिका, ठाणेला आहेत, वसई-विरारला आहेत, सिडकोला आहेत, एम.एम.आर.डी.ए. ला आहेत महाराष्ट्रातल्या जे गव्हर्नमेंटच्या प्रमुख संस्था आहेत, अंडरटेकींग आहेत आणि राज्य शासनाचे ऑर्गनायझेशन आहेत त्या सर्व ठिकाणी महारष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे हे सैनिक कार्यरत आहेत आणि त्यानुसार यांचे काम काय चालतं तर सदर येणारे जे कर्मचारी

आहेत त्यांना ट्रेनिंग दिले जाते, जशी पोलिसांची भरती होते तशी त्यांची भरती केली जाते त्यांना पोलिस कर्मचाऱ्यांचे पावर्स आहेत, पोलिसींगच्या पावर्स आहेत आणि त्यांना प्रॉपर प्रशिक्षण देवून ह्या ठिकाणी पाठवलं जातं तर ह्या सगळ्या बाबी आपल्या प्रमुख नेत्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या होत्या दि. 27/04/2021 रोजी बैठक झालेली होती त्याठिकाणी ह्या विषयावर सर्व साधकबाधक चर्चा झालेली होती सर्व सन्मा. सदस्यांनी त्यावेळेस आपलं म्हणणं मांडलं होतं दोन्ही बाजू मांडल्या होत्या आणि त्यावेळेस कोविडमध्ये ज्या काही घडणाऱ्या घटना होत्या किंवा हे पोलिसींगच्या पावर्स आहेत याचा अतिक्रमणला कसा उपयोग होतो, कोविड सेंटरला कसा होतो, महापालिकेत येतांना कसा उपयोग होतो बऱ्याच सन्मा. सदस्यांच्या ह्यापूर्वी मागण्या होत्या की हे सिक्युरिटी काम करत नाही गेट मधून कोणीही येतं, महापालिकेला धर्मशाळेचा स्वरूप प्राप्त झालेला आहे, लोकप्रतिनिधींचा ही ऐकलं जात नाही अशा अनेक तक्रारी होत्या त्याच बरोबर एक पूर्वी घटना घडली होती की एक आपल्या कोविड सेंटरमध्ये एका महिलेवर रेप झाला अशी तक्रार आली होती, माझ्याकडे यादया आहेत त्यावेळेस ज्या प्रमुख सदस्यांनी मागणी केली होती की, सैनिक सिक्युरिटीचा ठेका रद्द करा सर्व पक्षातल्या सन्मा. सदस्यांचे जे लेखी पत्र आहेत ते माझ्याकडे आजही माझ्या फाईला आहेत तर त्यावेळी त्यांच म्हणणं होतं की असले जर कुठले सिक्युरिटी रेप करणारे असतील आणि ह्या शहरातील महिला सुरक्षित नसतील तर आयुक्त किंवा आपण लोकप्रतिनिधी म्हणून आपल्याला सगळ्यांना श्रमेने मान खाली घालावी लागते म्हणून त्या ही बाबी विचारात घेतल्या होत्या कारण जे खाजगी सिक्युरिटीची लोक काम करतात ते मग सैनिक सिक्युरिटी असो इतर कोणतेही असो त्यांच सगळ्यांच पोलिस व्हेरीफिकेशन होतं असे नाहीच जी मागे रेपची केस झाली होती त्याच्यात कुठल्याही प्रकारचं पोलीस व्हेरीफिकेशन नव्हतं त्याचा आतापत्ता काहीच नव्हता, जेव्हा शहरात दुर्दैवाने घटना चोरीच्या होतात, रेपच्या होतात, कुठे हाफ मर्डर होते मारामारी होते त्यावेळी हा विषय कायदा व सुव्यवस्थेचा ऐरणीवर येतो ह्यात सगळ्यात महत्त्वाची बाब अशी की जी महाष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे सैनिक आहेत हे सिक्युरिटी आहेत ह्या लोकांच पोलीस व्हेरीफिकेशन सारखं पोलिस व्हेरीफिकेशन होतं हे सरकारी कर्मचारी म्हणून काम करत असतात त्याच्यावर पूर्ण नियंत्रण राज्य शासनाचे गृह विभागाचा आहे, पोलिस विभागाचा नियंत्रण आहे, त्यांना सर्व पोलिसांचे नियम लागू आहेत त्यामुळे चुकीची हरकत चोरी होणे किंवा अशी लूटमार होणं, रेप होणं ही घटना घडणं कदापी शक्य नाही ते ही त्यात सगळ्यात महत्त्वाची बाब आहे, सर्वांना विश्वासत घेवून त्यावेळेस आपण हा निर्णय घेतलेला आहे, सर्वांशी चर्चा करून निर्णय घेतलेला आहे त्यानुसार याची आवश्यकता का आहे त्यानंतर आपल्या कोविड सेंटरवर दुसऱ्या ठिकाणी घटना घडली होती की आपले जे तिथे काम करणारे कर्मचारी आहेत त्यांना मारझोड करण्यापर्यंत झाले तिथे जे उपलब्ध सिक्युरिटी होते ते फक्त लांब जावून उभे राहून बघत होते यांचे काय सुरू आहे जर कुठल्याही केंद्रावर अधिकारी / कर्मचारी सुरक्षित राहणार नसेल तर उदया लोकप्रतिनिधी सुरक्षित राहणार नाही, आयुक्त सुरक्षित राहणार नाही संगण्याचा अर्थ की जे महत्त्वाच्या याच्यावर हमला होणार असेल तर लोकांचा मोरलडाऊन होणार असेल आणि आपल्यालाकडे काम करणारा सिक्युरिटी ज्याला सिक्युरिटी म्हणतो तो सिक्युरिटीचा काहीच काम करणार नसेल तर अशा सिक्युरिटीला किमान मेंन ठिकाणी असणं किंवा त्यांना ठेवणे उचित नाही. आता प्राप्त आपल्याकडे 982 सिक्युरिटी जेव्हा आपण हा प्रस्ताव दिला तेव्हा होते आता ही 900 शे च्या आसपास कर्मचारी काम करत आहेत पैकी आपण 250 कर्मचारी हे घेतले, हे कर्मचारी कुठे नियुक्त केलेत जे महत्त्वाचा कोविड सेंटर आहेत, आपल्या महत्त्वाचे बिल्डिंगज आहेत, महापालिकेचे जे मुख्यालय आहे आणि अतिक्रमण किंवा बाजार सारखे जे महत्तवाचे ठिकाण आहेत अशाच ठिकाणी हे लोक कार्यरत आहेत हे सोडून उर्वरीत जवळपास सातशे च्या आसपासची फिगर आहे ती पहिले सैनिक सिक्युरिटी त्यांचीच लोक आजही कार्यरत आहेत एकूण च्या सरासरी 25 टक्के लोक ही महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डकडून घेतलेले आहेत जवळपास 75 टक्के आज ही सैनिक सिक्युरिटीचे

कर्मचारीचे काम करत आहेत परंतु महत्त्वाचे जे सेंसेटीव्ह भाग आहेत, ज्याठिकाणी मालमत्तेचे संरक्षण गरजेचे आहे आणि लोकांचे संरक्षण गरजेचे आहे अशा ठिकाणी महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डाची लोक ज्याला पोलिसचा कायदा लागू आहे आणि पोलिसचे सर्व नियम लागू आहेत त्यामुळे मालमत्तेचं रक्षण होईल आणि जनतेचे ही रक्षण होईल, महत्त्वाचे असणारे आपले अधिकारी / कर्मचारी अधिक पेशंट जे आता कोविडमध्ये आहेत अशा ठिकाणचे संरक्षण होणे गरजेचे होतं म्हणून सर्व पक्षीय नेत्यांची 27/04/2021 रोजी चर्चा करण्यात आली होती मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलविण्यात आली होती आणि त्यांच्या निर्देशानुसार इव्हनदा अगोदर आपण 300 सैनिक महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे घेयायचे ठरले तर त्याठिकाणी सुचना दिली कि 300 च्या जागी आपण 250 घेऊया तर 50 संख्या कमी करून कारण 50 स्थानिक भूमिपत्रांना ज्यादा जॅब मिळेल ही सुचना विचारात घेवून आपण 250 महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे सैनिक इथे घेतलेले आहेत आणि दुसरा प्रश्न आला की स्थानिक भूमिपुत्रांचा रोजगार हिरावला जावू नये त्याच्यात अजून महाराष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे असे म्हणणे आहे जी इथे भरती देवू इच्छितात त्यांची आम्ही भरती प्रकिया राबवू जे फिझिकल मेजरमेंट असेल त्यांच्या नियमात बसणारे जे योग्य कर्मचारी असतील त्यांना आज ही इथे भरती करून घ्यायला तयार आहेत, भरती झाल्यानंतर त्यांचा तीन महिन्याचा प्रशिक्षण असते, प्रशिक्षण कालावधी पूर्ण करून ते इथे सेवेत रूजू शकतात ही एक महत्त्वाची सुचना केलेली आहे आणि ते तशाप्रकारे करणेसाठी तयार आहेत त्याच्या ही पुढे जावून जे सैनिक सिक्युरिटी आज इथे आपल्याकडे कार्यरत आहेत त्या विषयी ह्याच्यापूर्वी ही बोललो होतो काल ही परत बोलवून सक्त सुचना देण्यात आल्या त्यांचा असा म्हणणा आहे ज्या ज्या ठिकाणी आमच्याकडे जागा आहेत त्याठिकाणी आम्ही ही आम्ही घ्यायला तयार आहेत एकूण जे 72 कर्मचाऱ्यांचा इश्यू होता पैकी 30 ते 32 कर्मचाऱ्यांना त्यांनी जॉईन ही करून घेतले आहेत उर्वरत कर्मचाऱ्यांना त्यांनी कालच सांगितले आहे की, आम्ही तात्काळ जाईंड करून घेत आहोत म्हणजे स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होतो किंवा जॉब मिळणार नाही किंवा ते बेकार होतील अशातला भाग नाही, पुढे आणखी सैनिक सिक्युरिटी काढायची नाही काढायची वाढवायची हे संबंधित आपल्या महासभेशी, सर्व पक्षीय नेत्यांशी चर्चा करून पुढे निर्णय होईल प्राप्त परिस्थिती आहे 250 सिक्युरिटी जे आपण महारष्ट्र सिक्युरिटी बोर्डचे घेतलेले आहेत हे सर्वांशी चर्चा करून पुढची कारवाई केलेली आहे आणि त्यांची अति-आवश्यकता मालमत्ता अधिक जनतेचे होणारे संरक्षणासाठी आवश्यकता होती हे सर्वांना विश्वासात घेवून केलेली कारवाई आहे धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठीक आहे, पुढचा विषय घ्या.

(सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 19, जनतानगर येथील बी.एस.यु.पी. प्रकल्पातील इमारत क्र.०६ साठी लॉटरी करावयाच्या प्रसिध्द यादीबाबत आक्षेप / तक्रारी / सुचनाबाबत सुनावणी घेवून समिती द्वारा सादर अहवालानुसार व पर्यायानुसार यादी अंतिम करणेबाबत.

**सचिन म्हात्रे :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर काशिचर्च येथे बी.एस.यु.पी.प्रकल्पाचे काम सुरु आहे. या प्रकल्पातील इमारत क्र.6 मधील 294 लाभार्थ्यांना सदनिका देण्यासाठी लॉटरी काढण्याकरीता दि.01/01/2021 रोजी लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीबाबत काही तक्रारी, सुचना व आक्षेप महापालिकेस प्राप्त झाल्याने समिती गठीत करुन आक्षेपांची सुनावणी घेण्यात आली व त्यानुसार विभागाने अहवाल तयार करुन 3 पर्याय सुचविण्यात आले होते.

सदर सुचविण्यात आलेल्या पर्यायाच्या क्र.02 नुसार यादी अंतिम करताना प्रथम इमारत क्र.06 च्या प्रत्यक्ष जागेवरील व इमारत बांधकामासाठी इमारतीपासुन 6.5 मी. पर्यंतच्या तोडलेल्या

झोपड्यांच्या लाभार्थीचा समावेश करुन उर्वरित सदनिकांसाठी इमारत क्र.07 च्या जागेवरील तोडलेल्या झोपड्यांच्या लाभार्थ्यांची लॉटरी काढून त्यांना समाविष्ट करावे. तसेच प्रसिध्द यादीमधील एकाच कुटूंबांच्या तीनपेक्षा जास्त झोपड्या असल्यास सर्वांचा समावेश न करता तीन झोपडी धारकांचा समावेश करावा. जेणेकरुन इतर लाभार्थ्यांच्या नावाचा समावेश होईल व या योजनेचा लाभ सर्वांना होवून सर्वांना न्याय मिळेल.

तरी वरील पर्याय क्र.2 या नुसार कार्यवाहीस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम हा विषय चांगला आहे, कमीत कमी कुठेतरी याचा निकाल लागला आहे, मला आयुक्तांबरोबर ह्या विषयी थोडीशी चर्चा करायची होती. आयुक्त महोदय विषय कसा झालेले आहे, गोषवारामध्ये मुद्दा क्र. 2 मध्ये 462 छानन वगळून नाव जी आहेत त्याच प्रमाणे गोषवारामध्ये 462 नावं आलेली आहेत याचा अर्थ कुठेतरी पूर्वतयारी मुद्दा क्र. 02 मधून करायचे ठीक आहे, तर ही लॉटरी सिस्टम काढतांना आपल्याला त्या सुरूवातीला ज्या लोकांची गरज ओढली गेली म्हणजे 6 नबंर आणि 7 नंबर इमारत क्षेत्रातील लोक त्या लोकांची तक्रार अशी अजून ही की ह्या यादीमध्ये अशा लोकांची नावं आहेत की त्या परिसरातील नाहीत म्हणून माझा आपल्याला विनंती आहे की हा लॉटरीचा विषय थोडासा ओपन ठेवावा की जी नावे त्या परिसरातील नसतील कारण प्रथमत: त्याची ओढली गेली त्यांना संधी प्रथम देण्यात यावी.

**दिपक खांबित :-**

साहेब तुम्ही जे म्हणतात तो पर्यान नंबर 02 आहे, पर्याय नबंर दोनमध्ये ज्यांची बिल्डिंग 06 आणि 07 च्या खाली लोक होती त्यांची घरं प्रथम तुटले आहेत, त्यांना प्रथम देण्यासाठी पर्याय नबंर 02 आहे आणि पर्याय नबंर 01 जो आहे तो सोलागामी आडवा घेतला होता म्हणजे एका बिल्डिंगच्या मागे एक परंतु सगळ्यांची मागणी होती की, आमचे पहिले तोडले तर आम्हाला ही बिल्डिंग नबंर 06 मध्ये द्या तर त्याप्रमाणे आपण ती यादी प्रसिध्द केली होती आणि आता एकदा तुमचा ठराव झाला की फायनल पुन्हा आपण सगळ्यांना एकदा तपासून घेऊन त्याप्रमाणे आपण सगळयांसोबत करारनामा करणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब हा चांगला मुद्दा आहे, चांगला विषय आहे, गोरगरिबांना त्यांची घरं मिळाली पाहिज ह्या मताचा मी आहे. खांबित साहेब आता 06 नबंरची इमारत तयार झालेली आहे.

**दिपक खांबित :-**

झालेली आहे फक्त पाण्याच्या टाकीचं काम चालू आहे बाकी पूर्ण बिल्डिंग तयार आहे.

**जुबेर इनामदार :-**

पाच नबंरचा फक्त प्लींटपर्यंत काम झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

दिड महिन्यामध्ये फॉन्डेशन, प्लीन झालेले आहे आता कॉलमचे काम सुरू आहे.

**जुबेर इनामदार :-**

हरकत नाही, दोन्ही इमारतीमध्ये सदनीका किती निघणार?

**दिपक खांबित :-**

294 आणि 294

**जुबेर इनामदार :-**

दोन्ही याच्यात 294 तर सात नबंरची इमारत मोठी आहे.

**दिपक खांबित :-**

सेम बिल्डिंग आहेत 294 फ्लॅटची.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, थोडीशी तक्रार माझ्याकडे काल सध्या ह्या चर्चामध्ये अशी आली होती की काही लोकांचे नाव याच्यामध्ये समावेश आहेत ती 06 नबंर आणि 07 नबंर परिसरातील नाहीत तर त्याची चाचपणी परत एकदा तुम्ही करून घ्या.

**दिपक खांबित :-**

सर ह्याबाबत उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती आणि एक-एकाला जवळ जवळ 15 दिवस हेअरींगला टाईम देऊन सगळ्यांची हेअरींग घेवून त्यांचा म्हणणं नोंदवून घेतलेला आहे, जे जे अर्ज आले 300-400 सगळ्यांची सुनावणी झालेली आहे आणि त्या ही उपरोक्त कोणाची कम्प्लेंड असेल तर ते आपण पुन्हा तपासून घेवू आणि पुढील निर्णय घेवू.

**जुबेर इनामदार :-**

सर दुसरं हनुमान चाळ हा वगळण्यात आला त्यातून म्हणूजे 06 नबंर 07 नबंरच्या आजूबाजूचा जो परिसर होता आणि त्यांची घरं तोडली गेली होती म्हणून त्यांची नावं समावेक्षक जास्त नसतील ते परंतु तुम्ही लॉटरी काढता आहेत तर 465 नावं आहेत त्याच्यामध्ये अजून पाच पन्नास कदाचीत त्यांच्या नशीबात असेल तर त्यांचा त्या लॉटरीमध्ये नाव येईल तर हा एक विषय तुम्ही माझी सुचना ह्याच्यामध्ये गहीत धरावी अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

नक्कीच.

**मिरादेवी यादव :-**

मॅडम आपकी परवानगीसे बोल रही हूँ, आज की महासभा में आपनी 07 नबंर बिल्डिंग लॉटरी के लिय आया है। अभी जो आपनी लिस्ट निकाले थे, पहिली लिस्ट जो निकाली थी वो भी लिस्ट आच्छा था, अभी जो लिस्ट निकाले है वो भी आच्छा है, मेरा मानना यह है की ऐसा भी देखने जाओ तो बहूत सारे लोगोने पहिले ही घर खाली किये है। मेरा मानना यह है, उन्हको भी इसमे लिया जाएँ और उनका भी नाम इसमे आना चाहिए अभी जो 07 नबंर बिल्डिंग का जो दुकान का रजिस्ट्री हुवाँ उसमे जो पहिले दुकान खाली किये थे उनका भी रजिस्ट्री इसी समय होना चाहिए ओर उनको भी दुकान देना चाहिए।

मा. महापौर :-

मॅडम, बरोबर आहे तुमचं खांबित साहेब, ह्याबाबत आपण दखल घ्यावी.

मिरादेवी यादव :-

खांबित साहब, अभी जुबेर साहब बोले वो भी मधुबन चाल के नाम लिऐ ना अभी मधुबन चाल मॅडम अपको भी पता है, मुझे भी पता है, बाकी लोगो को सबकुछ पता है वो कहाँ पे है और बाकी जो पहिले घर खाली किया था, अभी बहुत ऐसे है की पहिले घर खाली किया अभी वो साईट मे रह गये है, अभी अभी जो घर खाली किया उनका नाम आया है तो पहिले जो घर खाली किया है, उनका भी नाम आना चाहिए। खांबित साहब आज बोल रहे है की, मतलब जिसका कम्प्लेंड आया है, तक्रार आया है, हमने समावेश किया, यह किया, वो किया खांबित मैने यह बात बोले ते उस समय की जो पहिले घर खाली किया है उनको पहिले घर मिलना चाहिए।

मा. महापौर :-

ठीक आहे, सन्मा. सदस्या मिरादेवी मॅडम यांनी केलेली सुचना नमूद करून प्रकरण क्र. 19 सर्वमतांने मंजुर करण्यात येत आहे.

जुबेर इनामदार :-

123 सदनिका शिल्लक राहतात त्याच्यामध्ये 578 एकत्र सदनिका उपलब्ध होणार आहेत.

मा. महापौर :-

ह्यामध्ये सन्मा. सदस्य इनामदारजी मी आपणांस सांगू इच्छिते की प्रथम इमारत क्र. 06 जी आहे त्याच्या प्रत्यक्ष जागेवरील जे काही बांधकाम आहे त्या इमारती पासून 6.5 मीटर पर्यंतचा जो भाग तोडलेला आहे तेथील जे नागरीक आहेत त्या नागरिकांना प्रथम लॉटरीच्या माध्यमातून आपण 06 च्या इमारतीमध्ये घेणार आहोत आणि जे उर्वरीत नागरीक आहेत त्यांची पण लॉटरी इमारत क्र. 07 मध्ये करणार आहोत.

जुबेर इनामदार :-

तरी 123 सदनिका तुमच्याकडे शिल्लक राहतात, एक इमारतीमध्ये 294 सदनिका आहेत अशा दोन इमारतीमध्ये 578 सदनिका झाल्या.

दिपक खांबित :-

सॉरी साहेब, करेक्शन करतो बिल्डिंग नबंर 07 मध्ये 362 आहेत.

जुबेर इनामदार :-

हा, आता वाढले ना मग याचा अर्थ 362 म्हणजे आपल्याकडे वाढले ना.

दिपक खांबित :-

88 वाढले.

जुबेर इनामदार :-

साहेब तुमच्याकडे बरेच 465 चे तुमच्याकडे अडीचशे पेक्षा जास्त सदनिका उपलब्ध होणार आहेत त्यांची तुम्ही लॉटरी कधी लावणार, त्यांची नावं का याच्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत.

दिपक खांबित :-

सर, आता ठरावानुसार सगळी एकदा प्रोसिजर करणार ना, ठराव जो दिलेला आहे पर्याय दोन जो आहे.

जुबेर इनामदार :-

हा विषय गंभीर आहे, लोकांचे हाल झालेले आहेत, लोक मानसीकरित्या दु:खी झालेले आहेत.

मा. महापौर :-

ह्या विषयी तुम्ही जेवढा त्रास सहन केलेला नसेल तेवढा आम्ही करतोय कारण आपण सभागृहामध्येच ठरवलेला विषय आहे हा व्यतिरिक्त विषय नाही तिथले स्थानिक लोकप्रतिनिधी ह्याबाबत अतिशय मेहनत घेत आहेत आणि जे काम बंद होतं ते काम आपण प्रशासनाच्या माध्यमातून सुरू केलेला आहे. इमारत क्रमांक 06 चा काम मला वाटते पूर्ण झालेला आहे त्याचा लवकरच ताबा आपण प्रशासनाच्या माध्यमातून आज महासभेमध्ये मंजुर झाल्यानंतर लॉटरी आपण काढणार आहोत, रजिस्ट्रेशन आपण करणार आहोत नंतर इमारत क्रमांक 07 चा विचार करणार आहोत इमारत क्रमांक 07 च लॉटरी सुध्दा आपण इमारत क्र. 06 ची लॉटरी झाल्यानंतर ताबडतोब काढत आहोत त्याचबरोबर इमारत क्र. 05 चा काम सुध्दा प्रशासनाच्या वतीने त्याठिकाणी सुरू केलेला आहे जे काम गेल्या चार-पाच वर्षामध्ये बंद होतं ते काम आपण ह्या गेल्या एक वर्षापासून अतिशय मेहनतीने त्याठिकाणी सुरू करत आहोत, प्रगतीपथावर काम चालू आहे आपण ही जावून त्याठिकाणी पाहू शकता आणि सर्व लोकप्रतिनिधी जी मदत मिळालेली आहे म्हणूनच आज त्याठिकाणी काम चालू झालेला आहे त्याठिकाणच्या नागरिकांना आपण हक्काचं घर देणार आहोत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, मी तुमचा ठरावाला विरोध करत नाही, प्रशासनाच्या समक्ष हा विषय आणत आहे मी की, तुम्ही एका बाजूला चोवीस इमारती म्हणजे 465 सदनिकेचे लॉटरी काढायला निघालात लाभार्थीसाठी बरोबर आहे, एका बाजूला तुमच्याकडे उपलब्ध होणारे 456 सदनिका मग 456 च का बाकीच्या लोकांना का नाही? त्यांची लॉटरी एकत्रच काढा म्हणजे त्या लोकांना कमीत कमी शाश्वती होईल.

**मा. महापौर :-**

आपण जे बोलता आहेत त्याची तपासणी आपण करून त्याच्यावरती मार्ग नक्कीच काढू.

**जुबेर इनामदार :-**

ह्या विषयावर मी आपले लक्ष वेधू इच्छितो आहे.

**मा. महापौर** :-

नक्की. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 19,**

जनतानगर येथील बी.एस.यु.पी. प्रकल्पातील इमारत क्र.०६ साठी लॉटरी करावयाच्या प्रसिध्द यादीबाबत आक्षेप / तक्रारी / सुचनाबाबत सुनावणी घेवून समिती द्वारा सादर अहवालानुसार व पर्यायानुसार यादी अंतिम करणेबाबत.

**ठराव क्र. 19 :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर काशिचर्च येथे बी.एस.यु.पी.प्रकल्पाचे काम सुरु आहे. या प्रकल्पातील इमारत क्र.6 मधील 294 लाभार्थ्यांना सदनिका देण्यासाठी लॉटरी काढण्याकरीता दि.01/01/2021 रोजी लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीबाबत काही तक्रारी, सुचना व आक्षेप महापालिकेस प्राप्त झाल्याने समिती गठीत करुन आक्षेपांची सुनावणी घेण्यात आली व त्यानुसार विभागाने अहवाल तयार करुन 3 पर्याय सुचविण्यात आले होते.

सदर सुचविण्यात आलेल्या पर्यायाच्या क्र.02 नुसार यादी अंतिम करताना प्रथम इमारत क्र.06 च्या प्रत्यक्ष जागेवरील व इमारत बांधकामासाठी इमारतीपासुन 6.5 मी. पर्यंतच्या तोडलेल्या झोपड्यांच्या लाभार्थींचा समावेश करुन उर्वरित सदनिकांसाठी इमारत क्र.07 च्या जागेवरील तोडलेल्या झोपड्यांच्या लाभार्थ्यांची लॉटरी काढून त्यांना समाविष्ट करावे. तसेच प्रसिध्द यादीमधील एकाच कुटूंबांच्या तीनपेक्षा जास्त झोपड्या असल्यास सर्वांचा समावेश न करता तीन झोपडी धारकांचा समावेश करावा. जेणेकरुन इतर लाभार्थ्यांच्या नावाचा समावेश होईल व या योजनेचा लाभ सर्वांना होवून सर्वांना न्याय मिळेल.

तरी वरील पर्याय क्र.2 या नुसार कार्यवाहीस ही मा. महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. सचिन म्हात्रे** **अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 20, सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक / पुर्नविनियोजन करणेबाबत

प्रभात पाटील :-

नमस्कार, प्रकरण क्र. 20 मध्ये जो गोषवारा दिलेला आहे की, सन 2021-22 च्या अर्थ संकल्पामध्ये एकात्मीक डास निर्मुलन योजना आणि ठेका कर्मचारी कार्यक्रमासाठी 1 कोटी रुपयेची

तरतूद आहे. आता ह्या तरतुदीमध्ये प्रशासन म्हणतोय की, आता पर्यंत वेतनापोटी 55 लाख एवढा खर्च झालेला आहे म्हणजे 45 लाख एवढे शिल्लक आहेत आणि तो पैसा केवळ 15 ते 20 दिवस पुरणार आहे त्यामुळे तरतुदी अभावी औषध फवारणी कामगाऱ्यांचे वेतन आणि औषध खरेदी शक्य होणार नाही परंतु नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर कार्यक्रम नेहमीच चालू राहणे आश्वयक आहे याच्यशी मी सहमत आहे आणि ह्या कार्यक्रमासाठी आपल्याला पैसा लागणार आहे, त्यासाठी आपण हा विषय आणलेला आहे आणि मला एवढेच म्हणायचे आहे की आपण ह्या करिता मालमत्ता कर विभागाच्या मालमत्ता कर पुर्नमुल्यांकन योजना लेखाशिर्षासाठी जी तरतूद ठेवलेली आहे त्यापैकी 05 कोटी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सार्वजनिक रास्ते देखभाल दुरूस्ती पुर्नपृष्टीकरण शिर्षासाठी आलेल्या 35 कोटी पैकी 05 कोटी असे एकंदरीत 10 कोटी रक्कम ही एकात्मीक डास निर्मुलन योजना आणि ठेका कर्मचारी शिर्षामध्ये समाविष्ट करणेसाठी त्यांची योजना आहे किंवा त्यांचा प्रस्ताव आहे. पण मला एवढे म्हणायचे आहे की, आयुक्तांना हा प्रश्न विचारायचा आहे की, जे 05 कोटी रुपये तुम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेतली आहे त्याची परवानगी घेतली आहे का? त्यांच्याकडून मंजुरी घेतली आहे का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की सुरुवातीला एकात्मीक डास निर्मुलन योजना याच्या अनुषंगाने फक्त मागील जेव्हा बजेट झालं होतं त्यात 01 कोटी रुपयाची तरतूद केल्यामुळे अडचण झाली होती म्हणून ह्या कार्यक्रमासाठी सुरूवातीला 12.75 कोटीची तरतुदीची मागणी करण्यात आली होती त्यामध्ये डास नाशक, आळी नाशक साहित्य ह्यासाठी 04 कोटी आणि दोनशे औषध फवारणी कामगारांचे वार्षिक वेतन म्हणून 7.40 कोटी, धूर फवारणी, फॉगिंग मशीन चालविण्यासाठी पेट्रोल डिझेल बाकी इतर मेनटेन्स 80 लाख तसेच 10 जेस्टप्रेट टेम्पोचे वार्षिक भाडे 55 असे एकूण 12.75 कोटीची मागणी करण्यात आली होती परंतु सन 2021-22 च्या अर्थसंकल्पामध्ये फक्त् 01 कोटीची तरतूद करण्यात आली होती, परिणामी हे काम ठप्प होण्याच्या मार्गावर होतं त्यानंतर मा. महापौर मॅडमाना आम्ही विनंती केली, स्टॅनिंगच्या चेअरमन साहेबांना की, असे असे तरतुदी रिऍप्रोप्रीट करून द्या, परंतु 05 कोटी रुपये जो आता मा. नगरसेवक मॅडमने प्रश्न केला की, 05 कोटी रुपये बांधकाम आणि 05 कोटी तुम्ही कर विभागातून घेतलेले आहे तर यांच्या परवानगी घेतलेली आहे का, तर हे रिऍप्रोपेशन ही अंतर्गत बाब आहे, तर ही अंतर्गत बाब असल्यामुळे आवश्यकतेनुसार पैसा कमी अधिक जास्त करणे जर विभागाने एकमेकात करण प्रत्येक विभाग दुसऱ्या विभागाला पैसे देतांना नाहीच म्हणत असतो आपल्याला सर्वांना माहीत आहे तर त्यामुळं अंतर्गत कुठे कलह निर्माण होऊ नये म्हणून त्याच वेळेला ह्या विभागाला पैसे कमी पडणार नाहीत परत रिऍप्रोपेशन करण्याची आवश्यकता लागली तर आपल्या सर्वांची महासभेची परवानगी घेवून पुढील कारवाई करययात येईल त्यामुळे आता शहरात आवश्यकता जी होती एकात्मीक डास निर्मुलन करण्याची त्याअनुषंगाने तातडीची बाब म्हणून दोन्ही विभागाकडून पाच-पाच कोटी असे दहा कोटी रुपयेची तरतूद करण्यात आलेली आहे पुढील आवश्यकतेनुसार डिपार्टमेंटच्या अंतर्गत बाब आहे त्यानुसार कारवाई करण्यात येईल धन्यवाद.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम 20 नबंर विषयावरती बोलायचे आहे, मुळात मार्चमध्ये आपलं अर्थसंकल्प झाला, आयुक्त साहेब, महापौर मॅडम ह्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली होती ती आयुक्तांनी केली होती, स्टॅन्डींग कमिटीने केली होती 12.75 म्हणजे पावने तेरा लाखाची त्या विषयावर तरतूद केली होती. त्याच्यानंतर मा. महासभेने सदरची तरतूद ही एक लाखावर आणली तर गेल्या कित्येक वर्षापासून अशी तरतूद ती 8 ते 12 लाखापर्यंत असते ही तरतूद मुख्य म्हणजे परंपरागत चालत आलेली एवढा हा कोविडचा काळ आहे ह्यामध्ये हा अत्यावश्यक म्हणजे लोकांशी निगडीत प्रश्न असतांना मुळात महासभा म्हणजे तुमच्याकडे आहे, तुमचे सर्वाधीक तुम्ही जे ठरवाल त्यापैकी एक

कोटी करायची काय तरतूद आहे 8 ते 12 कोटीचा खर्च असतो मूळात एक कोटी केली त्याच्या ही पुढे जावून आज जर तुम्ही बघितलं तर ह्या शहरामध्ये औषध फवारणी बंद करायची वेळ आलेली आहे, म्हणजे गेल्या दोन महिन्यामध्ये औषण फवारणी आणि धूर फवारणी करता आणि औषध फवारणी बंद केली होती मूळात तुम्ही कमी केलेली तरतुदीमुळे ही औषध फवारणी केली आहे ती बंद झाली, म्हणजे ही मूळात कमी करण्याचे कारण काय? आणि आता त्याचा पुर्ननियोजन करत असतांना तुम्ही प्रश्न आयुक्तांना विचारता म्हणजे पुर्ननियोजन कशाला करतात म्हणजे मूळात समस्या तुम्ही तयार केली आणि जर त्याची त्याच्यावर समस्या व समाधान करत असतांना ही कुठली पध्दत आहे.

**मा. महापौर :-**

स्थायी समिती सभापती जैनजी तदरतूद का कमी केली सांगा.

**प्रविण पाटील :-**

08 ते 12 कोटी असतांना तुम्ही 01 कोटीवर आणली आणि डेंग्यूची किती रुग्ण वाढले ह्या शहरामध्ये?

**दिनेश जैन :-**

मी विरोधी पक्षनेत्याला सांगु इच्छीतो की आपण का कमी केली त्याचा पहिला त्यांनी अभ्यास करावा. आम्ही स्टँडींगमध्ये केली होती परंतु महासभेला सर्व काही असते.

**प्रविण पाटील :-**

किती केली होती?

**दिनेश जैन :-**

कमी केल्याचे कारण काय ते पहिला त्यांची काढले पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

पहिला कारण तुम्हीच सांगा.

**मा. महापौर :-**

प्रविण पाटील साहेब त्यांना बोलू द्या. मग आपण बोला.

**दिनेश जैन :-**

आता हे टेंडर कधी संपलेले आहे आपण हा नविन टेंडर काढला नाही. दुसरी गोष्ट आपण जे कर्मचारी भरती केलेले आहेत हे सर्व आरोग्य डिपार्टमेंटने भरती केलेले आहेत. आणि तिथे पाठविलेले आहेत. म्हणजे आरोग्याने भरती करुन त्या डिपार्टमेंटला पाठविलेले म्हणून ते पैसे आरोग्यने द्यायला पाहिजे. तर आपण ह्या बाजु तरतुद करायची आरोग्य मध्ये भरती करायची आणि इकडे पाठवायचे आणि ह्या डिपार्टमेंटने पैसे द्यायचे तरी सुध्दा हा विषय सुटला पाहिजे म्हणून आपण पुन्हा पुर्नविनियोजन करायला पाहिजे. हे सर्वांच्या मिरा भाईंदरचा प्रश्न होता. आणि ही फवारणी झाली पाहिजे. आपल्याला सर्वांना मंजुर आहे आता आपण हे रितसर टेंडर काढून परत त्यांना कोणाला द्यायला पाहिजे. आपण त्यांनाच कंन्टीन्यु ठेवतो. आपण मध्ये टेंडर काढले होते त्याला आपण दिलेले नाही. आता त्याला कुठच्या माणूस आहे त्याच्या कडूनच करुन घेतो. आता किती दिवस झाले टेंडर संपुन?

**जुबेर इनामदार :-**

टेंडरचा संबंध काय?

**मा. महापौर :-**

आता मला सभागृहाने हे सांगा की आता पुर्नविनियोजन करायचे आहे ना? औषध फवारणी करायची आहे ना? बजेटमध्ये जे झाले आहे त्याला सुधारायचे आहे की नाही?

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्तने ८ ते १२ कोटीची तरतुद केली असताना एक कोटीच्या आत कोणी केले? जवळ जवळ ह्या शहरामध्ये मलेरीयाचे आणि डेंग्युचे रुग्न कसे वाढलेत? औषध फवारणी शहरात बंद याला जबाबदार कोण?

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, विरोधी पक्षनेत्यांना सांगा अभ्यास करुन बोला. ते काय बोलत आहेत आरोप करत आहेत काय. त्यांना अभ्यास करुन बोलायला सांगा. महापौर मॅडम पानपट्टे साहेबांना खुलासा करायला सांगा.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही तरतुद कमी केली आणि हा कोरोनाचा काळ होता.............

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

पाटील साहेब, कोरोनाचे पेशंट होते जास्त मलेरीयाचे पेशंट जास्त होते याचा खुलासा तर प्रशासन करेलच.

**प्रविण पाटील :-**

औषध फवारणी बंद करण्याचे कारण काय?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या प्रभात ताई पाटील तुम्ही ठराव वाचा.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, आपण फक्त आरोग्य विभागाला विचारा की याचे टेंडर कधी संपलेलं आहे.

**मा. महापौर :-**

पहिला ताईंना बोलू द्या.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा अंतर्गत कार्यरत एकात्मिक डास निर्मुलन योजना/ ठेका कर्मचारी करीता लेखाशिर्षकात तरतुद उपलब्ध करणेकरीता आरोग्य विभागात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीमधूनच पूर्न:विनीयोजन करावे व डास निर्मुलन योजना राबविण्यात यावी. भविष्यात सदर कामाकरीता तरतुद अपुरी पडल्यास पूर्न:विनीयोजन करणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा. या योजनेकरीता कर्मचारी पुरवठा करणे व डास अळीनाशक औषधे मागविणेस येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देवून निविदा मागविण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

पुर्नवियोजन कुठून केले?

**मा. महापौर :-**

गोषवाऱ्यामध्ये सांगितलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी जो सांगितलेला आहे तो वेगळा आणि ठराव वेगळा केला आहे.

**मा. महापौर :-**

आयुक्तांनी पण खुलासा केला.

**जुबेर इनामदार :-**

कुठून केला?

**गिता जैन :-**

ठरावामध्ये काय आहे?

**जुबेर इनामदार :-**

गोषवाऱ्यामध्ये दिला कुठून केला कारण आजाव स्पष्ट येत नव्हता.

**प्रविण पाटील :-**

हीच तरतुद जर अर्थसंकल्पामध्ये केली असती तर ही वेळ आली नसती.

**जुबेर इनामदार :-**

ती आर्थिक बाब आहे जावूदे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

२०२२ पर्यंत ती भोगायची आहे. पुढे बोला. महापौर मॅडम आम्हाला सांगा केले तरी कुठून?

**मा. महापौर :-**

गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे वाचा.

**जुबेर इनामदार :-**

आता गोषवाऱ्यानुसार तुम्ही केला आहे का? सचिव ठराव वाचा.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 20 :-**

सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक / पुर्नविनियोजन करणेबाबत

**ठराव क्र. 20 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागा अंतर्गत कार्यरत एकात्मिक डास निर्मुलन योजना/ ठेका कर्मचारी करीता लेखाशिर्षकात तरतुद उपलब्ध करणेकरीता आरोग्य विभागात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीमधूनच पूर्न:विनीयोजन करावे व डास निर्मुलन योजना राबविण्यात यावी. भविष्यात सदर कामाकरीता तरतुद अपुरी पडल्यास पूर्न:विनीयोजन करणेकरीता मा. महासभेत प्रस्ताव सादर करावा. या योजनेकरीता कर्मचारी पुरवठा करणे व डास अळीनाशक औषधे मागविणेस येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देवून निविदा मागविण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील** **अनुमोदन :- श्रीम. नयना म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२१, माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणे करीता शासनाने पारीत केलेल्या निर्णयानुसार फेरबदल करणे बाबत.

**गणेश भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माजी सैनिकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात 100% कर सवलत सन 2010 सालापासून महापालिका मा. महासभा दि.30/07/2010, ठराव क्र.26 अन्वये देत आहे.

शासन निर्णय क्र.संकिर्ण2020/प्र.क्र.101/भाग-2/का-28, दि.23/11/2020 अन्वये शासनाने माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणेकरीता नविन निकष ठरविल्याप्रमाणे मिरा भाईंदर शहरातील माजी सैनिकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात 100% कर सवलत देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र.21 :-**

माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणे करीता शासनाने पारीत केलेल्या निर्णयानुसार फेरबदल करणे बाबत.

**ठराव क्र. 21 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माजी सैनिकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात 100% कर सवलत सन 2010 सालापासून महापालिका मा. महासभा दि.30/07/2010, ठराव क्र.26 अन्वये देत आहे.

शासन निर्णय क्र.संकिर्ण2020/प्र.क्र.101/भाग-2/का-28, दि.23/11/2020 अन्वये शासनाने माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणेकरीता नविन निकष ठरविल्याप्रमाणे मिरा भाईंदर शहरातील माजी सैनिकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात 100% कर सवलत देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. गणेश भोईर        अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२२, भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदाना लगतच्या व्हॉली बॉल व बॅडमिंटन कोर्ट दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देणेबाबत.

**वर्षा भानुशाली :-**

युनिटी स्पोर्ट्स संस्था यांना भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानालगतच्या व्हॉली बॉल व बॅडमिंटन कोर्ट दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्ती विनामुल्य करणेकामी 5 वर्ष मुदतीकरीता करारनामा करणेस व त्यांना विनामुल्य लाईट, पाणी व सुरक्षा रक्षकाची सोय महापालिकेतर्फे उपलब्ध करुन देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**प्रिती पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम जरा गिता जैन मॅडमला अनम्युट करा त्यांना बोलायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हालाही बोलायचे आहे महापौर मॅडम.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, आता आपण जे गोषवारा देतात त्यात लिहीले आहे की कोणतीही फी घेण्यात येणार नाही तसे ठरावामध्ये नसते.

**मा. महापौर :-**

जैन मॅडम तुमचा आवाज जरा इको होत आहे.

**गिता जैन :-**

गोषवाऱ्यात आहे की कोणतीही फी घेण्यात येणार नाही ते ठरावामध्ये नमुद नाही. मग आम्ही काय समजायचे फी घेणार की नाही घेणार?

**मा. महापौर :-**

त्याच्यामध्ये असे म्हटलेले आहे करारनामा करणेस त्यांना विनामुल्य यात नमुद नाही केले आहे का?

**गिता जैन :-**

ठरावात कुठे आहे?

**मा. महापौर :-**

ठरावात ती सुचना नमुद करुन घेण्यात यावी. आपण विनामुल्य देणार आहोत ती सुचना नमुद करण्यात यावी. नाही तर ठराव निट पुन्हा वाचा.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम त्या ठरावामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे सुभाषचंद्र बोस मैदान लगतच्या हॉलीबॉल बॅटमिनटन दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्ती विनामुल्य आणि तिथे जे काही होणार आहे ते विनामुल्य ५ वर्षा करीता मुदतीत फक्त लाईट, पाणी आणि सुरक्षा रक्षक हे महापालिके मार्फत उपलबध करुन देण्यात येत आहे. असे स्पष्ट म्हटलेले आहे.

**गिता जैन :-**

मॅडम त्यात काही प्रॉब्लेम नाही माझे ऑब्जेक्शन नाही. मला फक्त हे सांगायचे आहे की तुम्ही किती विद्यार्थांना तिथे घेणार तिथे किती प्लेअर्स यांना घेणार ते सभागृहाथ सगळ्यांना कळू देत. त्या संस्थेला द्या चांगली गोष्ट आहे पण त्याने नॉम्स काय आहेत, तिथे प्लेअर घ्यायचे नॉम्स काय आहे समजा आम्ही एखादे नाव त्याला पाठवले तर तो घेणार का तसली माहिती सभागृहात नसते. आणि महापौर मॅडम आम्ही फोन करुन करुन दाखवायचे आणि तुम्ही अनम्युट ठेवत नाही ही बरोबर प्रथा नाही जर तुम्हाला सभा ऑफलाईन घ्यायचीच आहे तर ऑफलाईन घ्या ऑनलाईन घ्यायची आहे तर सगळ्यांना बोलायची संधी तरी द्या. हाथ वर करतो आपण बघत नाही का? तिथे एक माणूस ठेवा कोण हाथ वर करत आहे...................

**मा. महापौर :-**

मॅडम तसे होणार नाही कारण तुम्ही सगळेच जण बोलायला लागले तर इथे कोणाला काहीच समजणार नाही. जे पदाधिकारी आहेत त्यांचे म्युट करत नाही.

**गिता जैन :-**

अग्री मॅडम, पण जे हाथ वर करत आहेत त्यांनाही नाही मॅडम.

**मा. महापौर :-**

देते संधी आता जे हाथ वरती करतात त्यांना संधी देते.

**गिता जैन :-**

मॅडम मी लास्ट २० मिनिट्स हाथ वर केलेला आहे तुम्ही अनम्युट केलेले नाही.

**मा. महापौर :-**

त्या वेळेला कोणी बोलत असेल ना.

**गिता जैन :-**

मी तेच सांगत आहे तुम्ही संधीही देणार नाहीत तर आम्ही काय करणार.

**मा. महापौर :-**

नाही परंतु कोणीना कोणी बोलतच होते ना.

**गिता जैन :-**

मॅडम महासभा कशाला असते?

**मा. महापौर :-**

जयेश भाईर तुम्ही बोला.

**जयेश भाईर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की तिथे आम्हा स्थानिक भुमिपुत्र आहेत. तिथे गेल्यावर आमच्या स्थानिक भुमिपुत्रांना हॉली बॉल किंवा फुटबॉलची प्रॅक्टीस करुन देत नाहीत त्याचे काय? त्याच्या पण याच्यात उल्लेख करा.

**मा. महापौर :-**

खांबित साहेब बोला. त्याच्यात नमुद करुन घ्या. स्थानिकांना तिथे प्राधांन्य द्या. तिथे त्यांचे काही येतील त्यावेळेला त्यांना खेळायला घेण्यात यावे.

**जयेश भोईर :-**

स्थानिक भुमिपुत्र राहतात तेव्हा त्यांना पण सहभाग त्याच्यामध्ये करुन घ्या.

**दिपक खांबित :-**

आपण करारामध्ये ती अट टाकून घेऊ.

**मा. महापौर :-**

सुचना नमुद करुन घेतली. पुढचा विषय घ्या.

**जयेश भोईर :-**

अभारी आहे धंन्यवाद.

**प्रकरण क्र. 22 :-**

भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदाना लगतच्या व्हॉली बॉल व बॅडमिंटन कोर्ट दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देणेबाबत.

**ठराव क्र. 22 :-**

युनिटी स्पोर्ट्स संस्था यांना भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानालगतच्या व्हॉली बॉल व बॅडमिंटन कोर्ट दैनंदिन संचलन देखभाल व दुरुस्ती विनामुल्य करणेकामी 5 वर्ष मुदतीकरीता करारनामा करणेस व त्यांना विनामुल्य लाईट, पाणी व सुरक्षा रक्षकाची सोय महापालिकेतर्फे उपलब्ध करुन देणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली                अनुमोदन :- डॉ. प्रिती पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२३, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

**मा. महापौर :-**

हा अवलोकनाचा विषय आहे. अवलोकन करा. अवलोकनामध्ये आता कोणी बोलु नका.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम मला २२ नंबरच्या विषयावर बोलायचे होते मी हाथ वरती केला होता.

**मा. महापौर :-**

तुम्ही प्रत्येक विषयातच बोलत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

तुमची माया कमी झाली आमच्यावर.

**मा. महापौर :-**

आता त्या जैन मॅडमची पण तक्रार होती त्यांनी पण हाथ वर केला त्यांना पण बोलायचे होते. ही ऑनलाईन सभा आहे आपण थोडे जाणून घ्या. थोडी मतद करा.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय मी तुमच्या ह्या विषयावर निर्देशनात आणुन देऊ इच्छीतो अशा प्रकारे आपले बरेच काही मैदाने आहेत त्यांना आम्ही खेळ पट्टी, वगैरे भाडे तत्वावर देण्याचा आम्ही हे नविन धोरण आकारलेले आहे. ह्या शहरात बऱ्याच जागेवर देऊन झाले आहेत. त्याच्यामध्ये एक अडचण अशी निर्माण होते की खेळपट्टी घेई पर्यंत निशुल्क हा जो विषय आहे ते आम्ही वापरायला निशुल्क देऊ. तोपर्यंत ठिक आहे पण ते त्याच्यामध्ये करतात काय अजुन ही बाब प्रॅक्टीकल सच आहे. ह्या जितक्या काय संस्था आहेत ते त्यांचे ट्रेनिंग तिथे सुरु करतात. आणि ट्रेनिंगचा तो व्यवसाय करतात आणि ट्रेनिंगच्या नावाने बाकीच्या लोकांना तिथे खेळूच देत नाही. कारण त्यांचा पुर्ण दिवस ट्रेनिंगमध्येच जातो. मग ह्याचा फायदा खरतर तो कमर्शियल करत आहेत. आणि त्याला कुठेतरी थोडे निश्चित करावे लागेल.

**मा. उपमहापौर :-**

ठिक है जुबेर भाई आपने जो बताया महापौर मॅडम से निवेदन करता हू की वो बात पे ध्यान रखा जाये और उसके उपर गौर करके महापालिका प्रशासन उसके उपर ध्यान देगा और वैसी कारवाई वैसी चिजे वहापे नाहो. महापौर मॅडम पुढचा विषय घेण्यासाठी तुम्हाला निवेदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझी सुचना आहे की करारनामा करताना त्या अटिशर्तीचा त्याच्यामध्ये समावेश करण्यात यावा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. ज्या काही अटीशर्ती आहेत त्या समाविष्ठ करण्यात याव्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, विविध रस्ते, सार्वजनिक जागा यांचे नामकरण करणेसाठी धोरण निश्चित करणे.

**डिम्पल मेहता :-**

मिरा भाईंदर शहरातील विविध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा, महापालिकेच्या इमारती, पालिकेने विकसीत केलेली आरक्षणे यांचे नामकरण करणेकरीता खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

1) महापालिकेच्या नामकरणाबाबत पूर्वी घेतलेल्या निर्णयात पून:श्च बदल करण्यात येवू नये.

2) ज्या थोर व्यक्ती, महापुरुष व शहरातील समाजसेवक यांचे नाव द्यावयाचे आहे त्या व्यक्तींबाबतची सविस्तर माहिती प्रस्ताव देणाऱ्यांनी प्रस्तावात नमुद करणे आवश्यक आहे. तसेच नाव द्यावयाच्या व्यक्तींनी राज्य पातळीवर सामाजिक काम केलेले असावे.
3) नाम फलकातील मजकूर मराठी व हिंदी भाषेत असणे आवश्यक राहील.
4) नामफलकाचा आकार वास्तुच्या आकारावर अवलंबून राहील.
5) जिवंत व्यक्तींचे नाव देण्यात येवू नये.
6) महापालिकेचे दिवंगत पदाधिकारी उदा. महापौर, उपमहापौर व तीन वेळा निवडून आलेले सन्मा. सदस्य यांची नावे देणेस हरकत नसावी.

सदरचे धोरण हे नविन नामकरण व नविन लावण्यात येणाऱ्या नामफलकाबाबत असेल.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. प्रविण पाटील बोला.

**प्रविण पाटील :-**

मॅडम, याच्यामध्ये हा विषय गेल्या अणेक वर्षापासुन आपल्याकडे येत आहे. वेगवेगळ्या ठिकाणी रस्ते होतात चौक होतात त्याचे नामकरण करतो. मागेही ठरले होते आताही ठरतय. विषय असा आहे की एखादा नविन रस्ता झाला त्याच्यात त्याठिकाणी आपण लोकप्रतिनिधी असतात काही सामाजिक संस्था नाव सुचवत आहेत तर ह्या धोरणा प्रमाणे सगळे अटीशर्ती समजा कुठेतरी चार ते पाच नावे दिली किंवा दोन तीन नावे दिली तर एकाने केले एक तारखेला अर्ज आणि दुसऱ्याने केले ५ तारखेला तिसऱ्याने केला ६ तारखेला चौथ्याने केला ८ तारखेला चारही नावे ह्या अटीशर्तीमध्ये बसलेली आहेत तर तुम्ही कोणाचे नाव द्याल?

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, सभागृहामध्ये जो एकमताने निर्णय होईल त्यालाच त्याचे नाव देण्यात यावे. जर असे चार चार विषय आले तर.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रविण पाटील :-**

मॅडम विषय असा आहे की सभागृहामध्ये म्हणजे............

**प्रशांत दळवी :-**

शेवटी विरोधी पक्षनेते साहेब शेवटी विषय हा सभागृहामध्ये येतो नामकरणाचा. आणि ज्या वेळेला सभागृहामध्ये जर असे चार चार नावे आले आणि आपसामध्ये जर त्यांचे मतभेद नसेल एकाच नावाला जर त्यांचा विरोध नसणार तर आपण महापौर मॅडम त्यांचेच करतील.

**प्रविण पाटील :-**

नाही झाला विरोधच असेल तर.........

**प्रशांत दळवी :-**

तर मग इलेक्शन महापौर मॅडम इलेक्शन घेतील ना.

**प्रविण पाटील :-**

तिथे ठरवाना. त्या धोरणामध्ये ६ मुद्दे दिले आहेत ७ वा मुद्दा पण तो टाका.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम ही सुचना नमुद करण्यात यावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेब यांनी केलेली सुचना ठरावामध्ये नमुद करण्यात यावे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम ह्याला अनुसरुन असे आहे की ह्या पुर्वी जे नावे दिलेली आहेत स्वातंत्र सैनिकांची पण दिली होती किंवा महापौरची दिली होती परंतु ती नावे अजुन पर्यंत त्या रस्त्याची नामफलक त्या ठेकेदाराला ते नावे लावायची आहेत ते अजुन काही ठिकाणी लागलेले नाहीत. त्या संबंधित ठेकेदाराला आपण सुचना करा की ते लावण्यात यावे. नसेल करत तर नविन ठेकेदार नेमावा.

**मा. उपमहापौर :-**

ठिक आहे करुन घ्यावे. वैती साहेब बोला.

**चंद्रकांत वैती :-**

महापौर मॅडम, धंन्यवाद, माझे ह्या विषयामध्ये माझे असे एक मत व्यक्त करायचे आहे की आपण मिरा भाईंदरमध्ये ७९.४० स्क्वेअर मिटरच्या ह्या शहरामध्ये विविध रस्त्यांना वास्तुंना, मालमत्तांना, थोर पुरुशांची, महापुरुषांची, संतांची, सामाजिक कार्यकर्त्यांची नावे आपण देत आलो आहेत. आताच आदरणीय डिम्पल मेहता मॅडमने एक ठराव मांडला त्याच्यामध्ये उल्लेख केला आहे. खुप चांगला उल्लेख आला की आपण नाव देताना कुठलाही सर्वंकश विचार केला नाही. मला तर असे वाटते ह्या मिरा भाईंदरमध्ये आपण जेवढी नावे दिली आहेत ती आख्या भारतातल्या अनेक लोकांचे नाव आहेत. पण ह्याच्या पुढे नाव देताना आपला एक विचार नक्की व्हावा की मिरा भाईंदर महानगरपालिकेची किंवा नगरपरिषद झाली १२ जुन १९८५ ला तेव्हा ९ ग्रामपंचायती विसर्जीत केल्या होत्या. त्या नंतर २८ फेब्रुवारी २००२ ला महानगरपालिका झाली. मग ह्या मागच्या काळामध्ये ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये अनेक सरपंच, उप सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे सभापती, नगर परिषदेचे नगराध्यक्ष, उप नगराध्यक्ष, महापालिकेचे महापौर, उप महापौर, विविध समित्यांचे सभापती, ह्या शहरामध्ये जे नामवंत डॉक्टर आहेत ज्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत ते शिक्षणामधले महर्षी, किंवा वकील प्रतिष्ठीत वकील, असे अनेक लोक ह्या शहरामध्ये होते. अनेक वास्तु अशा आहेत की जसे अभिनव विद्या मंदीर १९७२ च्या दर्म्यान स्थापना झालेले विद्या मंदीर आहे. मग ह्या अभिनव विद्या मंदिरच्या बाजुने जाणारा रस्ता आहे मग त्या स्थानिक वास्तुची ओळख व्हावी म्हणून अभिनव विद्या मंदिर मी एक उदाहरण सांगितले, आज त्या रस्त्याचे नाव दुसरे असेल पण अभिनव विद्या मंदिर रोड एखादे धार्मिक स्थळ असेल जे पुरातन आहे आणि त्याठिकाणी ते श्रध्येची जागा आहे तर त्या वास्तुचे नाव त्या रस्त्याला दिले पाहिजे. नाही तर कुठचाही भारतातील समाज सेवक आणायचा आणि ह्या शहरामध्ये आपण जो चौक देताना काही ठिकाणी चौक पण नाही तीन टोक आले रस्त्याचे तर त्या तीन टोकांना पण चौक नाव दिले आहे. आत मिरा रोड स्टेशनच्या बाहेर आपण शहीद मेजर कौस्तुभ राणेंचे स्मारक बनविले. त्या स्मारकाची आपण दुरावस्था बघाल तर अत्यंत शोचनिय गोष्ट आहे. मग जेव्हा जेव्हा अशी थोर पुरुषांची नाव आपण देतो तेव्हा ती नाव किंवा एकमेव अशी अद्भुत कामगिरी केली असते किंवा बलिदान दिलेले असते अशा लोकांचे नाव ज्या ठिकाणी दिलेत किंवा वास्तु उभारले स्मारके उभारले त्याची स्वच्छता करणे निगा राखणे हे देखील महापालिकेचे काम आहे. मग आपण नुस्ती नाव देऊन चालणार नाही आणि ज्याला नाव काही ठिकाणी तर असे चौक आपण बनविलेत अशी नावे दिली आहेत की जी पाटी आहे ती कुठेतरी खितपत पळलेली आहे. त्याच्यावरती जाळी आली आहे. तर असे होता कामा नये. म्हणून आपल्याला विनंती आहे की हे सर्व आपण करतोय तेव्हा एक समितीचे काम किंवा एका डिपार्टमेंटचे विशेष करुन बांधकामचे काम राहिल की तिथल्या इंजिनियरने सातत्याने अशा गोष्टींवरती लक्ष ठेवले पाहिजे. आणि नाव देताना ह्या शहरात ह्या मातीशी एकनिष्ठ लोक आहेत त्यांचा पण विचार व्हावा. आपण अख्या भारत वर्षातुन सर्वांची नाव आणली पण मिरा भाईंदरमध्ये

अतुलनिय अशी कामगिरी केलेली आहे किंवा त्या त्या वेळेला समाज प्रबोधनासाठी स्व:तचे आयुष्य वेचलेले लोक आहेत त्यांचा देखील नावांचा विचार झाला पाहिजे. ह्या मताचा मी आहे धंन्यवाद मॅडम.

**मा. महापौर :-**

ठिक आहे सन्मा. सदस्य वैती साहेब यांनी केलेल्या सुचना प्रशासनाने अंमलात आणाव्या आणि ज्या ज्या ठिकाणी अशी नामफलक लावलेले असतील त्यांची निगा देखरेख प्रशासनाच्या माध्यमातुन करण्यात यावे. सन्मा. सदस्या डिसा मर्लिन मॅडम बोला.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम, मला एक सुचना दयायची होती की जे पण आपल्या महानगरपालिकेच्या वास्तु आहेत किंवा नामकरण करणार तर त्याच्या बाजूला छोटासा इथीक्स द्यावा एक वाक्याचा जेवढी पुढची जनरेशन जी आहे आणि आपले सुप्रीटेंड्स जे पण नाव वाचणार त्याच्या विषयी थोडीसी माहिती द्यावी माझी रिक्वेस्ट आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या डिसा मॅडम यांनी केलेली सुचना सुध्दा नमुद करण्यात यावी. सन्मा. सदस्य अनिल सावंतजी बोला.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद महापौर मॅडम मला बोलायला संधी दिल्या बद्दल. मला ह्या विषयावर बोलायचे नाही पण पहिला मी रिक्वेस्ट केली होती तो प्रश्नोत्तराचा तासामध्ये जे प्रश्न विचारले होते त्याच्या विषयी मला फक्त पाच मिनिटे बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

कुठल्या विषयावरती ?

**अनिल सावंत :-**

सुरुवातीला जो विषय होता त्या विषयावर फक्त ५ मिनिटे मी बोलणार आहे. कारण महापालिकेची प्रॉपर्टी महापालिकेने खर्च केलेले लाखो रुपये...........

**मा. महापौर :-**

ठिक आहे तुम्हाला मी त्या विषयावरती शेवटी बोलायला देते.

**अनिल सावंत :-**

काही हरकत नाही. पण आठवणीने द्या.

**मा. महापौर :-**

नक्की. सन्मा. सदस्य गिता जैन मॅडम बोला.

**अनिल सावंत :-**

मॅडम मगाच जो विषय होता सुभाषचंद्र बोस मैदान..........

**मा. महापौर :-**

त्यातच तुम्ही बोला जेव्हा मी तुम्हाला संधी देईल तेव्हा......

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहब साथ मै दिया जायेगा उस समय एक साथ बोल लिजीऐ।

**अनिल सावंत :-**

ओके.

**गिता जैन :-**

आता जी वैती साहेबांनी सुचना दिली की, वास्तुची देखभाल वगैरे तर मला त्यात एक सुचना ॲड करायची आहे की, तिथे आपले सफाई कर्मचारी नेहमी जात असतात मग दुसरी काही ही वास्तु

असो त्या त्या एरियातील सफाई कर्मचारी किंवा एस.आय. त्यांना आपण ही जबाबदारी दिली तर मला वाटते की ही जबाबदारी निश्चिती होणार आणि आपली वास्तु ही सुव्यवस्थित राहणार.

मा. महापौर :-

ठिक आहे सन्मा. सदस्या जैन मॅडमची पण सुचना घेण्यात यावी. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 24 :-**

विविध रस्ते, सार्वजनिक जागा यांचे नामकरण करणेसाठी धोरण निश्चित करणे.

**ठराव क्र. 23 :-**

मिरा भाईंदर शहरातील विविध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा, महापालिकेच्या इमारती, पालिकेने विकसीत केलेली आरक्षणे यांचे नामकरण करणेकरीता खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

1) महापालिकेच्या नामकरणाबाबत पूर्वी घेतलेल्या निर्णयात पून:श्च बदल करण्यात येवू नये.
2) ज्या थोर व्यक्ती, महापुरुष व शहरातील समाजसेवक यांचे नाव द्यावयाचे आहे त्या व्यक्तींबाबतची सविस्तर माहिती प्रस्ताव देणाऱ्यांनी प्रस्तावात नमुद करणे आवश्यक आहे. तसेच नाव द्यावयाच्या व्यक्तींनी राज्य पातळीवर सामाजिक काम केलेले असावे.
3) नाम फलकातील मजकूर मराठी व हिंदी भाषेत असणे आवश्यक राहील.
4) नामफलकाचा आकार वास्तुच्या आकारावर अवलंबून राहील.
5) जिवंत व्यक्तींचे नाव देण्यात येवू नये.
6) महापालिकेचे दिवंगत पदाधिकारी उदा. महापौर, उपमहापौर व तीन वेळा निवडून आलेले सन्मा. सदस्य यांची नावे देणेस हरकत नसावी.
7) सदरचे धोरण हे नविन नामकरण व नविन लावण्यात येणाऱ्या नामफलकाबाबत असेल.

**सुचक :- श्रीम. डिंम्पल मेहता** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

**सदर ठरावात श्री. प्रविण मोरेश्वर पाटील, मा. विरोधीपक्षनेता यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली**

महानगरपालिकेने यापूर्वी शहरातील विवीध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा यांना स्वातंत्र्य सैनिकांची व महापुरुषांची नावे दिलेली आहेत. नामकरणाचे फलक अजुनही काही ठिकाणी लावलेले नाहीत. ते नामफलक लावावेत अशी मी सुचना मांडीत आहे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. गिता भरत जैन यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली**

महानगरपालिकेच्या वास्तुची देखभाल करणेसाठी त्या त्या परिसरातील सफाई कर्मचारी किंवा स्वच्छता निरीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी. त्यांचेवर जबाबदारी दिली तर आपली वास्तु सुव्यवस्थित राहील.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चेकलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शहा मॅडम बोला.

**रिटा शहा :-**

सदर विषय प्रकरण क्र.२५ त्या अंतर्गत मला पहिला बोलायचे आहे मॅडम, तुमच्या परवानगीने मी बोलते, हा जो प्रकरण फेरबदलचा ३७ अतंर्गत आणलेला आहे त्याच्यामध्ये असा मला संशय निर्माण होत आहे की हा प्रकरण एकदा असे वाटते की स्पेशली बिल्डरसाठी आणलेला आहे. कारण ज्या बिल्डरने बिल्डींग बांधलेले आहेत असे ओत्सवाल बिल्डर ह्यांनी ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये जैसलपार्क, शिवार गार्डन च्या समोरची बिल्डीग मेग्डोनल्ड च्या बाजुला जागेवर समोर तिकडे बांधलेली बिल्डींग ह्या शहरामध्ये त्याने जेवढी बिल्डींग बांधलेल्या आहेत सर्व अनधिकृत बांधकाम आहे. एका माणसाने ह्या शहराला अनधिकृत बांधकामाचा दिलेला आहे अशा माणसाला आपण का ब्लॅकलिस्टेड करत नाही पाहिजे? याच्यावर केवळ्या केसेस चाललेल्या आहेत. अशा बिल्डराच्या बाजुने हा ठराव आलेला असेल तर त्याच्या बद्दल माझा विरोध आहे. कारण ह्या शहरामध्ये आरक्षणाच्या जागेवर भरपुर बिल्डींग बांधलेल्या आहेत आणि त्या ग्रामपंचायत काळापासुन आहेत. मग त्या सर्व बिल्डींगला त्या सर्व बिल्डींगचे स्पष्ट याच्यामध्ये न येताना आपण फक्त एकाच बिल्डींगचा एकाच जागेवरचा हा प्रस्ताव आणलेला आहे. म्हणून मॅडम मला तुम्हाला एक रिक्वेस्ट आहे की अशा बिल्डरला ब्लॅकलिस्टेड करुन ह्या शहरामध्ये आरक्षणाच्या जागेवर जेवढ्या बिल्डींगा बांधलेल्या आहेत अशा लोकवस्तीच्या जागेला ३७ अंतर्गत समाविष्ठ करुन सदर ठराव सदर विषयी पुढच्या महासभेमध्ये आणावा असा ठराव मी मांडत आहे. उपरोक्त प्रकरणात नमुद केलेल्या गोषवाऱ्यात आरक्षण क्र. 102 (बगीचा) चे उर्वरीत जागेवर ओस्तवाल पार्क बिल्डींग नं.5,6,7 व निशांत को.ऑ.हौ.सो., या इमारती अस्तित्वात आहेत. इमारतीच्या रहिवाश्यांनी इमारतीच्या जागेवर आरक्षण क्र.102 (बगीचा) चे आरक्षण वगळणेकामी शासनास व महापालिकेत पत्रव्यवहार करुन मागणी केलेली आहे. रहिवाश्यांची ही मागणी योग्य व रास्त आहे.

मिरा भाईंदर शहरात अशा अनेक इमारती महापालिकेच्या आरक्षणामध्ये ग्रामपंचायत, नगरपरिषद काळापासून बांधलेल्या आहेत व महापालिकेच्या विकास योजना अंमलात आणणेच्या पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. त्यांच्या बद्दलही प्रशासनाने विचार करुन शहरातील सर्व इमारतींचा प्रस्ताव महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) नुसार कार्यवाही करणेस सादर करावा.

**सुनिता जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम मला ह्या विषयावर बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

जुबेर इनामदारजी बोला.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय, हा गंभीर विषय आहे. खरतर आपले तत्कालिन आयुक्त विजय राठोड साहेबांनी हा विषय महासभेसमोर का दिला हा एक प्रशन एका आय.ऐ.एस अधिकाऱ्याने त्याच्यावर विचार कसा नाही केला. आयुक्त महोदय, हा विकासकाने दिशाभुल केलेली आहे महापालिकेची. ह्या विकासकाने त्या भुखंडावर म्हणजे १०२ जे आरक्षण आहे. आरक्षण पळले साहेब सुरुवातीला १९९३ साली आणि त्याची मंजुरी १९९७ साली आणि अंमलबजावणी २००० मध्ये सुरुवात झाली म्हणजे आपला विकास आराखळ्याची तेव्हा हे आरक्षण पडले. ते आरक्षण पडण्याचा नंतर १९९० मध्ये त्या विकासकाने ओपन पार्क बिल्डींग ५,६,७ अशा तिथे बांधल्या. त्या आरक्षणावर बांधल्या. त्या

आरक्षणावर बांधल्या आरक्षण पडले म्हणून त्यांनी १९९० मध्ये नगरपरिषद जेव्हा असताना नगरपरिषदेने काही तरी भुमिका घेऊन ५० टक्के जागा इमारती बांधुन झाल्या असल्यामुळे त्या इमारतींना अडचणीत न आणन्यासाठी तेव्हा हा विषय महासभे समोर आला आणि ५० टक्के बगीच्याची जागा वगळण्याचा प्रस्ताव देण्यात आला. त्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली त्या अटीवर देण्यात आली की शिल्लक असलेले ५० टक्के क्षेत्र तो विकासक साहेब त्या जागेला विकसित करेल त्याने तो पुर्ण बगीचा तयार करुन महापालिकेला हस्तांतर करायचा. साहेब हे नकरता म्हणजे ह्याच्यामध्ये २०१४-१५ मध्ये त्यांनी नविन प्रस्ताव पालिकेला सादर केला आणि त्या प्रस्तावाला पालिकेने त्याला मंजुरी दिली ही लार्जिवाणी गोष्ट आहे. २०१४-१५ ला त्या विकासकाने प्रस्ताव सादर केला त्या विकासकाला त्या शिल्लक जागेवरती खरतर ज्या इमारती त्यांनी बांधल्या होत्या त्या जागेवर त्याला त्या खरतर त्या इमारती तोडल्या पाहिजे होत्या त्याची पुर्नबांधणी तिथे करायची असेल तर तिथे त्याने केली पाहिजे होती त्याने ते नकरता असलेल्या शिल्लक जागेवरती ज्याने प्रस्ताव दिला. आणि त्या प्रस्तावाला महापालिकेने मंजुरी दिली. म्हणजे तेव्हाचे सुद्ज्ञ, तेव्हाचे टॉऊन प्लॅनर तेव्हाचे जेई ह्याला कारणीभुत आहेत. खरतर ह्यांना तर शिक्षा झाली पाहिजे ह्यांच्या चौकशा लागल्या पाहिजे. एवढी वाईट परिस्थिती साहेब हे बांधकाम अनधिकृत आहे. साहेब ते बांधकाम अनधिकृत घोषीत असताना आपल्याकडे परत हा विषय ३७ खाली म्हणजे आम्हाला पापाचे भागिदार करण्यासाठी महापौर मॅडम आपल्या प्रशासन ठेवतोय. आयुक्त महोदय कदांचित ह्याचा अभ्यास केला नसेल म्हणून हा अभ्यास करा....................

**मा. महापौर :-**

जुबेरजी आपण स्व:त म्युट झाला आहोत .

**जुबेर इनामदार :-**

चुकून म्युट झाले. आयुक्त महोदय मी तुम्हाला बोलू इच्छीतो कदांचित ह्या विषयांचा तुम्ही अभ्यास केला असता तर हा विषय तुम्ही महासभे समोर आणलाच नसता. शिल्लक असतेल्या जागेवर महापालिकेने त्याला संधी दिली इमारत बांधण्यासाठी १४ माळ्याची इमारत बांधुन झाली त्या इमारतीला भोगवटा दाखला दिला. त्याच्यावर अजुन वरती इमारतीचे काम त्याने चालु केलेले आहे. ते पुढचे पाच मजली अजुन इमारत बांधत आहे. अशा प्रकारे पालिकेची दिशाभुल करुन पालिकेची फसवणुक करणारे विकासकांच्या विकासकाला मदत करण्यासाठी ...................

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जुबेर इनामदारजी तुमचा माईक म्युट झाला आहे. सन्मा. सदस्य मदनसिंगजी बोला.

**मदन सिंह :-**

महापौर मॅडम, मला २१ नंबर वरती बोलायचे होते त्यावेळी मला हँडरेस केला होता.

**मा. महापौर :-**

आताच्या २५ व्या विषयावरती बोलायचे आहे का?

**मदन सिंह :-**

हो बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

बोला.

**मदन सिंह :-**

आताचा जो विषय आहे हा विषय आपल्या महासभेत दुसऱ्यांदा तिसऱ्यांदा येत आहे. तर आपल्याला विषय घ्यायचा नसतो पण आपण विषय का आणतो?

**मा. महापौर :-**

आता घेतला आहे ना विषय.

**मदन सिंह :-**

दुसऱ्यांदा तिसऱ्यांदा आला पण आपण परत पोसपॉऊंड करतो फेटाळून लावतो परत आणायला सांगतो असे का करतो?

**मा. महापौर :-**

कारण प्रशासनाने फक्त एकाच ह्याच्यासाठी आणलेला आहे बाकीचे पण आरक्षणे आहेत जी शहरात जी शहरातली तिथे पण असे काही झाले असेल तर ते पुन्हा नविन प्रस्ताव आपल्याकडे आणावा म्हणजे जेणेकरुन आपण सर्वांवरती एक ठाम धोरण किंवा एक निर्णय देऊ शकु.

**मदन सिंग :-**

पण हा विचार पहिलाच करायला पाहिजे होताना. त्याच्या आधी पण हा विषय एकदा महासभेत आला होता.

**मा. महापौर :-**

आता प्रशासनाने विषय दिला. आपण त्याच्या वरती पण चर्चा करुन त्यांना आपण ठराव करुन देऊया.

**मदन सिंह :-**

जे ओत्सवाल पार्क ५,६ आणि ७ आणि निशांत बिल्डींग आहे ती बिल्डींग ऐक्झीस्टींग होती. ऐक्झीस्टींग बिल्डींग वरती जे बांधलेले होते त्या लोकांची काय चुक ज्यांनी बिल्डींग घेतली घरे घेतले त्यांना का भुर्दंड भरावा लागेल? त्यांना न्याय देण्यात यावा आणि त्यांचेवर टाकलेला आरक्षण रद्द करण्यात यावे असा विषय परत घेण्यात यावा.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना ह्या ठिकाणी मी सांगु इच्छीते की आपल्या सुचना थोडक्यामध्ये सांगा. आणि प्रत्येकाला ह्या ठिकाणी मी बोलायची ह्या विषयावरती संधी देते. ज्यांची ज्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत मग आयुक्त साहेब आपल्या सर्वांना खुलासा देतील.

**मदन सिंग :-**

मॅडम माझे म्हणणे एवढेच आहे परत हा विषय घेण्यात यावा आणि त्या नागरीकांना ज्यांनी आधी घरे घेतली आहेत त्यांना न्याय देण्यात यावा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. काका बोला. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, पहिल्यांदा मी महापौरांना धंन्यवाद देतो. महापौर मॅडम, आपणासही धंन्यवाद आताचे आयुक्त ढोले साहेबांनाही धंन्यवाद देतोय आणि ज्यांनी हा गोषवारा दिला आहे त्या आयुक्तांनाही विजय रोठोडांनाही मी धंन्यवाद देतोय. साहेब विषय असा आहे की त्या सभागृहामध्ये अनेक मान्यवर अभ्यासु नगरसेवक आहेत. अनेक वर्षाचा हा विषय आहे. सन्मा. सदस्या रिटा शहा ह्यांनी आता जो ओत्सवाल बदल जे शब्द वापरले ह्या सभागृहातच होत्या. अनेक वर्ष मी स्व:त रोहिदास पाटील म्हणून हा १० वर्षाचा लढा आहे. त्यावेळी अनेक सदस्य गप्प होते आता ते बोलते झालेत त्यांनाही मी धंन्यवाद देतो. आयुक्त साहेब हा विषय आता तुमच्याकडे आला आहे तुम्ही ऐकून घ्या. हा विषय कोणाला पण मेहरबाणी करत नाही आहे. आयुक्त साहेब हा विषय माणुसकीचा आहे नजर चुकीचा आहे ज्यांनी जे हेतुपूरस्कर केलेले आहे त्याला कोणीही शिक्षा दिलेली नाही. शिक्षा देणारे ज्यावेळी द्यायला पाहिजे त्यावेळी हाथ बांधून बसतात. मी आता सांगतोय १९८७-८८ साली ज्यावेळी हे आरक्षण व्हायच्या आधी ओत्स्वाल पार्क बिल्डींग क्र.५, ओत्स्वाल पार्क बिल्डींग क्र.७ आणि निशांत

ह्या ४ बिल्डींग आपला विकास आराखळा मंजुर व्हायचा आधी बनलेल्या. म्हणजेच त्या नगरपरिषदेच्या त्या सुरुवातीच्या काळात त्या बणल्या. आणि त्या बणल्या नंतर त्या नागरीकांची कोणाची कोणती चुक नाही. त्यांनी रितसर पैसे दिलेत गाडे घेतले, प्लॅट घेतले, लोक आली बाळ झाली बाळांचे लग्न झाली आज विषय ज्यावेळी आम्ही आरक्षण क्र.१०२ हे शोधायला लागलो त्यावेळी त्याची ८२०० चौ.मी. जागा कुठे आहे हे जेव्हा दिसत नाही हे शोधावे लागल्या नंतर किंवा लक्षात आले की ह्या ४ बिल्डींग ह्या आरक्षणामध्येच आहेत. आयुक्त साहेब हे मला निर्दशनात आणायचे आहे की त्याच्यावर दोन वेळा मोडिफिकेशन झाले. दोन्ही वेळा मोडिफिकेशनच्या वेळी महापालिकेचे तत्कालिन अधिकारी सगळे सावध होते. कोणीही झुकलेले नव्हते, कोणीही नशापाण केलेली नव्हती, तरी सुध्दा जागेची पाहणी नकरता पहिल्यावेळी चुक झाली होती ही गोष्ट खरी. मोडिफिकेशन करते वेळी जागेची प्रत्येक्ष पाहणी करुन ज्या ठिकाणी बिल्डींग आहे त्या बिल्डींगची जागा आर.झोन करुन उर्वरित जागा तुम्ही ४१०० चौ.मी. हे आरक्षण टाकायला पाहिजे होते. आणि ते तसे टाकले नाही. आम्ही ज्यावेळी भांडत होतो त्यावेळी वेगवेगळ्या त-हेची भांडणे झाली निर्दशनास आली, मोर्चे आले, सगळे काही झाले आणि त्या बिल्डर कडून त्या ओत्स्वाल बिल्डर कडून उर्वरित जागेचा आपण बगिचा बनवून घेतला त्याच्या आधी त्याने बरेच आळेवेळे घेतले त्याच्याही साठी आंदोलने करावे लागली पण आज जो प्रमोद महाजन बगिचा जो उभा आहे तो सर्व सामन्य नागरीकांनी दिलेल्या लढयामुळे आहे. कोणाचेही त्याच्यामध्ये व्यक्तिगत नाही. तरी सुध्दा आता आमची मागणी आहे जर ठराव पुढे जात असेल तो बहूमतात आहे त्याच्यामुळे तो पुढे जाईल ही गोष्ट खरी आहे पण आयुक्त साहेब त्याठिकाणी राहणाऱ्या ७५० कुटूंबांना चारही बिल्डींगची जेवढी लोक आहेत ज्यावेळी लक्षात आले की आताची बिल्डींग जर कोणत्याही आपत्कालिन व्यवस्थेमध्ये ती पाडली गेली तर त्या जागेचा पुर्नविकास होणार नाही ही बातमी समजल्या नंतर आजच्या घटकेला त्या चार बिल्डींगमधले ९ लोकांचे साहेब निधन झालेले आहे. ते कोर्टात गेले, सगळ्या ठिकाणी गेले पण त्यांना न्याय नाही मी महापौरांना धंन्यवाद देतो महापौर मॅडम, जास्त याच्यात वेळ काढू नका आणि ही कोणाच्या एका बिल्डरसाठी नाहीच आहे. याच्यामध्ये तुम्ही कंडीशन टाका आणि हे वगळून हे आरक्षणातुन हे तेवढे क्षेत्र वगळून जर त्या ओत्स्वाल पार्कच्या आजही कोणाला वाटत असेल असेल तर असेल पण त्या बिल्डींगमध्ये दर्शन टॉवर मध्ये चुकीचा वापर झाला आहे. तर मी महापौरांना विनंती करतो उपमहापौरांना विनंती करतोय ह्या महापालिकेच्या १०० नगरसेवकांना विनंती करतोय की हे सगळे तुम्ही शोधून काढा पण त्या बिल्डींगमध्ये राहणाऱ्या लोकांना नुसते टोलवत ठेवू नका त्यांचे क्षेत्र वगळन्याचा ठेवावा अशी माझी विनंती आहे. धंन्यवाद मॅडम.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सन्मा. सदस्या निला सोंस मॅडम, बोला.

**निला सोंस :-**

धंन्यवाद महापौर मॅडम, जैसा की यह ३७ (१) का प्रस्ताव है, वरिष्ठ नगरसेवक रोहिदास पाटीलजीने स्थानिक होते हूये पुरी जानकारी यहा सभागृह मै दि हूई है। मॅडम मै यही कहना चाहती हू की इसका पार्टली ३७ ऑलरेडी पहले हूवा जिस मै ओत्स्वाल दर्शन के लिये आरक्षण बदला गया । जब नागरीको के हित आती है तब डिसिझन ना लेके दोन तीन बार प्रस्ताव आ रहे है लेकीन डिसिझन नही होरा । और यह कहा जा रहा है की पुरे मिरा भाईंदर के विषयो को एक साथ लाया जाये यह सभागृह मै आज मुझेभी चार साल हो गये मै समजती हुॅ की जहा रेस्टोरंट बार हमारे प्रभाग मै ३७ (१) का प्रस्ताव आया था जहा आरक्षण बगिचाको रेस्टोरंट मै बनाना था वहा एकही बार मै पास कराया गया, तो क्या यहापर शहर वासियो को न्याय नही मिलेगा? हम सभी जनप्रतिनिधी रहिवाशी न्याय लेने के लिये है और यह जो प्रस्ताव है यहा कायदा आज कन्व्हेन्स डिड बनती है कन्व्हेन्स होता है, जबतक यह बगिचे का आरक्षण हटेगा जो इसके आज मालिक है उनके साथ न्याय कैसे

होगा? हमने इस सभा मै ऐसे बहूत सारे ३७ के प्रस्ताव पास किये है कुछ जो की शायद गलथ है जिसके लिये आवाज जिनकी उठाई गई और बहूमत के आधार पे एक रेस्टोरंट बार कोभी पास किया। आज हम इस प्रस्ताव के लिये कह रहे है की सारे मिरा भाईंदर वासियो को एक साथ मै लाया जाए।

**मा. महापौर :-**

मॅडम उस सभा मै आप भी थी आपने उस समय पे विरोध भी किया था अभी ओ बाते आप न बोलते हूये अब इस सबजेक्ट पे आपको बोलना है क्या?

**निला सोंस :-**

महापौर मॅडम मै यही बता रही हूकी हमारे उपर प्रश्न चिन्ह है, यह सभागृह का अपमान है। आज हम रहिवाशीयो को न्याय नही मिलेगा मतलब कोई बिल्डर .....................

**मा. महापौर :-**

उसी बात का ठराव हूवा है की जितने भी हमारे शहर के आरक्षण है सबका इकट्ठा प्रस्ताव आणेवाले महासभा मै लिया जायेगा । ठिक है?

**निला सोंस :-**

महापौर महोदय एक और विषय है मै आयुक्त महोदय को पुछना चाहूँगी की आज जैसे की यहापे कहीना कही नगर रचना पुरी मिलीजुली साँठगाठके साथ इस तरीके से कार्य कर रही है जिसके कारण जनता भुगतना पडता है । आज हम सभी ने देखा है की कलावती आई मंदिर काभी प्रस्ताव यही हूवा जिसपे महासभा मै........................

**मा. महापौर :-**

मॅडम, आप और हम सब मिल के अभी नगर रचना के उपरही ध्यान देंगे । क्योकी अभी जो फिल्हाल जो माहोल चल रहा है तो इसके लिये लोकप्रतिनिधी भी नगर रचना विभाग के उपर ध्यान देंगे ऐसी अपेक्षा मै आप सभी से करती हूँ ।

**निला सोंस :-**

महापौर महोदय लेकीन सभागृह मतलब आप साक्षी हो की हमने कैसे कैसे ३७ के प्रस्ताव यहा पास हूये है, यु,एल.सी. घोटाळा मिरा भाईंदर का नाम खराब कर रहा है ।

**मा. महापौर :-**

ठिक है इसके बाद मॅडम हम सब मिल के यह जोभी ठराव करने वाले है हम सब मिलकर ही करने वाले है और इसी सभा मै होगा इसके लिये हम दक्षता जरुर रखेंगे ।

**निला सोंस :-**

महापौर मॅडम, इस प्रस्ताव पे आज फैसला क्यो नही हो सकता ? रहिवाशी के हक्क मै आज फैसला क्यो नही हो सकता है?

**मा. महापौर :-**

मॅडम वो आनेवाले महासभा मै विषय लिया जायेगा । तारा घरत मॅडम बोला. थोडक्यामध्ये आपला मुद्दा मांडा.

**तारा घरत :-**

मला २४ नंबरच्या याच्यावर बोलायचे होते तुम्ही मला बोलू दिले नाही.

**मा. महापौर :-**

आता भरपुर जणांचे हाथ वरती असतात मॅडम आता काय करणार एकाला एक एक वेळेस देतोय आता ह्या विषयावर बोलायचे आहे का?

**तारा घरत :-**

नाही २४ नंबरवर बोलायचे होते त्यात तुम्हाला एक लेटर दिले होते.

**मा. महापौर :-**

काय ?

**तारा घरत :-**

नावा विषयी,

**मा. महापौर :-**

नावाचा विषय आपण घेतला.

**तारा घरत :-**

तुम्ही मला बोलूच दिले नाही.

**मा. महापौर :-**

काय बोलायचे होते?

**तारा घरत :-**

काही फायदा नाही ऑनलाईन सभेचे.

**मा. महापौर :-**

आता काय करणार आपल्या शासनाकडून आले तर आपण त्याला करु सभागृहामध्ये. शासनाकडून ऑर्डर येत नाही मला पण केवढा इकडे त्रास होतो. शासनाकडून ऑर्डर आली की आपण सभागृहामध्ये महासभा करु. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, आजचा जो विषय आहे ३७ (१) फेरबदलाची कारवाई करणे. हे आरक्षण टोटल आहे ८२०० चौ.मी. आणि ह्या आरक्षणामधला काही भाग वगळण्याचा प्रस्ताव सुध्दा मागे महासभेत आला होता. एकच आरक्षण वगळण्याकरीता असे अनेक वेळा प्रस्ताव प्रशासना तर्फे महासभेत आले होते. म्हणजे आपण हे विकासकाला प्राधांन्य द्यायचे की जे नागरीक आहेत ७५० कूटूंब राहतात त्या लोकांना करायचे. महापौर मॅडम, पहिली गोष्ट म्हणजे ज्यावेळी हे आपण ३७ (१) केले. आणि त्याच्यातली अप्रोक्सीमेटली ५० टक्के जागा आपण त्या बगिचा आरक्षणातुन वगळली. आणि ज्यावेळी वगळली त्यावेळी त्या विकासकाने प्रशासनाला हाताशी धरुन जो उर्वरित पोषन आहे तो व्हॅकेंट आहे त्याच्या वरती रहिवास क्षेत्र टाकला. आणि जो अतिक्रमण क्षेत्र आहे तिथे ऑलरेडी बिल्डींग बांधल्या आहेत तिथे त्याने बगिचा आरक्षण टाकले. महापौर मॅडम, ह्या ज्या बिल्डींगा बांधल्या आहेत त्याच्यातल्या ८० परसेंट बिल्डींगा त्याच विकासकाने बांधल्या. मग समजा त्याच विकासकाने बिल्डींगा बांधल्या आहेत मग त्याने त्यावेळी बगिचा आरक्षण वगळण्या करीता आणि रहिवास आरक्षण टाकण्या करीता जो प्रस्ताव आणला होता तर त्या प्रस्तावा मध्ये त्या बिल्डींगा टाकल्या पाहिजे होत्या. परंतु त्या टाकल्या नाहीत. म्हणजेच हाच विकासक स्व:तचा फायदा करतोय. पहिला त्या आरक्षणामध्ये इललिगल बिल्डींग बांधतो आणि त्याच्या नंतर स्व:तच्या फायदा करण्यासाठी आरक्षणामध्ये जो व्हॅकंट स्पोट आहे तिथे आर.झोन. टाकतो. आणि अतिक्रमण क्षेत्र हे करतो. म्हणजे त्या नागरीकांना आपला जो बगिचा द्यायचा होता तो बगिचा १०० टक्के भेटला नाही. मग तुम्ही मला सांगा महापौर साहेब की आता पुन्हा ह्याच विकासकाला प्राधान्य देण्याकरीता आपण हे करतोय. आणि दुसरी गोष्ट ज्यावेळी ५० टक्के आरक्षण वगळले आणि ५० जागेमध्ये त्यांनी बगिता बांधुन दिला पाहिजे त्याच्या नंतर त्याने स्व:तची बिल्डींग उभी केली पाहिजे. परंतु हा विकासक त्याच कंडीशनची फुलफिलमेंट करत नाही. आणि काय करतो तर पहिला स्व:तची बिल्डींग बांधतो. आणि तिकडच्या जागृक नगरसेवकांनी शेवटी महापालिकेला कंम्प्लेड केली. त्याच्या नंतर महापालिकेने त्याला स्थगिती आदेश दिला आणि स्थगिती आदेश दिल्या नंतर तर हा विकासक आपल्या महापालिकेच्या स्थगितीच्या आदेशाच्या विरोधात कोर्टात गेला. आणि कोर्टातुन त्याने स्टे ऑर्डर आणली. म्हणजे विचार करा किती मर्गृर विकासक आहे. पहिला इललिगल बिल्डींग बांधायच्या पुन्हा आर.झोन. करायचा आपली बिल्डींग

बांधायची आणि ज्या रहिवाशांसाठी बगिचा बांधायचा आहे तो बगिचा बांधत नाही. म्हणजे हा असा विकासक. त्याच्या नंतर आता त्यांनी आपण जी टाकलेली कंडीशन ती फुलफिल नाही केली. आपली स्थगिती उठविण्यासाठी कोर्टामध्ये गेला, अशा लोकांना पाठीशी घालतो. आणि साहेब नुकतेच मागच्या महिन्यामध्ये आपण एक तोडक कारवाई केली भाईंदर इस्ट ला ह्याच विकासकाच्या टॉवर मध्ये तिथे इललिगल गाळे विकासकाने बांधले होते ते तोडले. आज त्या लोकांचे नुकसाण झाले आहे. त्या लोकांनी पण २०-२०, १०-१०, १५-१५ वर्षापासुन ते गाळे घेतले आहेत आणि त्यांना नुकसाण झाले आणि तो बिल्डर बिंदास्त विकासक मोकळा आहे. ह्या विकासकाच्या अशा अनेक इललिगल बिल्डींग आहेत साहेब आणि मग ह्या विकासकाला ब्लॅकलिस्ट न करता पुन्हा तो रहिवाश क्षेत्र वगळतो. आणि दुसरी गोष्ट साहेब ज्या बिल्डींगा बनविलेल्या आहेत त्यांचे ह्या बिल्डरने कन्व्हेन्स केलेले नाही. म्हणजे उद्या उठून पुन्हा तो त्या लोकांना प्रेशर करेल आणि सांगेल की ही माझीच जागा आहे आणि ह्याचे रिडेव्हलपमेंट कलाच करुद्या. ही पण शक्यता नाकारता येत नाही. साहेब आपण सगळ्यांना न्याय दिला पाहिजे आणि ह्या लोकांना न्याय देण्या बद्दल सगळ्यांचे एकमत आहे. विरोधी पक्षांचे पण आहे आपले पण आहे, परंतु फरक एवढाच आहे की ज्या विकासकाने चुकिची कामे केलेली आहेत त्याला सजा भेटली पाहिजे , त्याला शिक्षा भेटली पाहिजे. नाहक लोकांना अजिबात त्रास झाला नाही पाहिजे. साहेब हे मिरा भाईंदर आहे ह्या शहरामध्ये ग्रामपंचायत काळापासुन इमारती बांधलेल्या आहेत. त्याच्या नंतर १९९७ ला विकास योजना आली. आणि ह्या विकास योजनेमध्ये अशा अनेक आरक्षणामध्ये काही इमारतींचे भाग आहेत काही इमारती आहेत मग त्यांना पण न्याय भेटला पाहिजे आणि त्यांना पण ३७ (१) झाले पाहिजे. माझी तुम्हाला विनंती आहे की आपण इमिजिऐटली नगर रचना विभागाला बांधकामाला आदेश द्यावेत की ह्या शहरामध्ये आरक्षणामध्ये किती बिल्डींग आहेत ह्या सगळ्यांचे ३७ (१) करण्या करीता एकत्रित प्रस्ताव सादर लवकरात लवकर करावा अशी मी आपणास विनंती करतो आणि जो विकासक हे चुकीचे काम करतोय ह्याला कुठेना कुठे शिक्षा झाली पाहिजे. साहेब त्यावेळी तत्कालिन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब होते त्यांनी ह्यांच्या दोन बिल्डींगा त्यावेळी तोडल्या होत्या. त्या आर.जी. मध्ये बांधल्या होत्या. आज त्याला अनेक वर्ष झालेली आहेत. त्या बिल्डींगा साहेब तशाच उभ्या आहेत. आणि त्या निष्कासीत करुन ती जागा त्या रहिवाशांना मोकळी करुन देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. तरी कृपया याच्यावरती पण आपण लक्ष घालावे ही विनंती धंन्यवाद.

**मा. उपमहापौर :-**

ओके जुबेर भाई शेवटी बोला.

**जुबेर इनामदार :-**

उपमहापौर साहेब, आयुक्त महोदय ह्या विषयावर चर्चा बऱ्याच सदस्यांनी केली आहे. अनुभवी सदस्यांनी केली. मला शेवटची सुचना ध्रवुकिशोरजीने केलेली आवडली. असलेले त्यांचे जे दोन इमारती आहेत त्या पालिकेने त्यावेळी तोडल्या होत्या त्या जागेवर त्या लोकांना स्थलांतरीत करावा अन्यथा त्यांना त्यांचा मोबदला देण्यात यावा. परत रिपीट करतो चांगल्या इमारती खाली करुन शिवमुर्ती नाईक साहेब असताना साहेब ह्यांनी जी १४ माळ्याची इमारत तयार केलेली आहे त्यालाही तशाच प्रकारे त्याच धर्तीवर ती कारवाई केली पाहिजे. ह्या ओत्स्वालने ह्या शहरामध्ये धुमाकूळ घातलेला आहे अनधिकृत बांधकामाचा. प्रथम दुसरे साहेब दिलेल्या जागा पालिकेच्या म्हणजे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी काही अधिकाऱ्यांनी विशेष: नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी ज्या पध्दतीने करत गेलेले आहेत त्यांच्यावर तुम्ही सक्तीची कारवाई केली पाहिजे. तिसरा मुद्दा आयुक्त महोदय, आणि महापौर मॅडम मी आपल्या निर्दशनास आणुन देऊ इच्छीतो खरतर साहेब आपल्याकडे नविन विकास आराखळ्याचे काम सुरु आहे आणि आपला तो इरादा म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ६८ नुसार आपण तो इरादा जाहिर केला. महापालिकेने ठरावाच्या माध्यमातुन नगर रचनाकार

तेव्हा नियुक्त केला नविन आराखळ्यासाठी आणि १५/१०/२०१५ रोजी ठराव क्र. ७६ प्रमाणे मंजुरी दिलेली आहे. २०१५ आम्ही नविन आराखळ्याची मंजुरी दिलेली आहे. एकतर त्या आराखळ्यात सध्याची काय परिस्थिती ती ह्या सभागृहासमोर आपण साहेब आपल्या निवेदनाच्या माध्यमातुन सांगायवे. तसेच आता नविन आराखळ्याचे काम अंतीम टप्यात आहे असे शेवटचे नगर रचनाकार आम्हाला बोलायचे सभागृहामध्ये बोलले होते. असे असताना हे ३७ खाली खरतर हे विषय आणायची तर काय गरजच नाही. ३७ खाली कुठलाही विषय खरतर महापौर मॅडम नविन आराखडा येत असताना नविन आराखळ्याची चाचपणी झाली असताना शहरातील सर्व भुखंडाची त्यांनी शहानिशा केली असावी. हे सगळे काही झाल्या नंतर स्कृटणी सर्व्हे हे सगळे काही झाल्या नंतर आता हे परत ३७ खाली विषय येवढा घाई गर्दीने आणायची गरज काय ? हे कोणाला मदत करायचे आहे लोकांना मदत करण्यासाठी आणलेला आहे किंवा ओत्सवाल बिल्डरला मदत करण्यासाठी आणलेला आहे?

**मा. महापौर :-**

इनामदार साहेब हा प्रशासनाच्या माध्यमातुन आलेला विषय आले. तिच आपण् सुधारणा करुन आपण पुढच्या महासभेमध्ये परत सगळे व्यवस्थित विषय आणा. आणि तुम्ही म्हणता तसा आरखड्याचा विषय आता आयुक्त साहेब आपल्याला खुलासा देतीलच ह्या विषयावरती. तत्पुर्वी रिटा शाह मॅडम आपल्याला काही बोलायचे आहे का? थोडक्यामध्ये मांडा कारण भरपुर वेळ चालला आहे. अजुनही दोन सदस्यांना बोलायचे आहे.

**रिटा शहा :-**

मॅडम मला दुसऱ्या वेळी बोलायचे नव्हते कारण मला एकदा संधी दिली त्याबद्दल धंन्यवाद आणि दुसऱ्यांदा परत मला संधी दिली त्याबद्दल सुध्दा डबल धंन्यवाद महापौर मॅडम, कारण हा विषय जो ओत्स्वाल बिल्डर मी त्यांच्यावर आरोप लावला आहे की ह्या बिल्डरने मिरा भाईंदर शहराला अनधिकृत बांधकामाचे खुप बिल्डींगा दिलेल्या आहेत आणि लोकांना फसविलेले आहे. आणि आपण जनतेची गोष्ट करतो पण तिकडचे विद्यमान नगरसेवक आणि पुर्वीचे नगरसेवक ग्रामपंचायत काळापासुनचे नगरसेवक तिकडे आहेत त्या लोकप्रतिनिधींनी काय लक्ष दिले? त्याच्या बद्दल त्यांनी कम्प्लेंड केली. कंम्प्लेंड केल्या नंतर त्यांच्यावर कारवाई झाली की नाही त्याच्यावर लक्ष दिले की नाही? रिटा शहाने महासभेमध्ये कुठलाही खोटा विषय असेल तर त्याबद्दल नेहमी आवाज उठविलेला आहे मॅडम. आणि हा ओत्स्वाल बिल्डर ह्यांनी ब्लॅकनिस्टेड करायची मागणी त्यासाठी केलेली आहे की ह्या बिल्डरने ह्या शहराला फक्त आणि फक्त अनधिकृत बांधकामेच दिलेली आहेत. त्या बिल्डींगमध्ये जे रहिवाशी राहतात त्यांच्या बद्दल मला स्व:तला खंत आहे की त्यांना फसवले गेले आहे. परंतु असे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये असे भरपुर आरक्षणामध्ये बांधलेल्या बिल्डींगा आहेत असे जेवढे बिल्डर आहे त्यांना सर्वांना ब्लॅकलिस्टेड करा मॅडम. आणि मॅडम तुमच्या नजरेत एक दुसरा विषय आणायला बघते की ओपन लँड टॅक्स आहे असे बिल्डर आहेत जे ओपन लँड टॅक्स भरत नाही आणि लोकांना ताबा देऊन टाकतात ओसी यायच्या अगोदरच. लोक तर फ्लॅट घेतात आणि राहायला येतात मग आपल्याकडे अटीशर्ती अशी आहे की ओपन लँड टॅक्स भरल्या शिवाय टॅक्स लागत नाही पाणी कनेक्शन भेटत नाही, मग बिल्डर आपली बिल्डींग विकुन मोकळा होतो. शेवटी आपल्याकडे लोक टॅक्स काढायला आणि पाणी कनेक्शन घेण्यासाठी येतात तेव्हा त्यांना कळते की कोणाचे ५२ लाख बाकी आहेत कोणाचे ७२ लाख बाकी आहेत कोणाचे ८० लाख रुपये बाकी आहेत आणि बिल्डर ते भरायला तयार होत नाही असे रहिवाशी पण आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये हैरान झालेले आहेत. याच्यावर पण लक्ष देणे ह्या सभागृहाचे कर्तव्य आहे. ते आपल्या सर्व लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. असे बिल्डर ज्यांनी ओपन लँड टॅक्स भरलेला नाही आयुक्त महोदय साहेबांना मी विनंती करते की त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करायची सुरुवात करा साहेब. त्यांच्यावर एफ.आर.आयी. दाखल करायची सुरुवात करा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. मला वाटते ह्या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे गिता जैन मॅडम तुमचा हाथ वरती आहे तुम्हाला बोलायचे असेल तर बोला.

**गिता जैन :-**

धंन्यवाद महापौर मॅडम, एक फक्त ओत्स्वालचे किंवा एकच मिस्टेक नाही आहे. अशी मिरा भाईंदरमध्ये ओसी. आलेली ही बिल्डींग आहेत ज्याच्यावर त्यानंतर गार्डन रिझर्व्हेशन झालेले आहे. त्यानंतर वेगवेगळे रिझर्व्हेशन झाले आहेत. आणि आपले अधिकारी तिथे पोहचले होते फोडायला. आजा जसे जुबेर भाईने सांगितले की जेव्हा नविन आराखडा बनत आहे तेव्हा त्या त्या प्रभाग अधिकाऱ्यांना सांगा की जिथे जिथे बिल्डींगा आहेत तिथे तिथे अजुन पर्यंत कुठले रिझर्व्हेशन आजपर्यंत दाखवत आहेत? आणि खरतर रिझर्व्हेशनमध्ये बिल्डींग झाली तर कोणाची. मॅडम आता नविन आरखडा बनत आहे तुम्ही हा विषय आणा बाकीचे जेवढे आता लक्षात आहेत तेवढे विषय आणाच पुढे कारण त्या लोकांचे काहीच चुक नाही. त्या अधिकाऱ्यांना सजा द्यायची ते कोणीच बोलत नाही. त्या अधिकाऱ्यांना आपण काय करतोय? त्यांच्यावर काय कारवाई केली जाईल ते. आता दुसर आतापर्यंत जी वास्तु झालेली आहे आणि वास्तु झाल्या नंतर जर रिझर्व्हेशन पडले आहे. कॉमन मेनला ते माहित नसते की आम्ही जिथे राहायला आलो आहोत तिथे रिझर्व्हेशन पडले आहे आणि असे भऊतेक एक्झाम ह्या शहरात आहेत. तर त्याही रिझर्व्हेशनचे चौकशी करा. तिथे बिलडींग पडली होती रिझर्व्हेशन राहिले होते तेही चौकशी करा. त्या लोकांना न्याय द्या. आणि ज्यात बिल्डर त्याच्यावर काही गुन्हा आहे त्याच्यावर अॅक्शन घेणे खुप गरजेचे आहे. आपण इथे बिल्डरला मोकळे सोडून देतात. रिटा मॅडमने आताच सांगितलेले आहे किती तरी बिल्डींगचे रॉयल्टी बाकी आहे. बिल्डरने भरली नाही. मग जेव्हा लोक पाणी आणि ओसी साठी जातात किती तरी लोकांना माहित आहे की आमच्या बिल्डींगला ओसी का मिळाली नाही का बिल्डरने घेतले नाही बिल्डर अनधिकृत करतात आणि पडून जातात. मग त्या बिल्डरला बॅकलिस्ट कराच करा कमिश्नर साहेब मी तुम्हाला सांगु इचछीते की आता तुमच्याकडून आम्हाला भरपुर आशा आहे. आणि ही जी दलदल आमच्याकडे झाली आहे खुप बांधकामाचा ह्याला तुम्ही जेसीबी घेऊन साफ करणार अशी आमची अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे मॅडम. आता मला वाटते की खुप चर्चा झाली आहे आपण थोडासा खुलासा प्रशासनाच्या माध्यमातुन ह्याठिकाणी करावा. हा विषय महासभेमध्ये आलेला आहे तर प्रशासनाचा खुलासा ज्यांनी ज्यांनी इथे सुचना केल्या आहेत दिनेशजी आपले थोडक्यात बोलणे संपवा.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, विषय असा आहे की आपण जेव्हा आराखडा तयार करतो त्या टाईमाला एखादी कुठलीही बिल्डींगचे तिथे बांधकाम होत असेल तिथे आपण आरक्षण कसे टाकू शकतो? आपण घरी बसुन आरखडा तयार करतो काय? आपण जेव्हा हे आरक्षण टाकले त्याच्यामध्ये ८२०० चौ.मी. आहे त्यांना माहित असले पाहिजे की इथे बिल्डींगचे बांधकाम झालेले आहे. नंतर काढून तिथे टाकायला पाहिजे नाही तर ते कुठे पण टाकणार ते. नंतर तिथे ३७ करुन फिरवले काय? आणि मॅडम, दुसरी गोष्ट आहे की ह्याच्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने ह्याला स्थगिती दिली होती. ह्या २०१४ ला ह्या कामाला स्थगिती दिली होती. आणि बांधकाम बंद ठेवण्याचे असे आदेश दिले होते की ह्यांचे इललिगल बांधकाम आहे ते बंद ठेवावे. तदनंतर मॅडम ओत्स्वाल बिल्डर हा हायकोर्टाला गेला होता त्याने तिथे अपिल दाखल केली आणि आपण महानगरपालिकेने त्याला अंडरटेकींग देऊन त्याला बांधकाम परवानगी दिली. आपण तिथे का अंडरटेकिंग दिली कशा साठी दिली? आपण ओत्स्वाल बिल्डरचे तुम्ही भाईंदरमध्ये रेकॉर्ड काढला तर त्याची किती इललिगल बांधकाम आहेत. मेक्डॉलच्या तिथे त्याच्या समोर भाईंदरमध्ये केवढी आता ह्या लोकांना ज्यांना परमिशन दिलेली आहे आरक्षणच्या

अगोदर त्यांना सेंड करायचे आणि बिल्डरने मजा करायची. महापौर मॅडम, विषय असा आहे ह्याच्यामध्ये आता ५० टक्के आपण नंतर आपण सांगितले की त्याच्यामध्ये ५० टक्के आरक्षण ठेवा आणि ५० टक्के ती आपण वगळून द्या. आर.झोन. करा. त्या नंतर आपल्या नगर रचना विभागाने त्या ५० टक्केमध्ये तेवढे वगळून परवानगी दिली पाहिजे. परंतु तसे नकरता आपण असे दिसते की ह्याच्या मागे आपण ओत्स्वाल बिल्डरला पाठिमागे घातलेले आहे प्रशासनाने. म्हणून माझा असा आरोप आहे की ज्यांनी असे कामे केलेली आहेत आता जे रहिवाशी तिथे राहतात त्यांची काय चुकी आहे मॅडम, आता मिरा भाईं दरमध्ये जेवढे पण बिल्डर ज्यांनी तिथे आरक्षणामध्ये बांधकाम केलेले आहे त्यांचा आपण जसा ठराव केलेला आहे तो उचित आहे सर्वांना न्याय भेटला पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे आता आयुक्त साहेबांना खुलासा करु देत.

**दिनेश जैन :-**

मॅडम, आता नविन आराखडा बनवतो त्याच्यामध्ये आपण ती सगळी आरक्षणे वगळून घ्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे आपण आयुक्त साहेबांकडून पण खुलासा घेऊया.

**दिनेश जैन :-**

असे विकासक आहेत ज्यांनी असे काम केलेले आहे, त्यांचे आपल्याला कुठलेही नवीन प्लॅन पास नको करायला पाहिजे.

**दौलत गजरे :-**

महापौर मॅडम धन्यवाद, एक आपला जुना सर्व्हे नबंर १८९ आहे आणि नवीन सर्व्हे नं. १५१ आहे, जे मॅगडॉलनच्या समोर जलाझा हॉटेल आहे त्याच्या आतमध्ये आरक्षण आहे आणि आरक्षणवर सध्या बांधकाम चालू आहे. आयुक्त साहेबांना पण तक्रार आहे आणि प्रभाग अधिकाऱ्यांना पण तक्रार आहे मग ते काम चालूच आहे तिथे प्रभाग अधिकारी जातात बघतात आणि परत येतात म्हणजे परत हा विषय एक वर्षानंतर, दोन वर्षानंतर येणार परत त्याच्या आर.जी. मध्ये काम चालू आहे ते का बरं तोडत नाही.

**मा. महापौर :-**

साहेब, आरक्षणावरती जे काही बांधकाम चालू आहे त्यावरती योग्य ती तपासून कारवाई करावी.

**प्रभात पाटील :-**

मला एकाच मतावर बोलायचं आहे आणि तो मुद्दा असा आहे ह्या संदर्भामध्ये मी आयुक्तांशी दोन वेळा भेट पण घेतलेली आहे आणि पत्र पण दिलेलं आहे की, मिरा भाईंदर जे ओपन प्लॉटस आहेत ज्यांना आपण कर लावतो, लावतो ना आपण? रिकाम्या प्लॉटला तर त्या प्लॉटवरती लाकसत्ता पेपरला बातम्या आल्या की, त्याची जेवढी वसुली व्हायला हवी होती तेवढी झाली नाही. ही बातमी खरी आहे कारण सगळ्या वृत्तपत्रांनी ती बातमी दिलेली आहे, हाच पैसा आपल्याला विकासाला कामाला येत असतो परंतु असं आहे की, त्या ओपन प्लॉटवरती मालमत्ता वसुली तर होत नाहीच आहे पण त्या प्रत्येक ओपन प्लॉटमध्ये मार्बलचे एवढे धंदे पडलेले आहेत की तो विकासक आहे तो आपल्या प्लॉटचं वसुली करतो, धंदा करुन कोणाला तरी तो प्लॉट देतो, तिथे मार्बलची कंटीग चालू असते आजूबाजूच्या रहिवाशांना त्यांचा नाहक त्रास होतो कारण २४ तास मार्बलची कटींग चालू असते म्हणजे एकेकडे आपली वसुली पण होत नाही आणि बिल्डसचा मात्र त्या प्लॉट व्होनरचा भरपूर फायदा आपण करून देतो त्या संदर्भामध्ये मी दोन वेळा तक्रार केलेली आहे त्यांच्याकडे रहिवासी क्षेत्रामध्ये हा नाहक त्रास आहे आणि आपला पैसा ही महसुली बुडतोय तर ती सुध्दा बाब आता मी तुमच्याशी

बोलतेय, माझा आयुक्तांशी बोलणं झालेला आहे पण त्याच्यावर कारवाई होत नाही आणि खास करून हे सगळं इंद्रलोक परिसरात बैमालूनपणे चालू आहे.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब, सन्मा. सदस्या आपल्या प्रभातताई पाटील यांनी जी ह्या ठिकाणी सुचना केलेली आहे की ओपन जागेवरती आपली जी वसुली व्हायला पाहिजे तर ती कर वसुली करण्यात यावी.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेबांना ह्या विषयावरती काहीच बोलायचे नाही का?

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब ह्या विषयावर पुढच्या महासभेमध्ये बोलतील, बाकीचे विषय पण तुम्ही ज्या ज्या सुचना केल्या आहेत सन्मा. सदस्यांनी ते पण सगळे विषय त्याच्यामध्ये नमूद करून रितसर प्रस्ताव आपण पुढच्या महासभेमध्ये घेऊया त्याच्यावरती तो पर्यंत प्रशासन तयारी करून येईल.

**प्रकरण क्र. 25 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चेकलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. 24 :-**

उपरोक्त प्रकरणात नमुद केलेल्या गोषवाऱ्यात आरक्षण क्र. 102 (बगीचा) चे उर्वरीत जागेवर ओस्तवाल पार्क बिल्डींग नं.5,6,7 व निशांत को.ऑ.हौ.सो., या इमारती अस्तित्वात आहेत. इमारतीच्या रहिवाश्यांनी इमारतीच्या जागेवर आरक्षण क्र.102 (बगीचा) चे आरक्षण वगळणेकामी शासनास व महापालिकेत पत्रव्यवहार करुन मागणी केलेली आहे. रहिवाश्यांची ही मागणी योग्य व रास्त आहे.

मिरा भाईंदर शहरात अशा अनेक इमारती महापालिकेच्या आरक्षणामध्ये ग्रामपंचायत, नगरपरिषद काळापासून बांधलेल्या आहेत व महापालिकेच्या विकास योजना अंमलात आणणेच्या पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. त्यांच्या बद्दलही प्रशासनाने विचार करुन शहरातील सर्व इमारतींचा प्रस्ताव महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) नुसार कार्यवाही करणेस सादर करावा.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह          अनुमोदन :- श्रीम. सुनिता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, अग्निशमन दलाकरीता २ नग मल्टी पर्पज फायर टेंडर विथ बुम टॉवर (बाउजर कम रेस्क्यु कम फोम टेंडर कम वॉटर टेंडर), ३ नग वॉटर टेंडर वाहन व ४ नग मिनी वॉटर टेंडर वाहन खरेदी करणेबाबत.

**आनंद मांजरेकर :-**

गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे अग्निशमन विभागाकरीता 2 नग मल्टीपर्पज फायर टेंडर विथ बुम टॉवर (बाउजर कम रेस्क्यु कम फोम टेंडर कम वॉटर टेंडर), 3 नग वॉटर टेंडर वाहन व 4 नग मिनी वॉटर टेंडर वाहन खरेदी करीता निविदा प्रक्रिया राबविणेस व सदर कामी येणाऱ्या खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

**प्रकरण क्र. 26 :-**

अग्निशमन दलाकरीता २ नग मल्टी पर्पज फायर टेंडर विथ बुम टॉवर (बाउजर कम रेस्क्यु कम फोम टेंडर कम वॉटर टेंडर), ३ नग वॉटर टेंडर वाहन व ४ नग मिनी वॉटर टेंडर वाहन खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. 25 :-**

गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे अग्निशमन विभागाकरीता 2 नग मल्टीपर्पज फायर टेंडर विथ बुम टॉवर (बाउजर कम रेस्क्यु कम फोम टेंडर कम वॉटर टेंडर), 3 नग वॉटर टेंडर वाहन व 4 नग मिनी वॉटर टेंडर वाहन खरेदी करीता निविदा प्रक्रिया राबविणेस व सदर कामी येणाऱ्या खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आनंद मांजरेकर अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २७, अग्निशमन दलाकरीता ४ नग पिकअप वाहन व १ जीप खरेदी करणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

अग्निशमन विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे विभागाची आवश्यकता व निर्लेखित करावयाच्या वाहनांची संख्या विचारात घेता अग्निशमन विभागाची गैरसोय होवू नये व त्यांना पर्यायी वाहने उपलब्ध होण्याकरीता शासकीय दराने (जे.एम. पोर्टल) 4 नग पिक अप वाहन व 1 जीप खरेदी करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**डिम्पल मेहता :-**

माझे अनुमोदन आहे

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजुर

**प्रकरण क्र. 27 :-**

अग्निशमन दलाकरीता ४ नग पिकअप वाहन व १ जीप खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. 26 :-**

अग्निशमन विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे विभागाची आवश्यकता व निर्लेखित करावयाच्या वाहनांची संख्या विचारात घेता अग्निशमन विभागाची गैरसोय होवू नये व त्यांना पर्यायी वाहने उपलब्ध होण्याकरीता शासकीय दराने (जे.एम. पोर्टल) 4 नग पिक अप वाहन व 1 जीप खरेदी करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. डिंम्पल मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 28, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने १२० मजूर पुरवठा करणेबाबत.

**दिनेश जैन :-**

मिरा भाइंदर महापालिकेच्या अग्निशमन दलात महापालिकेचे व ठेका कर्मचारी कार्यरत असून अग्निशमन दलातील सेवा अत्यावश्यक असून २४ तास ही सेवा मिरा भाईंदर शहरातील जनतेसाठी उपलब्ध आहे. शहरात ४ अग्निशमन स्थानके कार्यरत असून २ अग्निशमन स्थानके लवकरच कार्यान्वीत होणार आहेत.

आपत्कालीन परीस्थीतीस सामोरे जाणेकरीता अग्निशमन दल कायम सुसज्ज राहणे गरजेचे असल्याने व कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने महापालिकेच्या कोविड रुग्णालयांना आग लागून दुर्घटना होवू नये याकरीता खबरदारीची उपाययोजना म्हणून या रुग्णालयात अग्निशमन दलाची वाहने कर्मचाऱ्यांसह २४ तास बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेली असल्याने व पावसाळ्यात झाडे पडणे, इमारत कोसळणे इ. प्रकार घडत असल्याने अतिरीक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

अग्निशमन विभागाची निकड लक्षात घेता १०० मजुर ठेका पध्दतीने पुरवठा करण्याची नविन निविदा प्रसिध्द करणेस व होणाऱ्या अंदाजे खर्च रु. २,६९,६७,६००/- या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश जैन :-**

ह्या ठरावाला मी आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे परंतु ..................

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, चर्चा केल्याशिवाय ठराव कसा होऊ शकतो, ठरावाचा मजकूर काय आम्हाला महत्त्वाची भूमिका तर मांडू द्या.

**मा. महापौर :-**

आता तुम्हाला ठराव मांडायचे आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला आमची भूमिका मांडायची आहे.

**मा. महापौर :-**

पहिले तुम्ही थोडक्यात भूमिका मांडा आणि लगेच ठराव मांडा.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम मला असे विचारयचे आहे की, हा टेंडर काढायला अजून सहा महिने बाकी असून आपण एवढे लवकर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी का घेता आहेत ह्या बाबत प्रशासनाला उत्तर देवू द्या, प्रशासनाला सांगा, काय म्हणतं आहे प्रशासन याच्यामध्ये, याला किती टाईम बाकी आहे.

**वर्षा भानुशाली :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते, मला अग्निशमन दला विषयी थोडं बोलायचं होतं, करोना काळामध्ये अग्निशमन दलाने खूपच चांगल्या प्रमाणे स्वत:ची भूमिका मांडली सायक्लोनमध्ये पण एक बिल्डिंग भाईंदर (वेस्ट) मध्ये उद्‌वस्त झाली त्याच्यामध्ये पण त्यांनी प्रक्रिया होती बरेच झाडे पडले होते त्याच्यामध्ये प्रत्येक वेळेला अग्निशमन दलाचे जेवढे पण सदस्य आहेत त्यांनी एकदम चांगली भूमिका पार पाडली मी त्यांचे अभिनंदन करते की अशा संकटाच्या वेळामध्ये ते पूर्ण टिमने

एक मिरा भाईंदर शहरासाठी चांगले काम केलेलं आहे. मॅडम मिरा भाईंदर शहर खूप झपाट्टयांने वाढलेला आहे त्याच्यामध्ये जी बिल्डिंगची परवानगी आहे ती भौतेक आता आठ माळ्याच्या वरती आपण देत आहेत ज्यावेळी आपण सी.सी. देतो त्यावेळी अग्निशमन विभागाची फायरची एन.ओ.सी. फायर सिस्टम कसे बसवायचे त्याची पण आपण परमिशन त्याच्यामध्ये देत आहोत. पण वस्तुस्थिती अशी आहे खास करून मी माझ्या वॉर्डाच्या आणि भाईंदर वेस्टच्या विषयी मांडत आहे की आठ माळ्याची परमिशनमध्ये रेफ्युजी एरिया सोडावा लागतो ते सी.सी. मध्ये पण त्याचा उल्लेख असतो मॅडम पण बऱ्याच बिल्डींग मध्ये तो रेफ्युजरी ऐरिया न छोडता असेच बिल्डींगला एन.ओ.सी. पण भेटत नाही आणि त्याच्यामध्ये फायर सिस्टीम पण काम करत नाही. अशा बऱ्याच बिल्डींगमध्ये हा बघितलेला आहे. असे विषय माझाकडे खुपच आलेले आहेत. आणि माझे पत्र मी ज्यावेळी आयुक्त साहेब ॲडिशनल कमिश्नर साहेब होते त्यावेळेला सुध्दा मी दिलेले आहे. नंतर पण मी साहेबाला भेटलेली आहे. आता मिरा भाईंदरमध्ये १४ माळा १५ माळा २० माळा आणि ३० माळा ते आता कॉमन झालेले आहे एवढे ते भव्य इमारत तयार करात आहेत. आणि आपण अग्निशनम दलामध्ये आता एक जर्मनीतुन एक वाहन ६८ मिटर लांब आणि ॲन्टी कोअर मिटर सिडी आपण ते वाहन इथे त्याला दिलेले आहे. प्रत्येक वेळेला ज्या ज्या वस्तु अग्निशमन आपल्याकडून मागतात त्यांना आपण उपलब्ध करुन देतो. पण फायरची एन.ओ.सी. देण्यामध्ये अधिकारीऱ्यांचा एवढा गोंधळ का आहे? म्हणजे बऱ्याच ठिकाणी एन.ओ.सी. देतात एखादा नगरसेवकाची तक्रार गेली या कोणाची तक्रार गेली तर ती एन.ओ.सी. रद्द करतात. म्हणजे अधिकारी तर एकच आहे देताना चुक झाली की कॅन्सल करताना चुक झाली ? फायरचे अधिकाऱ्याची बदली होत आहे मॅडम पण त्याच्या नियमाची बदली तर होत नाही. कमिश्नरची बदली होत नाही परंतु ते जे डी.सी. रुल मध्ये जे नियम आहेत त्याची बदली तर होत नाही. तर हे प्रकरण भाईंदर वेस्ट मध्ये खुपच घडलेले आहे. महापौर मॅडम माझे एक पत्र दिलेले आहे, आयुक्त साहेब तुम्हाला पण बोलते माझे एक पत्र दिलेले आहे बऱ्याच फायरच्या एन.ओ.सी. कागदावरती फिरते साहेब तिथे आता एवढे मोठे बांधकाम आहे १४ माळा १६ माळा १८ माळ्याची बिल्डींग आहे तिथे तुमच्या फायरची गाडी फिरते का? जे नियमात आपल्याला चारही जागेला साईट सोडायची आहे तो बिल्डर सोडतो का? आणि त्याला एन.ओ.सी. कशी काय भेटते? म्हणजे तुम्ही कागदा वरती काही पण करुन त्याला एन.ओ.सी. देतात. यायच्या वेळेत काही दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण? आजच्या आज दुर्घटना घडणार नाही पण भविष्यात ती घडली तर मी पण नसेल जगात तुम्ही पण नसाल आणि लोकांचा जीव असाच धोक्यात घालायचा. बिल्डर स्व:तच्या फायद्यासाठी काही पण करतो पण आपण अधिकारी काय करतो? त्याला काय नियम दिसत नाही का? तो नियमाचे उल्लंघन करुन त्याला एन.ओ.सी. कशी देतो? महापौर मॅडम हा विषय खुप गंभीर आहे.

**मा. महापौर :-**

गंभीरतेने आपण हा विषय घेतोय. हा विषय फार गंभीर आहे याची दखल..................

**वर्षा भानुषाली :-**

मॅडम माझी मागणी आहे अशा प्रकारची चुकीची एन.ओ.सी. जी बिल्डरला दिलेली आहे तर त्या अधिकाऱ्यावरती पण गुन्हा दाखल करा. आणि त्याची ती एन.ओ.सी. कॅन्सल करुन त्याला तुम्ही रद्द करा.

**मा. महापौर :-**

नक्की. असे काही प्रकरण झाले असल्यास सदर अधिकाऱ्यावरती कारवाई करण्यात यावी.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, याच्यामध्ये असे आहे ह्या विषयाला कमित कमी एक वर्ष उलटून गेलेले आहे हे टेंडर संपुन. परंतु...................

**मा. महापौर :-**

तुम्ही आता विषयावर बोला.

**दिनेश जैन :-**

विषयावरतीच बोलतो मॅडम, की हे जे टेंडर आहे ह्याला एक वर्ष संपुन झालेले आहे आता हे लोक आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरीसाठी महासभेमध्ये येतात. ह्याच्यामध्ये आपले मिरा भाईंदर मध्ये एवढे टेंडर आहेत ज्यांनी ऑलरेडी ह्यांना मुदतवाढ देऊन मॅडम असे किती आहेत केवढ्यांना आपण मुदतवाढ देतो आणि ह्याचा आर्थिक भुर्दंड महापालिकेला भोगावा लागतो. म्हणून माझी विनंती आहे आयुक्त साहेबाला महापौर मॅडमला की जेवढे पण प्रकरण प्रलंबित आहेत त्यांची निविदा करावी आणि त्यांना नविन टेंडर प्रक्रिया करावी. नाही तर सर्व मुदतवाढ वरती चाललेले आहे मॅडम. आणि वार्षीक निविदा आपण टाईम वरती काढत नाही. वार्षिक निविदा संपल्या नंतर आपण दुसरी वार्षिक निविदा काढतो. तोपर्यंत ते मुदतवाढ पर्यंत काम करतो म्हणजे त्याने आपल्याला दिलेल्या पेक्षा दिडपट दहा पट त्यांना आपल्याला वर्कऑर्डर द्यावी लागते. हा विषय १०-१० वर्षापासुन मुदतवाढ चाललेली आहे. आता हा निविदेचा विषय आहे ह्याला एक वर्ष झालेला आहे. ह्या विषयाला मी पाठपुरावा करुन करुन आता ह्या महासभेपुढे हा विषय आलेला आहे प्रशासकिय मंजुरीसाठी. ह्याच्या पहिला जो ट्राफिक लोकांचा जो विषय होता याची मुदतवाढ २ वर्ष संपुण झालेली आहे. मॅडम एवढे बरेच विषयाचे मिरा भाईंदरला नुकसान होते आपल्याला माहित पण नाही. म्हणून मी असे सांगतो की ज्यांची ज्यांची मुदत संपलेली असेल तर आयुक्त साहेबांनी त्या डिपार्टमेंटला आदेश करावेत की त्यांनी निविदा प्रक्रिया त्वरीत करावी. अशी विनंती आहे मॅडम माझी.

**मा. महापौर :-**

ठिक आहे सभापती साहेब. मा. स्थायी समितीचे सभापती यांनी सभागृहामध्ये ही सुचना केलेली आहे की मुदतवाढीची जी जी प्रकरणे आहेत त्या सर्व प्रकरणाला मुदतवाढ न देता सदर प्रकरणा वरती टेंडर प्रक्रिया करण्यात यावी अशी सुचना त्यांनी दिलेली आहे. मी प्रशासनाला आदेश करते की अशी जेवढी पण प्रकरणे असतील जी मुदतवाढीवरती कामकाज सुरु आहे त्यांचे सर्वांचे टेंडर लवकरात लवकर काढण्यात यावे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम दोन दोन मिनिटे फक्त रोहिदास काका आणि सुनिता भोईर आणि वंदना पाटील ह्यांना ह्या विषयावर बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

विषयाला धरुन बोला. विषयाच्या व्यतिरिक्त बोलु नका.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम ह्या ज्या सदस्यांचे नाव दिलेले आहेत त्या सदस्यांमध्ये एक वर्षा भानुशाली मॅडमचे पण नाव आहे त्यांना पण एक मिनिटाची संधी देण्यात यावी अशी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

वंदना पाटील मॅडम बोला.

**वंदना पाटील :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, आपण मजुर ठेका पध्दतीने घेतो ज्या ठेकेदाराला आपण ठेका देतो पण त्या मजुरांना पुरेसा पगार दिला जात नाही. तर त्या ठेकेदारांना तुम्ही सुचना द्या की तुमचा प्रॉफीट वगळून जो काही मानधन आहे तो त्यांना पुरेसा दिला जावा ही माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. रोहिदास काका बोला.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम धंन्यवाद, माझी महापौरांना विनंती आहे, सभागृहाला विनंती आहे, आयुक्त साहेबांना विनंती आहे की जे जे आपण आता ठेके देणार आपल्या सगळ्यांना अनुभव आलेला आहे कोविडच्या पीरेडमध्ये की स्थानिक लोक इथे काम करत राहिली स्थानिक ह्या शब्दाची पण मी व्याख्या करतो की मिरा भाईंदरमध्ये राहणारी लोक कामावर मिळाली बाहेरची लोक साहेब ड्युटीवर येऊ शकली नाही त्यांना वाहन व्यवस्था आपल्याला करावी लागली त्याच्या मुळे आपले नुकसान झाले. आपण जे जे आता करार कराल ज्या ठेकेदाराला तुमचे ॲग्रीमेंट होईल टेंडर प्रोसेसमध्ये त्याच्यामध्ये एक कंडीशन ठेवावी स्थानिकांना प्राधान्य द्यावे तुमचे कर्मचारी असतात मजुर किंवा त्या ठिकाणी लागणारे शिक्षीत हे सर्व मिरा भाईंदरमध्ये राहणारे असले तर वाहतुकी वरही ताण नाही त्यांची प्रेझेंटी पण पुर्ण असेल आणि स्थानिकांनाही त्याच्यामध्ये नौकरी मिळेल अशी माझी सुचना आहे. महापौर मॅडम, आयुक्त साहेब तुम्ही प्रत्येक कोणतेही ॲग्रीमेंट बनेल त्याच्यामध्ये एक ओळीचे त्याच्यामध्ये डिस्क्रीप्शन असावे ह्या स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. धंन्यवाद मॅडम.

**मा. महापौर :-**

ठिक आहे, सन्मा. सदस्या वर्षा भानुशाली मॅडम बोला.

**वर्षा भानुशाली :-**

धंन्यावद मॅडम तुम्ही मला परत संधी दिल्या बदल माझे बोलणे अजुन संपले नव्हते, मॅडम भाईंदर वेस्ट मध्ये तक्रार अशी आलेली आहे ज्याचे मी लेटर दिलेले आहे पण त्याचे फायर डिपार्टमेंटने मला काही उत्तर दिलेले नाही. माझाकडे पुर्ण फाईल रेडी झालेली आहे. एवढा पत्रव्यवहार करुन सुध्दा मला उत्तर भेटत नाही. कमिश्नर साहेब तुम्हाला विचारते आता जी नविन वास्तु तयार होत आहे....................

**मा. महापौर :-**

मॅडम आपण विषयावर बोला.

**वर्षा भानुशाली :-**

मॅडम अग्निशमनचाच विषय आहे. याचे पण उत्तर मला मिळू द्या मॅडम.

**मा. महापौर :-**

मजुर पुरवठा करणे बाबत तुम्हाला काही बोलायचे आहे का?

**वर्षा भानुशाली :-**

मॅडम हा पण अग्निशमनचाच विषय आहे. मला लेटरचे ॲन्सर भेटत नाही मॅडम.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या वर्षा भानुशाली मॅडमने जे जे पत्रव्यवहार केलेला आहे अग्निशामक विषया संदर्भामध्ये त्यांच्या पत्रांना लेखी उत्तर देण्यात यावे. आणि त्यांची काय समस्या असेल ती दुर करण्यात यावी.

**वर्षा भानुशाली :-**

थोडा कमिश्नर साहेबांनी खुलासा केला तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

मॅडम हा विषय वेगळा चाललेला आहे. जुबेर इनामदारजी बोला.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, तुम्ही आता जो ठराव केला त्याच्यामध्ये प्रशासनाने १२० मजुरांचा उल्लेख केला आहे आणि त्याचा खर्च जो आहे २ कोटी ६९ लाख ६७ हजार ६०० रुपयाचा गृहीत धरलेले आहे. त्यांनी तसा तो उल्लेख केलेला आहे. आता मला वाटते दिनेश जैनने जो ठराव केला तो १०० मजुरांचा केला आणि अमाऊंट तितकीच. अमाऊंट २० मजुरांची कमी झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

मजुरांची अमाऊंट कमी झालेली नाही आयुक्त महोदय.

**दिनेश जैन :-**

जुबेर इनामदार साहेब ती आपण आर्थिक प्रशासकिय मंजुरी दिलेले आहे. तेवढ्याचे टेंडर नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही आर्थिक प्रशासयकिय मंजुरी १२० कर्मचाऱ्यांची मागितली आहे. प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे तुम्ही १०० करतात...............

**दिनेश जैन :-**

आपण फक्त आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दिलेली आहे महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

सभापती साहेब याच्यामध्ये रक्कम जी दिलेली आहे ती कमी होईल.

**दिनेश जैन :-**

नाही मॅडम त्याला आपण फक्त आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दिलेली आहे. त्याच्या मध्ये कदांचित त्या डिपार्टमेंट मध्ये लोक वाढावी लागली तर परत आपण आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणार का? आपण १०० मजुर आता ठेवण्यासाठी सांगितले आहेत. त्याच्यामध्ये तेवढा खर्च करावा. बाकिचा तिथे राहिल.

**जुबेर इनामदार :-**

मंजुरी १०० कर्मचाऱ्यांची देत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर भाई जादा खर्च किया तो उसके उपर क्वेशन उठा लेंगे.

**जुबेर इनामदार :-**

आर्थिक प्रशासकिय मंजुरी फक्त तुम्ही आर्थिक देण्यात यावी. दुसरे महापौर मॅडम, हे मदतनिस खरंतर म्हणजे कर्मचारी जे घेतले गेले होते ७० कर्मचारी महापालिकेने अग्निशमन विभागासाठी आयुक्त साहेब मदतनिस म्हणजे हेल्पर हा अतिआवश्यक सेवा त्या लोकांना जीव वाचविण्याची सेवा खरतर थोडक्यात. हे काय हाऊशी कलावंत नसतात की आपल्याला खड्डे मारायला आपण त्यांचा वापर करत नाही. तर ह्यांची ट्रेनिंग काय आहे ? मदतनिस म्हणून आपण त्यांना कर्मचाऱ्यांना आपण कामावर रुजी करुन घेतो खरजरी हे अग्निशमनसाठी कामाचे आहेत काय ? आणि साहेब हा २०१८ पासुन विषय आपल्याकडे असा मुदतवाढीच्या धर्तीवर म्हणजे शेवटची मुदतवाढ २१/०५/२०१४ असा हा विषय प्रलंबित आणि असा ताणुन धरला आहे. आपण महापालिकेचा अडीच कोटी रुपये खर्च करायला निघालो आहोत महापौर मॅडम. आणि त्याचा खरोखर आपल्याला फायदा पोहोचतो का ह्या विषयामधला हा एक मुद्दा आणि दुसरा मुद्दा साहेब आपल्याकडे मंजुर पदे आहेत ३५० पदे अग्निशमनचे मंजुर आहेत आपल्याकडे. मग ती पदे आपण भरण्याचे काम आपण का करत नाही? दरवेळी आपल्याला हे ठेकेदारांना हा महापालिका पुर्ण ठेक्यावर चालवायची आहे का? कुठेतरी आपल्याकडे ट्रेन स्टाफ परमनंट स्थायी स्टाफ यांची गरज आहे. मग आपल्याकडे पदे मंजुर असताना शासनाकडून आपल्याकडे पदे मंजुर आहेत आपण त्यांच्यासाठी एवढे चांगले उपकरण घेतो मश्नरी घेतो त्यांच्यासाठी कार्यक्रम राबवतो पण त्यांना चालविण्यासाठी आपल्याकडे ट्रेन स्टाफ कुठे आहे? म्हणून आयुक्त महोदय खरतर हा तुम्ही हा ठेका जो विषय आहे मुदतवाढीचा जो विषय आहे किंवा ठेका पध्दतीवर आपण कर्मचारी घेतो त्याला कुठेतरी बाजुला ठेवा. आमचा तुम्हाला ठराव आहे ह्या विषयावर महापौर मॅडम मी तो ठराव वाचतो.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर भाई आप जो ठराव कर रहे हो की अमाऊंट देना है की नही देना है? मै खाली अपनी जानकारी ले रहा हूँ ।

**जुबेर इनामदार :-**

आपने जो ऐ १०० कर्मचारीका आपने अब ठराव किया है उसके विरोध मै इसको मुदतवाढ हम खाली ३ महिनेकी देंगे और यह ३ महिने के अंदर प्रशासनने जो है आस्थापने के उपर कर्मचारी भरने है ।

**मा. उपमहापौर :-**

मैरा यह कहना था की अपन जो मुदतवाढ यहापे बात नही कर रहे है हमने जो रक्कम नक्की की है ठराव के अंदर जिस तरीके से प्रशांतजी ने बताया या दिनेश जैनजीने बताया हमने जो रक्कम नक्की की है ओ रक्कम के बारे मै कहना है या उसके अंदर समावेश करना है लोगो के बारे मै कहना है?

**जुबेर इनामदार :-**

अग्निशमन विभागात कर्मचाऱ्यांची गरज आहे आपण त्याला कमी करु शकत नाही. मात्र तुम्ही निविदा काढणार त्याला ११ महिन्यासाठी मुदतवाढ देणार किंवा ११ महिन्यासाठी तुम्ही हा ठेका काढणार आहात त्याच्या ऐवजी आहेत त्याक र्मचाऱ्यांना फक्त तीन महिन्याची मुदवाढ देण्यात यावी. त्याच बरोबर तीन महिन्याच्या आत प्रशासनाने आस्थापनेवर कर्मचारी अग्निशमन विभागामध्ये भरावेत. हा आमचा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव झाला?

**जुबेर इनामदार :-**

नाही झाला. कुठे वाचला.

**मा. महापौर :-**

प्रशासनाचा पहिला खुलासा पाहिजे का?

**जुबेर इनामदार :-**

आता नको.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम त्यांना ठराव करु द्या.

**मा. महापौर :-**

ठराव करा.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कोविड रुग्णालयात अग्निशमन दलातील वाहने, कर्मचारी व २४ तास बंदोबस्त करीता तैनात करण्यात आलेली आहेत. त्यामुळे अग्निशम विभागात ७० उपलब्ध असतलेले मजुर अपुरे पडत आहेत. तसेच लवकरच पावसाळा येणार. पावसाळा हंगामात झाडे, पाणी, पुर परिस्थिती, इमारत कोसळल्याची असे विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा वेळी आपात्कालिन परिस्थिती समोर टाळण्या करीता मनुष्यबळाची आवश्कता भासते. अग्निशम विभागाची आवश्यकता लक्षात घेता सध्या कार्यरत असलेले ७० मजुरांना ३ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच मंजुर पदांच्या कार्यप्रणाली राबवून ३ महिन्याच्या आत आस्थापनेवर अग्निशमन कर्मचारी यांची भरती करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब मतदानाची प्रक्रिया करा.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला याचा खुलासा करायचा असेल किंवा त्यांचे निवेदन असेल ते तरी ऐकून घ्या महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

नको आता ठराव केला गेला. ठरावाच्या आधीच मी तुम्हाला बोलली होती प्रशासनाचा खुलासा पाहिजे का?

**जुबेर इनामदार :-**

ठराव असल्यावर प्रशासन काय त्यांचा खुलासा करु शकत नाही? त्यांना माहिती देऊ देत.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम, जुबेर भाईंचे म्हणणे असे आहे की प्रशासनाने खुलासा दिला तर ते बहूतेक ठराव पाठीमागे घेणार.

**जुबेर इनामदार :-**

तसे होत नाही.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम ठरावाची निवडणूक प्रक्रिया घ्या.

**मा. उपमहापौर :-**

इस से अच्छा जुबेर भाई आपने सुचना डाल दिया होता.

**जुबेर इनामदार :-**

सुचना क्या मै तो बोल रहा हू सुचना मानलो । इसको सुचना लेलो कोई प्रोब्लेम नही ।

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम ही सुचना घेता येत नाही. अशा प्रकारची सुचना नाही घेता येणार.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक दिनेश जैन यांनी दिलेला आणि दुसरा ठराव आहे सुचक जुबेर इनामदार अनुमोदक प्रविण पाटील. प्रथम मी दुसऱ्या ठरावा वरती मतदान घेतो. सुचक जुबेर इनामदार अनुमोदक प्रविण पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे असेल अशा पक्षाच्या गटनेतयांनी त्यांचे मतदान सांगायचे आहे.

**प्रविण पाटील :-**

आमच्या शिवसेनेच्या गटनेत्या निलम ढवण मॅडम यांच्या वतीने मी पक्षाची भुमिका मांडत आहे की शिवसेनेच्या पक्षाचे जे जे नगरसेवक आहेत त्यांनी जुबेर इनामदार साहेबांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने मतदान नोंदविलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने मी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने मतदान करतो.

**मा. उपमहापौर :-**

मी हस्मुख गहलोत भारतीय जनता पक्षाचा गटनेता जुबेर भाईने जो ठराव मांडलेला आहे त्याचा विरोध आणि दिनेश जैनजीने जो ठराव मांडलेला आहे त्यांच्या बाजुने मी आणि माझा सगळ्या पक्षातील सदस्यांच्या वतीने मत देतोय.

**नगरसचिव :-**

हया गटनेत्यांनी दिलेल्या मतदानाच्या व्यतिरिक्त कोणाला वैयक्तिक मतदान सांगायचे आहे का त्यांनी आपला हाथ वर करायचा आहे. ज्यांना मतदान करायचा आहे त्यांनी कृपया आपला व्हिडीओ ऑन करायचा आहे आणि हाथ वर करायचा आहे. व्हिडिओ ऑन असेल हाथ वर असेल तरच आपण मतदान विचारणात घेण्यात येईल. वैयक्तिक रित्या.

**गिता जैन :-**

सचिव साहेब गेल्या वेळेला रुल्स काय आहे ते गेल्या वेळी पण करायला पाहिजे होते.

**नगरसचिव :-**

काय?

**गिता जैन :-**

मतदान करते वेळी व्हिडिओ ऑन करा आणि तेव्हा तुम्हाला घेतले जाणार. गेल्या वेळी हे तुम्हाला सुचले नाही का?

**मा. महापौर :-**

मॅडम आताचे करा आता चालु आहे.

**गिता जैन :-**

मॅडम ती तुमची जबाबदारी होती गेल्या वेळी जी मतदानाची प्रक्रिया वेळी सगळे उठून गेले.

**मा. महापौर :-**

कोण उठून गेलेले?

**गिता जैन :-**

सगळेच.

**मा. महापौर :-**

आता तर आहेतना सगळे. मॅडम आता मागच्या विषयावर बोलायचे आहे की आताचा विषयावर बोलायचे आहे?

**गिता जैन :-**

आता माझे मत जुबेर इनामदार यांच्या बाजुने आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

अजुन कोणाचे आहे का अश्विन कासोदरीया.

**अश्विन कासोदरीया :-**

मेरा तटस्थ.

**मा. उपमहापौर :-**

ओके.

**प्रशांत दळवी :-**

दिप्ती भट यांना अनम्युट करा.

**मा. महापौर :-**

दिप्ती भट मॅडम बोला.

**दिप्ती भट :-**

माझे मत तटस्थ आहे.

**प्रशांत दळवी :-**

अनिता पाटील मॅडम यांना अनम्युट करा.

**अनिता पाटील :-**

मी तटस्थ आहे.

**नगरसचिव :-**

या व्यतिरिक्त कोणाला वैयक्तिक मतदान कराचे नाही असे मी गृहीत धरतो.

**मा. महापौर :-**

दिनेश जैन यांनी मांडलेला ठरावाच्या बाजुने ५४ विरोधात १७ तटस्थ ३ इतकी मते पडली आहेत. दिनेश जैन यांनी मांडलेला ठराव बहूमतांनी मंजुर करण्यात येत आहे. पुढचे प्रकरण घ्या.

**प्रकरण क्र. 28 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने १२० मजूर पुरवठा करणेबाबत.

**ठराव क्र. 27 :-**

मिरा भाइंदर महापालिकेच्या अग्निशमन दलात महापालिकेचे व ठेका कर्मचारी कार्यरत असून अग्निशमन दलातील सेवा अत्यावश्यक असून २४ तास ही सेवा मिरा भाईंदर शहरातील जनतेसाठी उपलब्ध आहे. शहरात ४ अग्निशमन स्थानके कार्यरत असून २ अग्निशमन स्थानके लवकरच कार्यान्वीत होणार आहेत.

आपत्कालीन परीस्थीतीस सामोरे जाणेकरीता अग्निशमन दल कायम सुसज्ज राहणे गरजेचे असल्याने व कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने महापालिकेच्या कोविड रुग्णालयांना आग लागून दुर्घटना होवू नये याकरीता खबरदारीची उपाययोजना म्हणून या रुग्णालयात अग्निशमन दलाची वाहने कर्मचाऱ्यांसह २४ तास बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेली असल्याने व पावसाळ्यात झाडे पडणे, इमारत कोसळणे इ. प्रकार घडत असल्याने अतिरीक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

अग्निशमन विभागाची निकड लक्षात घेता १०० मजुर ठेका पध्दतीने पुरवठा करण्याची नविन निविदा प्रसिध्द करणेस व होणाऱ्या अंदाजे खर्च रु. २,६९,६७,६००/- या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

| **ठरावाच्या बाजूने** | **ठरावाच्या विरोधात** | तटस्थ |
|---|---|---|
| भारतीय जनता पार्टीचे ५४ सदस्य | शिवसेना व कॉंग्रेस लोकशाही आघाडीचे १६ सदस्य व भारतीय जनता पार्टीच्या सदस्या श्रीम. गिता जैन असे एकुण १७ सदस्य | १) श्री. अश्विन कासोदरीया<br>२) श्रीम. दिप्ती भट<br>३) श्रीम. अनिता पाटील |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.29, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट, कॉंक्रिट रस्ते तयार करणे प्रकल्पास खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**डॉ. प्रिती पाटील :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील सिमेंट, कॉंक्रिट रस्ते तयार करणेकरीता 1034.53 कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल प्रशासनाने Consultant मार्फत तयार केला आहे. सदर प्रकल्प राबविणेकरीता प्रशासनातर्फे पर्याय सुचविण्यात आलेले आहेत. या पर्यायांपैकी पर्याय क्र.3 नुसार सदर

रस्त्यांची कामे Differ देयकानूसार विकसीत करणेबाबतचा सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 29 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट, काँक्रिट रस्ते तयार करणे प्रकल्पास खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. 28 :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील सिमेंट, काँक्रिट रस्ते तयार करणेकरीता 1034.53 कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल प्रशासनाने Consultant मार्फत तयार केला आहे. सदर प्रकल्प राबविणेकरीता प्रशासनातर्फे पर्याय सुचविण्यात आलेले आहेत. या पर्यांयांपैकी पर्याय क्र.3 नुसार सदर रस्त्यांची कामे Differ देयकानूसार विकसीत करणेबाबतचा सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- डॉ. प्रिती पाटील        अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.३०, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) साईबाबा नगर येथील किरण नगर नाल्याच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे भाईंदर (पु.) नवघर साईबाबा नगर येथील सागर किरण इमारत ते जय मनिषा इमारतीपर्यंत नाल्याची पूर्न:बांधणी करणेस अंदाजित खर्च रु.2,37,50,000/- या रक्कमेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच रा.म.क्र.8 प्रभाग क्र. 14 मधील आनंद वेल्फेअर सोसायटी ते मित्र वेल्फेअर सोयायटी, आनंद नगर परिसरात गटारे बनविणे (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) या कामास 42,16,557/- इतक्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर:-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. 30 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) साईबाबा नगर येथील किरण नगर नाल्याच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. 29 :-**

गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे भाईंदर (पु.) नवघर साईबाबा नगर येथील सागर किरण इमारत ते जय मनिषा इमारतीपर्यंत नाल्याची पूर्न:बांधणी करणेस अंदाजित खर्च रु.2,37,50,000/- या

रक्कमेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच रा.म.क्र.8 प्रभाग क्र. 14 मधील आनंद वेल्फेअर सोसायटी ते मित्र वेल्फेअर सोयायटी, आनंद नगर परिसरात गटारे बनविणे (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) या कामास 42,16,557/- इतक्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.31, आर्थिक व प्रशासकिय मान्यता.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली- लाईट हाऊस, चवळी, काशी जनतानगर, शांतीनगर सेक्टर ०७ व शांतीनगर सेक्टर ११ येथील पाणी पुरवठा पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मंजूरीमिळणेबाबत.

**हेतल परमार:-**

उपरोक्त विषयान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली- लाईट हाऊस-चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर-07 व शांतीनगर सेक्टर -11 येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे असते. सदर देखभाल दुरुस्तीची कामे वार्षिक निविदेअंतर्गत मंजूर ठेकेदारामार्फत सुरु आहेत. संबंधित पाणी पुरवठा पंपिग स्टेशनची देखभाल दुरुस्ती प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत करुन घेणे गरजेचे असते. अन्यथा पाण्याच्या वितरण व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता असते. उपरोक्त कामांच्या वार्षिक निविदेची मुदत संपली असल्याने पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्ती करणेकरीता वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे.

तरी सदर कामी अंदाजित रक्कम रु.98,05,100/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**मनोज रामनारायण दूबे:-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर:-**

ठराव सर्वानुमते मंजुर. सन्मा. सदस्य अनिल सावंतजी एकच विषय बाकी आहे तो घेण्यापुर्वी तुम्ही बोला काय बोलायचे आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, उपमहापौर धन्यवाद, आपण बोलायला दिले माझा प्रश्न असा होता, मगाशी सचिवांने सांगितले की विविध डिपार्टमेंटला प्रश्न आहे, त्यामुळे उत्तर आलेले नाही ही सभागृहाची सचिवाने दिशाभूल केलेली आहे. टाऊन प्लॉनिंगचा एकच डिपार्टमेंटचा विषय होता आणि ते मी पत्र 09 तारखेला दिले होते आणि आज 23 तारिख आहे म्हणजे जवळ जवळ 15 दिवस एक डिपार्टमेंट ह्या विषयाचे उत्तर देवू शकत नाही म्हणजे डिपार्टमेंट नक्की पाठीशी कोणाला घालतोय, आज ह्या शहरामध्ये अत्यंत गुन्हास्पद प्रकार घडलेला आहे. एक महिना पूर्ण झाला अजून त्यावर कारवाई होत नाही, महानगरपालिकेची पॉपर्टी त्यामध्ये लाखो रुपये महापालिकेने खर्च केले, एक समाज मंदिर बांधले, खेळपट्टी बांधले, कम्पाऊंड, वॉल, नाला सर्व खर्च महानगरपालिकेने केले आणि ती जागा ऑक्टोंबर महिन्या पासून कब्जा केली जाते महापालिकेला तिथे मजाव केला जातो, जो समाज मंदिर

महापालिकेने पाच वर्षाचा करारावर सिध्द कला भजन मंडळ कलावती आईंचा भक्तगणाना भाड्यांने दिलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

मी सुरूवातीलाच प्रश्नोत्तराचा तास होता महापौर मॅडम, तेव्हाच मी सांगितले की हा विषय गंभीर आहे परंतु प्रशासनाकडून कोणताही खुलासा नाही आला म्हणून महापौर मॅडम आपण प्रशासनाला आदेश द्यावे दोन-तीन दिवसामध्ये ह्या प्रश्नाचा खुलासा आल्यानंतर महापौर मॅडम आपल्या दालनात पदाधिकारी आणि तिकडचे स्थानिक नगरसेवक आणि अनिल सांवत यांना बोलवून यांची एक बैठक घेण्यात यावी.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आपण वारकरी संप्रदायाची पार्श्वभुमी आहे आपल्या कुटुंबाला माझा आई वडिलांबरोबर मी पाई पंढरपुरची वारी केलेली आहे. हे समाज मंदिर तोडले गेलेले आहेत त्याला प्रशासनाने मदत केलेले आहे.

**मा. महापौर :-**

सावंत साहेब, यासाठी प्रशासनाकडे उत्तर नाही त्यांनी आधीच सांगितलेले आहे.

**अनिल सावंत :-**

का उत्तर नाही? मॅडम एक महिना झाला त्या आईंची प्रतीमा चोरुन गेले हे लोक, सामान घेऊन गेले. ह्याचे उत्तर नाही ह्यांचेकडे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला आधिच सांगितलेले आहे माझा दालनामध्ये सबंधित अधिकारी..........

**अनिल सावंत :-**

एक महिना झाला त्या अधिकाऱ्यावर कारवाई का होत नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला महासभेतच बोलायचे आहे का?

**अनिल सावंत :-**

महासभेतच बोलायचे आहे. प्रशासनाची फुस आहे ह्याला.

**मा. महापौर :-**

मग नका बोलू पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 31 :-**

<u>आर्थिक व प्रशासकिय मान्यता.</u> -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली- लाईट हाऊस, चवळी, काशी जनतानगर, शांतीनगर सेक्टर ०७ व शांतीनगर सेक्टर ११ येथील पाणी पुरवठा पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मंजूरीमिळणेबाबत.

**ठराव क्र. 30 :-**

उपरोक्त विषयान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, पाली- लाईट हाऊस-चवळी, काशी जनता नगर, शांतीनगर सेक्टर-07 व शांतीनगर सेक्टर -11 येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे असते. सदर देखभाल दुरुस्तीची कामे वार्षिक निविदेअंतर्गत मंजूर ठेकेदारामार्फत सुरु आहेत. संबंधित पाणी पुरवठा पंपिग स्टेशनची देखभाल दुरुस्ती प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत करुन घेणे गरजेचे असते. अन्यथा पाण्याच्या वितरण व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता असते. उपरोक्त कामांच्या वार्षिक निविदेची मुदत संपली असल्याने पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्ती करणेकरीता वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे.

तरी सदर कामी अंदाजित रक्कम रु.98,05,100/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. हेतल परमार        अनुमोदन :- श्री. मनोज रामनारायण दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.32, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेत गरीब व गरजु विद्यार्थी शिकत असुन या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, इंटरनेट इ. उपलब्ध नसल्याने अभ्यासाकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे तसेच शिक्षकांनाही विद्यार्थ्यांना शिकविता येत नाही. सद्यस्थितीत शाळा बंद आहेत व ऑक्टोबर महिन्यात तिसरी लाट येण्याची शक्यता असुन या लाटेमध्ये लहान मुलांना कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता आहे. यामुळे यावर्षी देखील शाळा सुरु होण्याची शक्यता नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होवून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक कारकिर्दीत त्यांची गैरसोय होवू नये याकरीता अश्या विद्यार्थांना पालिका प्रशासनाने मोबाईल अथवा टॅब तसेच सोबत ६ महिन्यांपर्यंत किंवा शाळा सुरु होईपर्यंत इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांना शिक्षण घेण्यास मदत होईल तसेच शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविणे सोईचे होईल. सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबची सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याने सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून योग्य तो निर्णय घेणेकामी मा. महापौरांच्या अध्यतेखाली पदाधिकारी, सर्व पक्षीय गटनेते तसेच महापालिकेचे सन्मा. सदस्यांची समिती गठीत करुन निर्णय घेणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे. महापौर मॅडम, विषय थोडासा अर्जंट आहे आणि प्रशांत दळवी साहेबांनी ठराव केलेला आहे. महापौर मॅडम सर्वात पहिले आपला अभिनंदन की आपण हा चांगला विषय महासभेत आणला. १५ जून पासून महारष्ट्र शासनाने शाळा सुरू करण्याचे आपल आदेश दिलेले आहेत परंतु मला तरी वाटते जी माहिती घेतलेली आहे, महापौर मॅडम मा. आयुक्त साहेब माझी आपणाला विनंती आहे की माझी माहिती अशी आहे की, अजून पर्यंत महापालिकेच्या शाळा सुरू झालेल्या नाहीत ऑनलाईन आणि आपल्याला माहिती असेल, सगळ्यांना माहिती असेल की महापालिकेच्या शाळेमध्ये जी विद्यार्थी शिकत आहेत ते सगळे गरीब विद्यार्थी आहेत आणि ह्या विद्यार्थ्यांकडे प्लस त्यांच्या पालकांकडे असे अँड्राव्हईड मोबाईल उपलब्ध नाहीत. प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे याच्यामध्ये सहा हजार पेक्षा जास्त विद्यार्थी आपले शिक्षण घेत आहेत आणि २७०० विद्यार्थीकडे अँड्राव्हईड फोन आहेत बाकींच्या विद्यार्थीकडे नाहीत म्हणजे याचा अर्थ ५० टक्के पेक्षा कमी विद्यार्थ्यांकडे मोबाईल उपलब्ध आहेत म्हणजेच ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत तर माझी महापौर मॅडम आपणांस विनंती आहे की जे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत आहेत त्यांना पालिके तर्फे आपण टॅब किंवा मोबाईल दिला पाहिजे काही लोकांकडे इनटरनेट सुध्दा नाही तर माझी आणखीन एक पाऊल पुढे जावून आपल्याला विनंती करतो की, आपण त्यांना सहा महिन्याचं इनटरनेटचा डाटा दिला पाहिजे आणि आता तिसरी कोविड लाट येणार आहे त्याच्यामध्ये तो इम्पॅक्ट मुलांवरती पडणार आहे अशी शक्यता डब्लू.एच.ओ. ने वर्तवलेली आहे मग असं जर झालं तर मला वाटतं की ह्या वर्षी सुध्दा शाळा ऑफ लाईन सुरू होणार नाही फक्त ऑनलाईनच शाळा सुरू होतील

**मा. महापौर :-**

हे टॅब आपल्याला घ्यायचेच ओहत ना, ठिक आहे आपण ह्या मंजुरी देतोच आहोत.

**धृवकिशोर पाटील :-**

मिटींग थोडीशी लवकर लावण्यात यावी मॅडम, माझी तुम्हाला विनंती आहे आणि अनुमोदन याला मी देतोय.

**प्रभात पाटील :-**

मॅडम असे महापालिकेमध्ये कित्येक नवीन नवीन ऑफिसर आलेत आपली खरं अशी प्रथा आहे की, त्यांचा आपण परिचय करुन देतो पण ठीक आहे आपल्याला परिचय नसेल दिला तरी ह्या विषयावर मला थोडसं बोलायचं आहे की, ह्या महापालिकेमध्ये जे सगळे अधिकारी आले त्यांचा स्वागत आहे त्यांना शासनाने पाठवलं, त्यांना पदोन्नती दिली, त्याना सन्मानाची जागा दिली पण मला असे म्हणायचं आहे महापौर मॅडम की, तुम्ही सुध्दा बरेच वर्षे ह्या महानगरपालिकेमध्ये काम करता ह्या महापालिकेमध्ये नगरपालिका ते महानगरपालिका काम करणारे असे कित्येक कर्मचारी आहेत त्यांना कधीही पदोन्नती दिली गेलेली नाही, त्यांना कधीही वरची जागा दिली गेली नाही. फक्त पानपट्टे साहेब सुध्दा ज्यांनी कित्येक वर्ष त्याच जागेवर आहेत. त्यांनी अजुन ती कपॅसिटी प्राप्त केली नाही का की ते वरच्या जागेवर काम करु शकतात. आपल्याकडे बाहेरुन घेतलेले सहाय्यक आयुक्त आहेत मग आपल्या पालिकेचा एकही कर्मचारी सहाय्यक आयुक्त पदी पोहचु शकत नाही का? हे काय आहे की इथल्या स्थानिक कर्मचाऱ्याला तिथेच खितपत ठेवायचे आणि बाहेरचे कर्मचारी घ्यायचे त्याची महापालिकेच्या नगरसेवकाला कल्पना पण नाही. ते येतात तसे स्वागत करायचे आणि चालते आहे त्याला चालु द्यायचे. अरे आपल्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कधी तरी कौतुकाची थाप माराना. नुसते कौतुकाच्या थापाने ते धावायला लागतील. वेगाने पडतील. त्यांची कपॅसिटी तेवढीच आहे. त्यांच्या पात्रतेला आपण कधीही कुठे खतपाणी घालत नाही. हे चालणार नाहीना मॅडम. जे आतापर्यंत चालत आले आहे आपण तसेच चालवतो. मला असे वाटते की ह्या संदर्भात तुम्ही सगळा अहवाल मागवून घ्या. आणि त्यानुसार महापालिकेमध्ये हा विषय आणा. आपल्याला जे शक्य आहे ते आपण केले पाहिजे. शासनाने नाकारला तो पुढचा भाग आहे. पण आपल्या कर्मचाऱ्यांना १२ वर्षाची पदोन्नती नाही २४ वर्षाची पदोन्नती नाही, त्यांना कधी वरच्या जागेची अपेक्षा नाही हे कसे? असे कसे चालेल? त्यांनाही प्रोत्साहीत कराना त्यांना पण अपेक्षा आहेत. किती तरी लोकांच्या फाईली आस्थापना विभागात पदोन्नतीसाठी पदस्थापनेसाठी पडून आहेत त्या सगळ्या बाहेर काढा. तुम्ही लक्ष घाला एवढीच विनंती आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. प्रशासनाने सन्मा. सदस्या प्रभात ताई पाटील यांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत पदोन्नतीच्या संदर्भामध्ये ह्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पुढील कार्यवाही करावा. सन्मा. मुन्नासिंगजी हे मगाच पासुन हाथ वर करत आहेत बोला.

**श्रीप्रकाश सिंग :-**

महापौर मॅडब बहूत बहूत धंन्यवाद, महापौर मॅडम, १० दिन पहिले मै आपके पास आया था तो आपसे मेरी मुलाकात नही हूई । कमिश्नर साहब से मुलाकात हूई थी । कमिश्नर साहब को मैने लेटर दिया था और रेल्वे समांतर नाला का विषय था । पुरे इस्ट का विषय है मॅडम वो, पुरे इस्ट मै २००८-२००९ मै जो कलोट बना जसबे इस्ट का पाणी वेस्ट से पुरा वो जाफरी खाळी मै जाता है इस्ट मै बारीश भर गया था बारीश के टाईम । पानपट्टे साहब को फोन किया ओभी साईट व्हिजीट किया, कांबळे साहब आये थे बारकुंड साहब कोभी बाद मै बूलाया । ओ लेटर मै महापौर मॅडम मैने लिख के दिया था कमिश्नर साहब को की खुद आप जाके उधर साईट व्हिजीट करीये साथ मै लेके चलीऐ और पुरा इस्ट का पाणी वेस्ट मै जाता है । उधर एक प्रेशर टॅंक बनाया था महापौर मॅडम जहा इस्ट का पाणी वेस्ट जाता है कलहोट के पास ओ प्रेशर टॅंक इन्होने बुझा दिया था आधा कर दिया था । मैरे लेटर देने के बाद मै मतलब ८ महिना पहले मैने लेटर दिया था महापौर मॅडम तो बांधकाम विभागने

वापस उसको बडा किया । जो बुझाया था उसको बडा किया वहा दिवार खडा किया था ब्रिज के अंदर ओ दिवाल अंदरका अंदर वैसेही है उपरसे दिख रहा है की सेप्टी टॅंक बडा है और अंदर दिवाल वैसीही है तो सेप्टी टॅंक का कोई मतलब ही नही हूवा प्रेशर टॅंक का । अब उसके वजह से पुरे इस्ट मै महापौर मॅडम पाणी भर रहा है आप सेभी निवेदन है उपमहापौर साहब सेभी निवेदन है ओ कमिश्नर साहब उस दिन घाई घाई मै थे शायद मेरी गलती हूई होगी मैने समय नही लिया उनसे और डायरेक्ट आगया था । लेकीन कमिश्नर साहब मै व्यक्तिगत काम नही बताया पुरे इस्ट मेरा वॉर्ड जो है वो जुना वॉर्ड है वहा गहरा है इसके लिये आपण विशेष ध्यान देके जब भी बोलेंगे तो मै आनेको तैयार हूँ । गटर मै उतरके मै आपको दिखाऊंगा ओ दिवाल किस तरीके से है । उसका कोई मतलभ ही नही निकला साहब.

**मा. महापौर :-**

मुन्नसिंगजी आपण जिस नाले के बारे मै बात कर रहे है उसमै मेने भी पाहणी की है और आयुकत साहबने भी पाहणी की है। फिर भी कुछ काम बाकी रह गया होगा तर आयुक्त साहेब आपण परत तिथे पाहणी करुन जे काही काम राहीले असेल संबंधित नगरसेवकांना पण बोलवा आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन त्याठिकाणी पाहणी करुन कारवाई करण्यात यावी. ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. 32 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. 31 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेत गरीब व गरजु विद्यार्थी शिकत असुन या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, इंटरनेट इ. उपलब्ध नसल्याने अभ्यासाकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे तसेच शिक्षकांनाही विद्यार्थ्यांना शिकविता येत नाही.

सद्यस्थितीत शाळा बंद आहेत व ऑक्टोबर महिन्यात तिसरी लाट येण्याची शक्यता असुन या लाटेमध्ये लहान मुलांना कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता आहे. यामुळे यावर्षी देखील शाळा सुरु होण्याची शक्यता नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होवून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक कारकिर्दीत त्यांची गैरसोय होवू नये याकरीता अश्या विद्यार्थांना पालिका प्रशासनाने मोबाईल अथवा टॅब तसेच सोबत ६ महिन्यांपर्यंत किंवा शाळा सुरु होईपर्यंत इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांना शिक्षण घेण्यास मदत होईल तसेच शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविणे सोईचे होईल.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मोबाईल अथवा टॅबची सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याने सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून योग्य तो निर्णय घेणेकामी मा. महापौरांच्या अध्यतेखाली पदाधिकारी, सर्व पक्षीय गटनेते तसेच महापालिकेचे सन्मा. सदस्यांची समिती गठीत करुन निर्णय घेणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आपले नविन उपायुक्त महापालिकेत आलेले आहेत ते आपली ओळख करुन देतील.

**संजय शिंदे (उपायुक्त):-**

सन्मा. महापौर महोदया सन्मा. आयुक्त महोदय सन्मा. सभागृह ह्या ठिकाणी मी सन्मा. पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने मी माझा परिचय करुन देतो, मी संजय शिंदे मुख्याधिकारी संवर्गातील २००४ बॅचचा अधिकारी आहे. मी यापुर्वी कल्याण डोंबीवली महानगरपालिका, ठाणे

महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, ह्या ठिकाणी काम केलेले आहे. तसेच पालघर नगरपालिका, महाड नगरपालिका आणि खोपोली नगरपरिषद ह्या ठिकाणी मी मुख्याधिकारी म्हणून काम केलेले आहे. १८ जुन रोजी माझी शासनाने पदोन्नती केल्या नंतर उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेत या पदावर नियुक्त केलेली आहे. मी १९ तारखेला रुजु झालेलो आहे. मी ह्या ठिकाणी उपस्थित सर्व पदाधिकारी आणि सभागृहाचे आभार माणतो आणि माझा परिचय संपवतो.

**मारुती गायकवाड :-**

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. आयुक्त महोदय, सर्व सन्मा. सदस्य मी मारुती गायकवाड उपायुक्त म्हणून शनिवारी रुजु झालेलो आहे. माझी एकुण सर्व्हिस १२ वर्ष झालेली आहे. नांदेळ, पुणे, ठाणे महापालिका, भिवंडी महानगरपालिका आणि त्याच्या नंतर आता मिरा भाईंदर महानगरपालिका. थँक्यु.

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब शोक प्रस्ताव आहे. आपल्या सन्मा. नगरसेविका सुनिता ताई भोईर यांचे पती माजी नगरसेवक कै. शशिकांत भोईर यांचे दु:खद निधन झाले आहे. तसेच मिरा भाईंदर मधील नागरीकांचा कोविडमध्ये देखील मृत्यु झालेला आहे त्यांना आपण ह्या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

नगरसेविका सुनिता भोईर यांचे पती सशिकांत भोईर यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना लोकशाही आघाडीच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो.

**नगरसचिव :-**

मृतातम्यास शांती देण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे जागेवर शांत उभे रहायचे आहे.

**दु:खवठा ठराव क्र. 32 :-**

सन्मा. नगरसेविका श्रीम. सुनिताताई भोईर यांचे पती माजी नगरसेवक कै. शशिकांत भोईर यांचे दु:खद निधन झाले आहे. तसेच मिरा भाईंदर मधील नागरीकांचा कोविडमध्ये देखील मृत्यु झालेला आहे त्यांना आपण ह्या सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करत आहोत.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा समाप्त वेळ दुपारी ०३ वाजुन : २५ मिनिटे)**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका